







# महानिर्मिती

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

वीज निर्मिती - पिढ्यान् पिढ्यांसाठी

# ८ वा वार्षिक अहवाल
# २०१२-२०१३

महानिर्मिती

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## वार्षिक अहवाल

## २०१२-२०१३

# वार्षिक अहवाल २०१२-२०१३

## अनुक्रमणिका


| तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| संचालक मंडळ (वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेपर्यंत) | १ |
| संचालक मडंळाचा अहवाल | २ |
| महानियंत्रक व महालेखा परिक्षक यांचे भाष्य | ३० |
| लेखा परिक्षकांचा अहवाल | ३५ |
| आर्थिक ताळेबंद | ४१ |
| नफा-तोटा विवरण | ४२ |
| वित्तीय विवरण पत्रांवर टिपा | ४३ |
| रोकड प्रवाह विवरण | ८६ |
| कंपनी कायदा १९५६ उपविभाग २१२ (३) प्रमाणे विवरण | ८८ |
| प्रकल्प वैशिष्ट्ये | ८९ |

# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**संचालक मंडळ**

**(१-०४-२०१२ पासून वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेपर्यंत)**

| | |
|---|---|
| **अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक** | श्री. सुब्रत रथो (०६.०७.२०१२ पर्यंत)<br>श्री. आशिष शर्मा (०६.०७.२०१२ पासून) |
| **संचालक** | श्री. व्ही. के. कानडे (१८.११.११ ते ३०.११.१२ पर्यंत)<br>श्री. अजय मेहता (२१.०५.१२ ते ३१.७.१२, दि. ३०.११.१२ पासून)<br>श्री. अरविंद सिंह (२१.०९.१२ ते ३०.११.२०१२ पर्यंत) |
| **संचालक (वित्त)** | श्री. जी. जे गिरासे (०१.०६.०७ ते २१.०५.२०१२ पर्यंत)<br>श्री. एस. ए. एम. नकवी (दि. २६.१२.१२ ते २६.०८.१३ पर्यंत) |
| **संचालक (प्रवर्तन)** | श्री. एम. जी. वाघमोडे (११.३.११ ते ३.४.१३)<br>श्री. विजय सिंह (दि. २८.०८.१३ पर्यंत) |
| **संचालक (प्रकल्प)** | श्री. सी. एस. थोटवे (दि. २८.०८.१३ पासून) |
| **संचालक :** | श्री. पी. व्ही. पागे (दि. ०१.१२.२००८ पासून आजपावेतो) |

# संचालकांचा अहवाल

प्रिय सदस्य,

आपल्या कंपनीचा दि. ३१ मार्च २०१३ रोजी संपलेल्या वर्षाचा आठवा वार्षिक अहवाल आणि त्यासोबत लेखापरिक्षित केलेले वार्षिक लेखा सादर करण्यास आपल्या संचालकांना आनंद होत आहे.

(रक्कम लाखात)

| **वित्तीय निष्कर्ष** | **२०१२-१३** | **२०११-१२** |
|---|---|---|
| **उत्पन्न** | | |
| वीज विक्रीतून मिळालेला महसूल (निव्वळ) | १,६४२,३८६.२१ | १,२७४,४६३.८० |
| इतर उत्पन्न | २१,९१८.४३ | १५,०२८.८७ |
| एकूण उत्पन्न | १,६६४,३०४.६४ | १,२८९,४९२.६७ |
| **खर्च** | | |
| वापरलेल्या सामग्रीचा खर्च | १,०८२,२१२.०५ | ९५०,२००.५५ |
| इतर खर्च | २०६,५०५.०६ | ११४,६५९.२६ |
| कर्मचारी खर्च | ९१,००३.६४ | ७९,३२७.३३ |
| घसारा / कर्जफेडीची तरतूद | ५५,६९६.८९ | ४०,३१२.५५ |
| वित्त खर्च | १३६,११०.७० | ८४,९८२.९२ |
| निव्वळ नफा -करपूर्व | ९२,७७६.३० | २०,०१०.०६ |
| कर (निव्वळ) | ४३,९७८.३७ | (२१.५७) |
| निव्वळ नफा (करोत्तर) | ४८,७९७.९३ | २०,०३१.६३ |

## वित्तीय कामगिरी

आढावा वर्षात वीज विक्रीचे उत्पन्न २८ टक्के वाढले. ते ₹ १,२७४,४६३ लाखांवरून ₹ १,६४२,३८६ लाख असे झाले. याच कालावधीत इतर उत्पन्न ४५ टक्क्यांनी वाढले व एकूण सरसकट उत्पन्नात २९ टक्क्यांनी वाढ झाली. वापरलेल्या मालाची किंमत १४ टक्क्यांने वाढली. ती ₹ ९५०,२०० लाखांवरून ₹ १,०८२,२१२ लाख झाली. ही वाढप्रामुख्याने कच्चा कोळसा याची ३२ टक्के आणि आयात कोळसा यात २१ टक्के अशी होती.

वित्तीय खर्च सुद्धा ५९ टक्क्यांनी वाढून ₹ ८४,९८२ लाखांवरून ₹ १३६,११० लाख असा झाला. त्याची मुख्य कारणे म्हणजे नवीन खापरखेडा युनीट ५ आणि भुसावळ युनीट ४ (५०० मे वॅ. युनीट प्रत्येकी) यांच्या व्याजात वाढझाली तसेच महावितरण कंपनीची थकबापी वाढल्याने खेळते भांडवलाच्या उसनवारीचा दबाव वाढला. कर्मचारी खर्च, घसारा व इतर खर्च यांच्यात अनुक्रमे १५ टक्के, ३८ टक्के आणि ८० टक्के अशी वाढ झाली. इतर खर्चाच्या वाढीत भर टाकणारे घटक पुढीलप्रमाणे : भाडेपट्टी ३७ टक्के, दुरुस्ती व देखभाल - २३ टक्के आणि निर्मिती व प्रशासकीय खर्च इतर खर्च २२९ टक्के. यामुळे एकूण नफ्यामध्ये वाढहोऊन गत वर्षाच्या ₹ २०,०३१ लाखावरून तो यावर्षी ₹ ४८,७९७ लाख असा वाढला आहे.

## लाभांश

राज्यातील वीज टंचाई वर मात करण्यासाठी कंपनीला भविष्यात निर्मिती प्रकल्प उभारून वीज निर्मिती क्षमतेमध्ये भर टाकावयाची आहे. त्यामुळे आपल्या संचालकांनी निर्णय घेतला आहे की निर्माण केलेले अधिक्य हे पुन: ज्यांचा विस्तार करावयाचा आहे त्या प्रकल्पातच गुंतवावे. म्हणून आढावा वर्षात कोणत्याही लाभांशाची शिफारस करण्यात आलेली नाही.

## वीज निर्मिती क्षेत्रातील कामगिरी

महानिर्मितीची दि. ३१ मार्च २०१३ रोजी वीज निर्मितीची एकूण स्थापित क्षमता १०,७३७ मे. वॅ. झाली. कारण खापरखेडा युनीट-५ (५०० मे.वॅ.) आणि भुसावळ यु-४ (५००मे.वॅ.) यांचे कार्यन्वयन अनुक्रमे १६.०४.२०१२ व १६.११.२०१२ या तारखांना झाले.

२०१२-१३ या वर्षात कोळसा वापरणाऱ्या वीज निर्मिती प्रकल्पांचा सरासरी उपलब्धता अंक ८६.२४ टक्के असा होता. गेल्या गतवर्षी तो ८५.२२ टक्के होता (१.०२ टक्क्यांची वाढ) तसेच संयत्र भार अंक ६५.२७ टक्के होता, तो गेल्या वर्षी ६५.०४ टक्के होता (०.२३ टक्क्यांची वाढ). २०१२-१३ मध्ये १५ युनीट्सचे ओव्हर हॉलींगं करण्यात आले. गेल्या २०११-१२ या वर्षी १६ युनीट्स केले होते. पाण्याच्या टंचाईमुळे जानेवारी १३ / फेब्रुवारी १३ दरम्यान परळी येथील सर्व युनीट्स बंद ठेवावी लागली. नियोाजित बंदी व सक्तीची बंदी यांचे अंक २०१२-१३ मध्ये ६.६३ टक्के व ७.११ टक्के असे होते. वर्ष २०११-१२ मध्ये ते ८.१५ टक्के व ६.६३ टक्के होते.

वायूच्या साह्याने वीज निर्मिती करणाऱ्या प्रकल्पांची सरासरी उपलब्धता ९६.२२ टक्के व संयत्र भार अंक ६३.५५ टक्के होता.

**प्रवर्तनातील कामगिरी दर्शक अंक खालीलप्रमाणे :**

वर्ष २०१२-१३ साठी कोळसा प्रत्यक्ष अंक ७३.३१ टक्के होता, २०११-१२ मध्ये ७५.७० टक्के होता. विनिर्देशित कोळसा वापर वर्ष २०१२-१३ मध्ये ०.८३७ किलो / किलो वॅट अवर होते. गतवर्षी ते ०.८४१ किलो / किलो वॅट अवर असे होते. यावर्षी बाष्प नलिका गळतीची टक्केवारी २.४८ टक्के होती. गतवर्षी ती २.२९ टक्के होती. विनिर्देशित तेल वापर यावर्षी ३.५३ मिली. / कि वॅ अवर असा होता, गेल्या वर्षी ४.१९ मि.ली. /कि वॅ अवर होता. वर्ष २०१२-१३ मध्ये सहायक वीज वापर १०.३९ टक्के होता तो गतवर्षी १०.५२ टक्के होता. यावर्षी जाळलेल्या कोळशाचे सरासरी ठोक मूल्य ३१५० के कॅल / किलो ग्रॅम अवर असे होते. गेल्यावर्षी ते ३१५४ के. किलो ग्रॅम होते. वर्ष २०१२-१३ मध्ये उष्णता दर २६७२ के कॅल / कि वॅ अवर असा होता. गेल्या वर्षी तो २७०४ के. कॅल / कि. वॅ. अवर असा होता. वाहतुकीतील हानी गतवर्षी ०.८७ टक्के होती, मागील वर्षी सुद्धा ती ०.८७ टक्के होती.

## क्षमता वाढीचा कार्यक्रम

महराष्ट्र राज्यातील वीजेची मागणी पूर्ण करण्यासाठी महानिर्मिती कंपनी विविध औष्णिक विजेचे प्रकल्प अमलात आणत आहे.

### (अ) कार्यान्वित केलेले औष्णिक वीज प्रकल्प १५०० मे. वॅ

#### (१) खापरखेडा औ. वि. केंद्र युनीट ५ (५०० मे. वॅ.)

कारखान्याच्या मुख्य साधनासाठी मे. बी. एच. इ. एल. यांचेकडे दि. २३.०१.२००७ रोजी (झिरो डेट) मागणी नोंद दिली. उर्वरित साधारासाठी मे. बी. जी. आर. एनर्जी सिस्टम लि. यांचेकडे दि. ०३.०७.०७ रोजी मागणी केली. या वर्षात या बाबत पुढील महत्वाचा टप्पा पूर्ण करण्यात आला.

| अनु. क्र. | महत्वाचा टप्पा | पूर्ण केल्याची तारीख |
|---|---|---|
| १. | प्रायोगित कार्ये पूर्ण केली | ०४.०४.२०१२ |

हे युनीट दि. ०५.०८.२०११ रोजी पूर्ण भारावर संचलित केले. दि. १६.०४.२०१२ रोजी ते कार्यान्वित झाले असून ते प्रवर्तनाचे कार्य करीत आहे.

महाराष्ट्र शासनाने वरील प्रकल्पास शासकीय निर्णय क्रमांक वि. नी. के. २००५ / प्र. क. २०४४ / ऊर्जा -४ दि. १२.०५.०६ नुसार मंजूरी दिली आहे.

**(२) भुसावळ औ. वि. केंद्र युनीट ४ व ५ (२×५०० मे. वॅ):**

मुख्य प्रकल्प सामग्रीसाठी मे. बी. एच. इ. एल. यांचेकडे दि. २३.०१.०७ (झीरो डेट) रोजी मागणी नोंदविली. उर्व रित साधनांची मागणी मे. टाटा प्रोजेक्टस् लि. यांना दि. ०५.११.०७ रोजी दिली. यावर्षी पुढील महत्वाचा टप्पा पूर्ण झाला.

| अनु. क्र. | युनीट - ४ चा महत्वाचा टप्पा | पूर्ण केल्याची तारीख |
|---|---|---|
| १. | प्रायोगीक कार्य पूर्ण करणे | १८.०७.२०१२ |

हे युनीट दि. ०७.०३.२०१२ रोजी पूर्ण भाराने चालविण्यात आले. ते दि. १६.११.२०१२ रोजी कार्यान्वित झाले व सध्या कार्यरत आहे.

| अनु. क्र. | युनीट - ५ चा महत्वाचा टप्पा | पूर्ण केल्याची तारीख |
|---|---|---|
| १. | प्रायोगीक कार्य पूर्ण करणे | २६.१२.२०१२ |

भुसावळ औ. वि. केंद्र युनीट - ५ (५०० मे. वॅ.)या युनीटने दि. ३०.०३.२०१२ रोजी पूर्ण भाराचे प्रवर्तन साध्य केले. हे युनीट चालु वर्षात कार्यान्वित होणे अपेक्षीत आहे.

महाराष्ट्र शासनाने वरील प्रकल्पांना शासन निर्णय क्र. वि. नि. के. २००५ / प्र. क्र. २०४४ / ऊर्जा - ४ दि. १२ मे २००६ यानुसार मंजूरी दिलेली आहे.

**(ब) कार्यरत होणारे प्रकल्प : ३२३० मे. वॅ.**

**१) चंद्रपूर औ. वि. केंद्र युनीट - ८ व ९ (२ × ५०० मे. वॅ.)**

मुख्य साधनांसाठी मे. बी. एच. इ. एल यांचेकडे दि. २५.०७.०८ रोजी मागणी नोंदविली. (झिरो डेट ०९.०२.०९) कारखान्याच्या उर्व रित साहित्यासाठी मागणी दि. १२.०६.०९ रोजी मे. बी. जी. आर. एनर्जी सिस्टम लि. चेन्नई यांना दिली. या वर्षात पुढील महत्वाचे टप्पे पूर्ण करण्यात आले.

| अनु. क्र. | चंद्रपूर युनीट - ८ चा महत्वाचा टप्पा | पूर्ण केल्याची तारीख |
|---|---|---|
| १. | हायड्रोलिक परिक्षा (ड्रेनेबल) | ०५.०६.२०१२ |

| अनु. क्र. | चंद्रपूर युनीट - ९ चा महत्वाचा टप्पा | पूर्ण केल्याची तारीख |
|---|---|---|
| १. | हायड्रोलिक परिक्षा (ड्रेनेबल) | २९.१०.२०१२ |

या प्रकल्पाची कामे प्रगतीपथावर आहेत. युनीट - ८ चे पूर्ण भाराने कार्य मार्च २०१४ मध्ये आणि युनीट - ९ चे जानेवरी २०१५ मध्ये सुरु करण्याचे योजिले आहे. महाराष्ट्र शासनाने या प्रकल्पास शासन निर्णय क्रमांक प्रकल्प - २००७ / प्र. क्र. ११०६ / ऊर्जा दि. ०५.०३.०८ नुसार मान्यता दिली आहे.

## २) परळी औ. वि. केंद्र युनीट - ८ ( २५० मे. वॅ)

मे. बी. एच. इ. एल यांना २०.०१.०९ (झिरो डेट) रोजी मुख्य सामग्रीसाठी मागणी केली. नॅचरल ड्राफ्ट कुलींग टॉवर (एन. डी. सी. टी.) याची व्याप्ती वगळता उर्वरित कारखान्यासाठी आदेश मे. सुनील हाय-टेक इंजिनिअर्स लि. यांचेकडे दि. ०१.०१.२०१० रोजी नोंदविली. एन. डी सी टी आणि त्याचे फिल्म फिलस् याची मागणी मे. गॅमन इंडिया लि. यांना दि. ०५.०१.२०१० रोजी दिली. या वर्षात खालील महत्वाचे टप्पे साध्य करण्यात आले.

| अनु क्र. | महत्वाचे टप्पे | पूर्ण केल्याची तारीख |
|---|---|---|
| १. | कंडेसर उभारणीस प्रारंभ | २४.०४.२०१२ |
| २. | टी जी. उभारणीस प्रारंभ | २४.०४.२०१२ |
| ३. | हायड्रॉलिक परिक्षा (ड्रेनेबल) | २५.१२.२०१२ |

या प्रकल्पाचे काम प्रगती पथावर आहे. मार्च २०१४ मध्ये पूर्ण भाराने संचालन करण्याची योजना आहे.

महाराष्ट्र शासनाने या प्रकल्पास मंजुरी शासन निर्णय क्रमांक प्रकल्प - २००८ / प्र. क्र. १४९१ / ऊर्जा - ४ दि. २६.०५.०९ नुसार दिली.

## ३. कोराडी औ. वि. केंद्र युनीट ८, ९ व १० ( ३ × ६६० मे. वॅ.)

बॉयलर व टर्बो जनरेटर पॅकेजची मागणी मे. एल ॲण्ड टी यांना दि. २३.०९.०९ (झिरो डेट) रोजी दिली. उर्वरित कामांसाठी मे. लॅको इन्फ्राटेक लि. हरयाना यांना दि. २७.०७.१०रोजी मागणी दिली. या वर्षात खालील महत्वाचे टप्पे साध्य करण्यात आले.

| अनु क्र. | युनीट - ८ चे महत्वाचे टप्पे | पूर्ण केल्याची तारीख |
|---|---|---|
| १. | टी. जी. इरेक्शन प्रारंभ | ३०.०४.२०१२ |
| २. | कंडेसर इरेक्शन प्रारंभ | १०.०५.२०१२ |

| अनु क्र. | युनीट - १० चे महत्वाचे टप्पे | पूर्ण केल्याची तारीख |
|---|---|---|
| १. | कंडेसर इरेक्शन प्रारंभ | १५.११.२०१२ |
| २. | टी. जी. इरेक्शन प्रारंभ | २६.११.२०१२ |

कोराडी युनीट -१० चे काम प्रगतीपथावर आहे. युनीट क्र. ८, ९ व १० याचे पूर्ण भाराने संचालन अनुक्रमे मार्च २०१४, ऑक्टोबर २०१४ व मार्च २०१५ मध्ये योजिले आहे.

महाराष्ट्र शासनाने या प्रकल्पास शासन निर्णय क्र. प्रकल्प / २००८ / प्र. क्र. ११८९ / ऊर्जा - ४ दि. १४.१०.२००८ नुसार मंजूरी दिली आहे.

## क) भविष्यातील प्रकल्प - ( १३५३० मे वॅ)

### १) भुसावळ औ. वि. केंद्र युनीट - ६ ( १× ६६० मे वॅ)

- **जमीन** - प्रकल्पासाठी जमीन संपादित केली.
- **पाणी** - हातनूर धरण, सुधगाव बंधारा आणि ओझरखेड धरण येथून पाणी उपलब्ध होऊ शकेल.

- **इंधन** – महागूज कोलायरीज यांनी पत्र क्र. १८ मे २०११ नुसार या प्रकल्पास मच्छाकाटा कोळसा खाण येथून कोळसा पुरविण्याचे आश्वासन दिले आहे.
- या प्रकल्पास पर्यावरणाच्या दृष्टीने मंजूरी केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाने दि. २७.११.२०१२ रोजी दिली आहे.
- **वीज खरेदी करार :** म. वि. नि. आयोगाने महानिर्मिती व महावितरण यांच्या वीज खरेदी करारास मंजूरीचा आदेश दिला आहे.

  वरील प्रकल्पास शासन निर्णय क्र. प्रकल्प / २०१० / प्र. क्र. ३ / ऊर्जा – ४ दि. ०५.१०.२०१० नुसार मंजूरी दिली आहे.

२. **नाशिक औ. वि. केंद्र युनीट – ६ (१× ६६० मे. वॅ.)**

- **जमीन** – महानिर्मितीच्या ताब्यातील जमीनीचे पुनर्समायोजन करून या प्रकल्पास जमीन उपलब्ध करून देण्यात येत आहे.
- **पाणी** – जल संसाधन विभागाने पत्र दिनांक ११ जानेवारी २०११ नुसार ६.५ एम.एम.३ (घन) / प्रति वर्ष एवढे जादा पाणी मंजूर केले आहे. उर्वरित १०.५ एम.एम.३ पाण्याची गरज नाशिक इतर चालू युनीट्स साठी यापूर्वी मंजूर केलेल्या ३४ एम.एम.३ पाण्यातून भागविता येईल.
- **इंधन** – महागूजने आपले पत्र क्र. १८ मे २०११ नुसार या प्रकल्पासाठी मच्छाकाटा कोळसा खाणीतून कोळसा पुरविण्याचे आश्वासन दिले आहे. याशिवाय भारत सरकारने आपले पत्र क्र. ०६.०९.२०१३ नुसार 'महाजन वाडी' नागपूर या कोळसा खाणीतून कोळसा देण्याचे मान्य केले.
- **पर्यावरण मंजूरी** – पर्यावरण व वन मंत्रायल, भारत सरकार यांच्याकडून, संदर्भातील अटी दि. १५.०६.११ रोजी मिळाल्या आहेत. याची सार्वजनिक सुनावणी दि. ०७.०५.१३ रोजी यशस्वीरित्या आयोजिण्यात आली. एम पी सी बी यांचे सार्वजनिक बैठकीचा इतिवृत्तांत मिळाला. इ ए सी ने संदर्भातील अटींना १५.०६.२०१४ पर्यंत वैधता विस्तार दिला.
- **वीज खरेदी करार** – महानिर्मिती व महावितरण यांच्यातील वीज खरेदी करारास म. वि. नि. आयोगाने मंजूरीचा आदेश दिला.
- निविदा विनेदिर्शीत करण्याचे काम चालू आहे.

वरील प्रकल्पास महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र. प्रकल्प – २०११ / प्र. क्र. ३१३ / ऊर्जा–४ दि. २९.१२.११ नुसार मंजूरी दिली..

३. **पारस औष्णिक वीज प्रकल्प युनीट – ५ (१×२५० मे. वॅ.)**

महानिर्मितीने विद्यामान वीज केंद्रानजीक १×२५० मे. वॅ. चा कोळसा आधारित प्रकल्प स्थापित करण्याचे ठरविले आहे.

- **जमीन** – वीज केंद्र व राख विल्हेवाट क्षेत्रासाठी जमीन संपादन पूर्ण झाले.
- **पाणी** – लोअर मून बंधाऱ्यातून पाणी उपलब्ध
- **इंधन** – महागूज लि. यांना पत्र क्र. १८ मे ११नुसार मच्छाकाटा खाणीतून कोळसा पुरविण्याचे आश्वासन दिले आहे. याशिवाय भारत सरकारने आपले पत्र क्र. ०६.०९.२०१३ नुसार या प्रकल्पासाठी महाजनवाडी, नागपूर येथील कोळसा देण्याचे मान्य केले.

- **वीज खरेदी करार** – म. वि. नि. आयोगाने त्यांचे आदेश दि. २९.१०,१३ नुसार यापूर्वीच्या दि. ०१.०४.२००९ च्या वीज खरेदी करारात सुधारणा करून त्यात या प्रकल्पांचा समावेश करण्यास मान्यता दिली.

  महाराष्ट्र शासनाकडून मंजूरीसाठी पाठपुरावा करण्यात येत आहे.

**४. दोडायचा औ. वि. केंद्र युनीट १, २, ३, ४ व ५ (५×६०० मे. वॅ.)**

शासनाच्या आदेशानुसार एन टी पी सी लि. याच्या सोबत एक संयुक्त साहस कंपनीतर्फे या प्रकल्पाची अंमलबजावणी केली जावी.

- **जमीन** – एकूण ९४३ हेक्टर जमीनीची आवश्यकता असून त्यासाठी ४९३.९५ हेक्टर जमीन संपादन करणे, ऑक्टोबर १३ पर्यंत पूर्ण झाले.
- **इंधन** – युनीट १ व २ (टप्पा – १) साठीची कोळशाची गरज चेंदीपाडा कोळसा खाण ओरीसा येथून उपलब्ध केला जाईल. युनीट ३ ते ५ (टप्पा – २) साठी कोळसा मच्छाकाटा कोळसा खाण, ओरीसा येथून मिळेल.
- **पाणी** – टप्पा १ – तापी नदीवरील निम्न तापी प्रकल्पासून ४० एम एम$^{३}$ पाणी मिळेल. टप्पा – २ टि आय डी सी साठी पत्र क्र. १५५५/२०१० दि. ०३.०४.२०१० नुसार कळविले की निम्न तापी प्रकल्पातून आणखी ४० एम.एम.$^{३}$ पाणी देता येईल.
- संदर्भातील अटी या पर्यावरण व वन मंत्रालय, भारत सरकार यांचे कडून दि. ०५.०५.२०११ रोजी मिळाल्या. त्यांच्या वैधतेला मुदतवाढ इएसी यांनी दि. १३.०५.२०१४ पर्यंत दिली आहे.
- **वीज खरेदी करार** – म. वि. वि. आयोगाने त्यांचे पत्र दि. २९.१०.२०१३ नुसार दि. ०१.०४.२००९ रोजी महावितरण सोबत केलेल्या करारात सुधारणा करून त्यातच या प्रकल्पाच्या समावेशास मंजूरी दिली.

**५. उरण वायू आधारित – समिश्र चक्र विज प्रकल्प (१२२० मे. वॅ.) : (ब्लाक – १ : ४०६ मे. वॅ. ब्लॉक – २ : ८१४ मे. वॅ.)**

- जमीन, पाणी व अन्य सर्व मान्यता उपलब्ध आहेत.
- १२२० मे. वॅ. क्षमतेचा प्रगत श्रेणीतील वायू टर्बाईन आधारित संमीश्र चक्राकार वीज निर्मिती प्रकल्प स्थापित करण्याच्या सर्वंकष स्वरूपाचा टर्न की कंत्राटाच्या निविदा दि. २८.०१.११ रोजी देण्यात आल्या मात्र त्या रद्द कराव्या लागल्या. कारण केंद्रिय विद्युत प्राधिकरणाची दि. १९.०३.२०१२ रोजीच्या परिपत्रकानुसार वायू आधारित प्रकल्पासाठी घरगुती गॅस उपलब्ध नाही. त्यामुळे २०१५-१६ पर्यंत वायू आधारित प्रकल्पाची आखणी न करण्याचा सल्ला मिळाला आहे.

वरील प्रकल्पास महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय प्रकल्प ०८ / प्र. क्र. १२४६ / ऊर्जा – ४ दि. ०२.०३.१० नुसार मंजूरी मिळाली आहे.

## सौर ऊर्जा निर्मिती

सौर ऊर्जा निर्मिती विभाग (यापूर्वीचे नाव सांघिक नियोजन कक्ष) यांचेकडे राज्यातील पहिला मेगावॅट स्तरावरील सौर – पीव्ही वीज निर्मिती प्रकल्प उभारण्याची जबाबदारी दिली होती. एम एन आर इ यांनी दिलेल्या काल मर्यादेत १ मे वॅ पी सोलर पी व्ही प्रकल्प सुरु करण्यात आला हे नोंद करण्याजोगे आहे. वर्ष २०११-१२ पासून तेथे १.५२० दशलक्ष युनीट एवढी वीज निर्मिती झाली. सौर प्रकल्पातील वीज निर्मिती निसर्गाच्या लहरीवर अवलंबून असते. त्यातील १.५८३ द. ल. यू. या अंदाजित क्षमतेच्या९० टक्के म्हणजे १.४२५ द.ल. यू, वीज निर्मिती होईल अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षात वर्ष २०११-१२ मध्ये झालेली १.५२० द. ल. यू वीज निर्मिती महानिर्मिती कंपनीच्या अपेक्षेपेक्षा जास्त आहे.

१ मे वॅ पी सोलर पीव्ही प्रोजेक्ट यातून वर्ष २०१२-१३ मध्ये १.४०२२६० दशलक्ष युनीट वीज निर्मिती झाली.

याशिवाय ४ मे वॅ. पी चे दोन प्रकल्प (क्रिस्टलाईन टेक्नॉलॉजी वर आधारित-२ मे. वॅ. पी आणि अति तलम फिल्म तंत्रज्ञानावर आधारित २ मे. वॅ. पी चे प्रकल्प) ग्रीड सोबत १८.१०.२०११ व १२.०२.१२ रोजी संकलित करण्यात आले. वर्ष २०१२-१३ मध्ये ४ मे. वॅ. सोलर प्रकल्पातील वीज निर्मिती खालीलप्रमाणे आहे.

अ) २ मे. वॅ. पी – क्रिस्टलाईन तंत्रज्ञानावर आधारित – २.४०३५३४ द. ल. यू.
ब) २ मे. वॅ. पी. – तलम फिल्म तंत्रज्ञान आधारित – २.९५१९७० द.ल.यू.

या वर्षात महानिर्मितीने १२५ मे. वॅ. पी. सौर प्रकल्प साक्री, जि. धुळे येथे पूर्ण केला.

अ) ७५ मे. वॅ. पी. क्रिस्टलाईन तंत्रज्ञान आधारित
ब) ५० मे. वॅ. पी. तलम फिल्म तंत्रज्ञान आधारित

वरली १२५ मे. वॅ. पी. सोलर पीव्हीचा वीज निर्मिती प्रकल्प वीज जाळ्यासोबत (ग्रीड) दि. ३१.०३.१३ रोजी संकलित करण्यात आला व त्यानंतर तेथे वीज निर्मिती करण्यात येत आहे.

भविष्यातील सौर प्रकल्प (२०१४-१५)

अ) ३६ मे. वॅ. पी. सोलर पीव्ही प्रकल्प – शिरसूफळ, ता. बारामती, जि. पुणे
ब) ५० मे. वॅ. पी. सोलर पी व्ही प्रकल्प – कुडगाव जि. उस्मानाबाद

## नवीन प्रकल्पांना निधी साह्य

सर्व नियोजित क्षमता वाढीच्या प्रकल्पांना वीज पुरवठा कर्ज व समभाग यांचे ८०:२० अशा गुणोत्तरात केला जातो. आपली कंपनी विस्तार कामातील समभागाच्या अंशदानाकरिता कंपनीतील महसूलाची संसाधने वापरणार आहे. प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या ८० टक्के तरतूद वित्तीय संस्था व बँकांच्या मार्फत होईल. उर्वरित २० टक्के प्रामुख्याने महाराष्ट्र शासनाकडून मिळतील.

### नागपूर शहरातील सांडपाण्याच्या महानिर्मितीकडून कोराडी विस्तार प्रकल्प (३×६६० मे.वॅ.) यासाठी पूनर्वापर

महानिर्मितीचे कोराडी येथे सध्या अस्तित्वात असलेल्या वीज केंद्राचा विस्तार करविण्याचे प्रस्तावित केले आहे. तेथे आणखी तीन (३) ६६० मे. वॅ. क्षमतेचे संच वाढवले असून त्यासाठी बाष्पाचे अतिमहत्वाचे मापदंड आहेत. कोळसा व पाणी याची पायाभूत सुविधेवर या केंद्राची सक्षमता अवलंबून आहे. सध्या विद्यमान वीज केंद्राला प्रक्रीय न केलेले (रॉ) पाणी पेंच धरणातून मिळते. मात्र विस्तारीत आवश्यक असणारे जादा पाणी पेंच धरणात उपलब्ध नाही. म्हणून महानिर्मितीने प्रक्रिया न केलेल्या पाण्याकरिता नागपूर महानगर परिषदेचे सांडपाणी वापरण्याचे ठरविले आहे.

यासाठी महानिर्मिती कंपनीने पर्यावरण स्नेही विस्तार प्रकल्पाची उभारणी सुरु केली आहे. त्यातनू ताज्या पाण्याचा वापरही कमी होणार आहे. महानिर्मितीने नागपूर महानगर पालिकेसोबत एक सामंजस्याचा करार केला आहे. त्यामुळे नागपूर महापालिका प्रक्रिया केलेला सांडपाणी देईल. सुमारे ४० एम.एम.३ / प्रतीवर्ष (११० एम एल डी) अधिक १० टक्के जादा एवढे पाणी कोराडी विस्तार प्रकल्पाला पुरविले जाईल. हे पाणी प्रामुख्याने कोराडी प्रकल्पातील कंडेसर थंड करण्यासाठी वापरले जाईल.

या प्रकल्पाचा खर्च ₹ १९५ कोटी आहे. त्यात १० वर्षाचा संचालन व सुव्यवस्थेचा खर्च अंतर्भूत आहे. या प्रकल्पासाठी नागपूर महानगर पालिकेला 'जवाहरलाल नेहरू नॅशनल अर्बन रिन्युएबल मिशन अंतर्गत ₹ ९० कोटी मिळणार असून ती महानिर्मितीकडे स्थलांतरित केली जाईल. आणि उर्वरित खर्च महानिर्मिती करील. महानिर्मिती व नागपूर महानगरपालिका यांच्यातील करारानुसार महानिर्मिती दरवर्षी ₹ १५ कोटी महापालिकेला देईल. अशा प्रकारे सांडपाण्याचा औष्णिक वीज निर्मिती केंद्रासाठी पुनर्वापर करण्याचा पहिलाच उपक्रम आहे. या १३० एम एल डी प्रकल्पाचे काम सुरू असून मार्च २०१४ ला तो पूर्ण होईल.

या प्रकल्पाचे उद्दीष्ट भारतात सांडपाण्याच्या पूनर्वापराचा प्रकल्प स्थापन करून त्यामुळे वीज निर्मिती कंपनीचा खर्च कमी करणे. तसेच त्याच्या पाण्याचा पिण्याव्यतिरिक्त अन्य वापरासाठीची मागणी कमी करणे व त्यातून देशाला ताज्या पाण्याची उपलब्धता वाढविणे असे आहे.

## इंधन उपलब्धता

१. महानिर्मितीची कोळशाची गरज :

महानिर्मितीची आ. वर्ष २०१२-१३ मध्ये औष्णिक वीज निर्मितीची स्थापित क्षमता ७४८० मे. वॅ. होती. त्यासाठी महानिर्मितीची कोळशाची गरज ४६.५० एम एम टी प्रतीवर्ष एवढी होती. महानिर्मितीस कोळसा देशांतर्गत इ-निविदा द्वारे आणि आयात या स्त्रोतांतून मिळविला जातो.

२. इंधन पुरवठ्याचे करार :

महानिर्मितीने केलेल्या कोळसा कंपन्यांसोबतच्या इंधन पुरवठ्याचा वार्षिक कंत्राटाचा तपशील :

| कोळसा कंपनी | वार्षिक कंत्राटाद्वारे माल (एम एम टीए) | कराराची तारीख | शेरा |
|---|---|---|---|
| डब्ल्यू सी एल | २२.७०१ | २१.११.२००९ | कार्यवाही दि. ०१.०४.२००९ पासून सुरू असून ती २० वर्षे चालू राहील. दर पाच वर्षांनी वार्षिक कंत्राटातील संख्येचा व अन्य तरतूदींचा आढावा घेतला जाईल. |
| एस ई सी एल | ६.०२७ | २६.०६.२००९ | |
| एम सी एल | ६.१७२ | २६.०६.२००९ | |
| एस सी सी एल | २.२६० | ०५.०३.२००९ | |
| एम सी एल | ९.३४४ | ३१.०१.२०१३ | पारस - ४, परळी-७, खापरखेडा-५ व भुसावळ ४ व ५ यांच्यासाठी इंधन पुरवठा करार |
| **एकूण** | **४६.५०४** | | |

३. **आयात कोळसा :**

महानिर्मितीत २.९९२ एम एम टी कोळसा आयात करण्यासाठी (जी सीव्ही ४६०० के कॅल / केजी-ए आर बि) मागणी नोंदविली असून हा कोळसा भुसावळ, चंद्रपूर व खापरखेडा औष्णीक विद्युत केंद्रासाठी वापरण्यात येईल. कोळसा देण्याची वेळ सप्टें/आक्टो.-१३ ते जून २०१४ अशी आहे.

## ४. विविध कोळसा कंपन्यातील टंचाई :

सी आय एल च्या उपकंपन्या म्हणजे डब्ल्यू सी एल, एम सी एल आणि एस इ सी एल येथून होणाऱ्या कोळशाच्या पुरवठ्यात एकूण २५ टक्के घट होत असल्याची समस्या महानिर्मितीला भेडसावत आहे. वर्ष २०१२-१३ एकूण कोळशाच्या पुरवठ्यात २८.३८ टक्के तूट होती.

वर्ष २०१२-२०१३ साठी कोळसा कंपनी निहाय पुरवठा व त्यातील तूट :

| कोळसा कंपनी | जोडणी (एमएमटी) | प्राप्ती (एमएमटी) | घट | तूटीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| डब्ल्यू सी एल | २२.६८९ | १७.५८५ | ५.११६ | २२.५४ |
| एम सी एल | १०.९८९ | ४.८२२ | ६.१६७ | ५६.१२ |
| एस इ सी एल | ६.०२४ | ५.८१७ | ०.२१ | ३.४८ |
| एस सी सी एल | २.२६२ | १.८३१ | ०.४२९ | १८.९८ |
| **एकूण** | **४१.९६४** | **३०.०५५** | **११.९०९** | **२८.३८** |

वर्ष २०१२-१३ मधे महानिर्मितीला ४१.९६४ एम एम टी कोळसा मिळवायचा होता. त्यापैकी ३०.०५५ एम एम टी मिळाला. एवढ्याशा कोळशाने आपली फक्त ७१.६२ टक्के गरज पूर्ण होते. एकूण २८.३८ टक्के (११.९०९ एम एम टी) कोळसा कमी पडतो. कोळसा पुरवठा वाढावा यासाठी महानिर्मिती कंपनी संबंधित कोळसा कंपन्या व संबंधित रेल्वे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करीत आहे.

कोळशाच्या पुरवठा व गुणवत्ता यांतील तूट भरून काढण्यासाठी महानिर्मिती कंपनी उच्च गुणवत्तेचा कोळसा आयात करत आहे. सी.इ.ए.ने सुद्धा वीज निर्मिती कंपन्याना ठराविक प्रमाणात आयात कोळसा वापरण्यास मुभा दिली आहे.

## ५. महानिर्मिती प्रकल्पाकरिता केलेल्या इंधन पुरवठा कराराची स्थिती

कोळसा मंत्रालय, भारत सरकार यांनी परळी-७ (२५० मे. वॅ.), पारस-४(२५० मे. वॅ.), खापरखेडा-५(५०० मे.वॅ.) भुसावळ-४ व ५ (२ ५०० मे.वॅ.) या युनिटसाठी महानदी कोलफिल्डस् लि. येथून कोळसा जोडणी मंजूर केलेल्या आहेत.

कोल इंडिया लि. यांच्या सूचनेप्रमाणे महानिर्मिती कंपनीने दि. ३१.०१.२०१३ रोजी ९.३४४ एम एम टी पी ए कोळसा पुरवठा परळी-७, पारस-४, खापरखेडा-५ व भुसावळ ४ व ५ या युनीटसाठी केला आहे. एम सी एल सोबतच्या इंधन पुरवठा कराराचे तपशील असे:

| प्रकल्प / युनीटचे नाव | क्षमता (मे.वॅ.) | करारातील संख्या (एम एम टी पी ए) |
|---|---|---|
| परळी-७ | २५० | १.२०४ |
| पारस-४ | २५० | १.२०४ |
| खापरखेडा-५ | ५०० | २.३१२ |
| भुसावळ-४ | ५०० | २.३१२ |
| भुसावळ-५ | ५०० | २.३१२ |

१ एप्रिल २००९ ते ३१ मार्च २०१५ या काळात कार्यान्वित झालेल्या नव्यावीज केंद्राकरिता वार्षिक कोळसा वाटपाच्या ट्रिगर लेव्हलच्या ८० टक्क्याच्या सुधारित करार दिला आहे. इंधन पुरवठच्याच्या मसूद्याप्रमाणे वर्ष २०१२-१३, २०१३-२०१४ व २०१४-१५ देशांतर्गत कोळशाचा पुरवठा वार्षिक कंत्राटातील संख्येपेक्षा ६५ टक्क्यांनी, २०१५-१६ मधे ७० टक्क्यांनी व २०१६-१७ नंतर ७५ टक्क्यांनी वाढेल. मात्र हे कोळशाच्या उपलब्धतेवर अवलंबून असते. उर्वरित संख्या आयात कोळशातून पुरविली जाईल.

## ६. महानिर्मितीला दिलेल्या कोळसा खाणी :

- कोळसा मंत्रालयाने ओरिसामधील मच्छाकाटा व महानदी या खाणी महानिर्मिती व गुजरात राज्य विद्युत कंपनी लि. यांना संयुक्तपणे दिल्या आहेत. या खाणीतील कोळसा महानिर्मिती व जी एस ई सी एल या कंपन्यांनी अनुक्रमे ६०:४० या गुणोत्तरात वाटून घ्यावयाच्या आहेत.
- मच्छाकाटा खाणीतील कोळसा नव्याने उभारलेली वीज केंद्रे म्हणजे कोराडी (३×६६० मे. वॅ.), चंद्रपूर (२×५०० मे. वॅ.), धोपावे (३×६६० मे. वॅ.), परळी-८ (बदललेले) - २५० मे वॅ. आणि भुसावळ - ६ (बदललेले) ६६० मे. वॅ. येथे वापरला जाईल.
- महानिर्मिती येथील ३८९० ही वाढ केलेली क्षमता मच्छाकाटा (ओरीसा राज्य) कोळसा खाणीशी संलग्न आहे. त्यापैकी ३२३० मे. वॅ. ची कामे, चंद्रपूर (२×५०० मे. वॅ.), कोराडी (३×६६० मे. वॅ.) व परळी (२५० मे. वॅ.) येथे बांधकामे सुरू झाली आहेत.
- मच्छाकाटा कोळसा खाणी विकसित करण्याच्या कामास विलंब झाला कारण ओरीसा राज्य शासनाच्या पोलाद व खाण विभागाकडून जमीन संपादन करून देण्यास उशीर झाला. आत्तापर्यंत एक वर्षापेक्षा अधिक काळ विलंब झाला आहे व जमीन संपादनास आणखी विलंब होईल अशी भीती आहे. त्यामुळे कोळसा उत्पादनास उशीर लागेल.

  महानदी खाणीतील कोळसा नव्या दोंडायचा टप्पा २ (३×६६० मे. वॅ.) प्रकल्पास वापरण्याचे प्रस्तावित केले आहे.
- चेंदीपाडा -१ व चेंदीपाडा -२ या कोळसा खाणीची संयुक्त वाटणी महानिर्मिती, छत्तीसगड खनीज विकास महामंडळ, (सी एम डी सी एल) आणि उत्तर प्रदेश राज्य विद्युत निगम लि. यांच्यात करण्यात आली आहे. महानिर्मितीला येथून २९४.५ एम एम टी कोळसा मिळेल. तो दोंडायचा औ. वि. केंद्र टप्पा -१ (२×६६० मे. वॅ.) या नव्या केंद्रासाठी वापरण्यात येईल.
- कोळसा उत्पादनातील उपरोक्त अडथळे व विलंब यावर मात करण्यासाठी महानिर्मितीने केंद्रिय विद्युत प्राधिकरण यांना विनंती केली आहे की, मच्छाकाटा कोळसा खाणीशी संलग्न असणाऱ्या प्रकल्पासाठी योग्य जोडणी द्यावी. यासाठी आवश्यक असलेली सर्व माहिती सी इ एच्या विहित नमुन्यात या टोकाच्या जोडणीच्या सुधारीत वेळापत्रकासह सी इ एल ला सादर केली आहे व हे प्रकरण विचाराधीन आहे.

  महाजनवाडी कोळसा खाण :
- कोळसा मंत्रालयाने महाजन वाडी खाण महानिर्मिती व जी एस इ सी एल यांना संयुक्तकपणे दिली आहे; त्यात ५०:५० या गुणोत्तरात कोळसा वाटप होईल. शासकीय कंपन्यांना कोळसा खाणी इ निविदा द्वारे स्पर्धात्मक बोली देण्याचे नियम २०१२ या अंतर्गत वाटप झाले. या खाणीत सुमारे ३४० एम एस टी एवढा कोळसा साठा आहे. महाजनवाडी खाणींना महानिर्मितीचे पारस-४ व नाशिक (बदल) हे प्रकल्प जोडले आहेत.

## ७. कोळसा मिळविण्यासाठी विविध अन्य पर्याय :

महानिर्मिती कंपनीतील कोळशाची तूट भरून काढण्यासाठी खालील पर्यायाच शोध घ्यावा लागत आहे.

- **गारे पालमा सेक्टर दोन येथील कोळसा :** कोळसा मंत्रालयाने गारे पालमा सेक्टर दोन येथील कोळसा खाण संयुक्तकपणे

तामीळनाडू राज्य विद्युत मंडळ (टी एम ई बी) आणि मे. महाराष्ट्र राज्य खनीज महामंडळ लि. (एम एस एम सी एल) यांना दिली आहे. विवरणाच्या पत्राप्रमाणे मे. एम एस एम सी एल चा कोळसाच्या वाटा १७५ एम टी असेल. या खाणीतील योग्य साठा १२० ते १४० दशलक्ष टन असून खाणीचे आयुष्य ३० वर्षे आहे. त्याचा विचार करता तेथून ५.४३ एम टी पी ए एवढे उत्पादन होईल.

- एम एस एम सी ने गारे पालमा सेक्टर दोनच्या त्यांच्या वाट्याचा कोळसा महानिर्मितीला कॉस्ट प्लस तत्वावर देऊ केला आहे. महानिर्मितीने हा कोळसा वीज निर्मितीच्या कामासाठी स्वीकारण्याची तयारी दर्शविली आहे. महानिर्मितीने प्रधान सचीव (उद्योग) महाराष्ट्र शासन यांनाही तसे कळविले आहे.
- **महाराष्ट्रातील कोळसा खाणी :** राज्य शासनासे नांदोरी कोंडा हरडोली, वणी आळेसूर, येकोना १ व २, महाडोली येवती कोळसा खाण (एकूण कोळसा साठा २३३ एम एम टी) याचे आरक्षणाचे प्रस्ताव मागे घेण्याचे ठरविले असून ते साठे महानिर्मितीला दिले जातील. महानिर्मिती हे साठे आपल्याला मिळावे यासाठी कोळसा मंत्रालयाचा पाठपुरावा करीत आहे. त्यामुळे महानिर्मितीच्या प्रकल्पाची कोळशाची गरज भागेल तसेच इंधनाची सुरक्षाही मिळेल.
- डब्ल्यू सी एल, एस इ सी एल, एस सी सी एल आणि एम सी एल येथे इ–निविदा कोटा किंवा इ–निविदा बोली करून कोळसा मिळविण्याचे प्रयत्न चालू आहेत.
- **रेल्वे – समुद्र – रेल्वे मार्गे कोळशाचे वहन :** महानदी कोलफिल्डस् लि. येथून महानिर्मिती कंपनीला अपुऱ्या प्रमाणात कोळसा येतो. एम सी एल चा बी व्हॅली येथून काढलेल्या कोळशाची रेल्वे वाहतूक जिकरीची आहे व त्यामुळे तेथील कोळसा प्रत्यक्षात मिळणे अवघड आहे.

  उपरोक्त रेल्वे मार्गाच्या दाटीमुळे, एम सी एल चा कोळसा रेल्वे–समुद्र–रेल्वे अशा मार्गाने आणण्याच्या शक्यता महानिर्मिती अजमावून पहात आहे.

**८. उरण जीटीपीएस साठी गॅसचा पुरवठा :**

- महानिर्मितीने गॅसची विक्री व वाहतूकीचा करार मे. जी ए आय एल् लि. सोबत केला आहे. त्यानुसार जी टी पी एस उरण प्रकल्पास ३.५ एम एम एस सी डी एम एवढा नैसर्गिक वायू पुरवठा केला जाईल. मात्र मे. गेलचा नैसर्गिक वायूचा (ए पी एम) पुरवठा हा मे. ओ एन जी सी च्या वायू उपलब्धतेनुसार अस्थिर असतो.
- महानिर्मितीने जी टी पी एस उरणला नैसर्गिक वायू मिळावा म्हणून मे. आर आय एल व मे. एनआय् के ओ (निको) या कंपन्यांसाठी १.२ एम एम एस सी एम डी एवढा वायू मिळण्यासाठी वायू पुरवठा व खरेदीचा करार केला आहे. महानिर्मितीने मे. रिलायन्स गॅस इन्फ्रास्ट्रक्चर लि. सोबत वायू वाहतूकीचा करार केला आहे. त्यानुसार काकीनाडा ते जीटीपीएस उरण व्हाया मसकल अशी पूर्व–पश्चिम पाईपलाईनीमधून वायू पुरवठा होईल. त्यावर इडब्ल्यू पी एल (आर जी टी आय एल) व डी यू पी एल (गेल) स्पर पाईपलाईन यथे जोडणीचे पॉइंटस् असतील. मार्च २०१३ पासून आर आय् एल के जी डी – ६ वायू उपलब्ध नाही. व वाहतूकीसाठी आर जी टी आय एल व गेल यांच्यासह केलेली आरक्षण वापरले जात नाही. आ. वर्ष २०१२–१३ मध्ये एकूण ८८५.७२६ एम एम एस सी एम डी इतका वायू मिळाला (गेल कडून ७६२.२३४ एम एम एस सी एम डी वायू आणि आर आय एल कडून १२३.४९ एम एम एस सी एम डी वायू) म्हणजेच सरासरी वायू प्राप्ती २.४ एम एम

एस सी एमडी या दराने झाला आणि वर्ष २०१३-१४ मध्ये सरासरी ए पी एम वायूची नोव्हेंबर २०१३ पर्यंतची प्राप्ती फक्त २.५ एम एम एससीएमडी या दराने झाली.

## मानव संसाधन व्यवस्थापन :

कोणत्याही संस्थेचे कर्मचारी ही सर्वात महत्वाची मौल्यवान मालमत्ता आहे. त्यांची सर्जनशीलता, नवीन शोधण्याची वृत्ती, कल्पक कामगिरी यांना प्रोत्साहन मिळेल असे अनुकूल वातावरण त्यासाठी आवश्यक असते. आपल्या कंपनीने कर्मचाऱ्यांची कार्य क्षमता वाढ करण्यासाठी आणि त्यांना समर्थ, प्रशिक्षित करण्यासाठी प्रयत्न केले तसेच आव्हानात्मक जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी महानिर्मिती कंपनीने मानवी हक्क भांडवल हे बहुविध कार्य शाखांमध्ये कुशल व्हावेत यावर लक्ष केंद्रित केले. आपल्या कंपनीचा असा खात्रीचा विश्वास आहे की, संघटनात्मक श्रेष्ठत्वाचे ध्येय गाठणे तिच्या मानवी संसाधनातून साध्य होईल. त्यासाठी सर्वप्रथम लोक असे तत्व अंगीकारून तिच्या कर्मचाऱ्यांचे सामर्थ्यातून  कंपनीचा व्यवसाय केला जातो.

## औद्योगिक संबंध :

वर्षभरात कंपनीत कर्मचारी संबंध स्नेहाचे व सुसंवादाचे होते. कामाची स्थिती, कर्मचारी कल्याण या क्षेत्रात सहभागी होण्यास कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देण्यात येते. प्रकल्पातील कर्मचाऱ्यांच्या प्रतिनिधींसाठी कार्यशाळा सर्व स्तरावर आयोजित केल्या जातात व त्यात कंपनीच्या व्यवसायाचे बदलते स्वरूप, संधी, धोके आणि आव्हाने याची जाणीव करून दिली जाते.  एकंदरित औद्योगिक संबंध यावर्षी शांततापूर्ण सुसंवादाचे व परस्पर विश्वासाचे होते.

कंपनीच्या कोणत्याही कर्मचाऱ्याचे परिश्रमिक ₹ ६,०००,०००/- प्रतिवर्ष किंवा ₹ ५००,०००/- प्रतिमाह किंवा त्याहून जास्त नव्हते. ही माहिती कंपनी अधिनियम १९५६ चे कलम २१७ (२ए), ज्याचे वाचन कंपनी (कर्मचाऱ्यांची माहिती) नियम १९७५ सोबत केले जाते, त्यानुसार ही माहिती येथे प्रकट केली जाते.

## संचालक :

श्री. अजय मेहता, प्रधान सचिव (ऊर्जा) महाराष्ट्र शासन यांची कंपनीचे संचालक पदी, श्री. व्ही. के. कानडे यांचे जागी दि. ३० नोव्हें. २०१२ पासून नियुक्ती झाली.

श्री. विजय सिंह यांची संचालक (संचलन) या पदावर दि. २८ ऑगस्ट २०१३ पासून श्री. एम. जी. वाघमोडे संचालक (संचलन) यांनी राजीनामा दिल्यामुळे, त्यांचे जागी नियुक्ती झाली.

श्री. सी. एस. थोटवे यांची संचालक (प्रकल्प) या पदावर दि. २८.०८.२०१३ पासून नियुक्ती झाली.

श्री. एस. ए. एम. नकवी यांची संचालक (वित्त) या पदावर दि. २६.१२.२०१२ पासून नियुक्ती झाली होती. मात्र त्यांची अन्य शासकीय विभागात बदली झाल्याने त्यांनी संचालक (वित्त) पदाचा राजीनामा दिला.

सर्वश्री व्ही. के. कानडे, श्री. एस. ए. एम. नकवी आणि श्री. एम. जी. वाघमोडे यांनी दिलेल्या मौलिक सेवेबद्दल संचालक मंडळ त्यांचेबद्दल प्रशंसा नोंदवित आहे. तसेच मंडळावर येणाऱ्या नव नियुक्त संचालकांचे मन:पूर्वक स्वागत करीत आहे.

## लेखा परिक्षण समिती :

महानिर्मिती कंपनीने एका लेखा परिक्षण समितीची रचना केली आहे. या समितीचे सदस्य पदी सर्वश्री पी. व्ही. पागे, श्री. जे. के श्रीनिवासन्

संचालक वित्त (प्रभारी), आणि श्री. विजय सिंह, संचालक (संचलन) हे आहेत. वर्ष २०१२-१३ मधे लेखा परिक्षण समितीच्या चार बैठका झाल्या.

## संचालकांच्या जबाबदारीचे निवेदन :

कंपनी अधिनियम १९५६ चे कलम २१७ ( २ एए) यातील आवश्यकतेनुसार, संचालकाच्या जबाबदारी संबंधिचे निवेदन खालील प्रमाणे आहे.

१) कंपनीचे वार्षिक लेखे तयार करताना लागू असणाऱ्या लेखा मानकाचे अनुसरण करण्यात आले आहे व जर कोठे प्रत्यक्ष विचलन झाले असेल तर त्यासाठी योग्य असे स्पष्टीकरण जोडले आहे.

२) निवडलेल्या लेखा विषयक धोरणांचा वापर सातत्याने करण्यात आला. तसेच दि. ३१ मार्च २०१३ रोजी कंपनीच्या स्थितीचे सत्य व रास्त चित्र दिसावे यासाठी योग्य व सूज्ञ असे न्याय्य निर्णय व अंदाज करण्यात आले.

३) संचालकांनी कंपनीच्या मत्ता यांच्या रक्षणासाठी तसेच लबाडी व अन्य अनिमितता यांना आळा घालणे व त्या शोधून काढणे याासाठी कंपनी अधिनियम १९५६ च्या तरतूदीनुसार आवश्यक लेखांचे दस्तऐवज जतन करण्यासाठी योग्य व पुरेशी काळजी घेतली आहे.

४) ३१ मार्च २०१३ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचे वार्षिक लेखा एका कार्यरत संस्थेच्या तत्वानुसार तयार करण्यात आले.

## ऊर्जा संवर्धन, तंत्रज्ञानाचा अंगिकार व परकीय चलनातील मिळकत आणि खर्च :

कंपनीअधिनियम १९५६ च्या कलम २१७ (१) (इ) ज्याचे वाचन कंपनी (संचालक मंडळाच्या अहवालात विशेष माहितीचे प्रकटन) नियम १९८८ सोबत केले जाते, यातील आवश्यकतानुसार ऊर्जेचे संवर्धन करणे, तंत्रज्ञानाचा अंगीकार करणे व परकीय चलनातील मिळकत व खर्च याची माहिती, या अहवालाचा भाग असलेल्या जोडपत्र 'अ' येथे दिली आहे.

## सांविधिक लेखा परिक्षण यांची निरीक्षणे / अभिप्राय यांना उत्तरे

सांविधिक लेखा परिक्षक यांची निरिक्षणे व अभिप्राय यांना कंपनी व्यवस्थापनाची उत्तरे जोडपत्र 'ब' येथे दिली आहेत.

## मुदतीच्या ठेवी :

कंपनीने या अहवालाच्या वर्षात जनतेकडून कोणत्याही मुदतीच्या ठेवी मागविल्या नाहीत / प्राप्त झालेल्या नाहीत.

## खर्च लेखा परिक्षक :

कंपनीचे ३१ मार्च २०१३ रोजी संपणाऱ्या वर्षासाठी खर्च लेखा परिक्षक म्हणून मे. डी. व्ही. जोशी अँड कंपनी आणि मे. एस. आर. भार्गवे अँड कंपनी, खर्च लेखापाल यांची नियुक्ती, कंपनी व्यवहार मंत्रालय, भारत सरकार यांच्या मंजूरीच्या अधीन राहून केली आहे. खर्च लेखा परीक्षण अहवाल वित्तीय वर्षे २०१२-१३ चा दिनांक ५/१२/२०१३ रोजी एम सी ए ला सादर केला.

## लेखा परिक्षक :

भारताचे लेखा नियंत्रक व महालेखापरिक्षक हे कंपनीचे सांविधिक लेखा परिक्षकांची नियुक्ती करतात. आर्थिक वर्ष २०१३-१४ साठी मे. बोरकर अँड मुझूमदार, मुंबई, मे. एम. पी. चितळे अँड कं. मुंबई आणि मे. उम्मेद जैन अँड कं. मुंबई यांची संयुक्त सांविधिक लेखा परिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

## ऋणनिर्देश

कंपनीला मदत व सहकार्य करणारी केंद्र व राज्य शासनाची विविध मंत्रालये, विभाग, संस्था, वित्तीय संस्था व बँका, सांविधिक लेखापरिक्षक, खर्च लेखा परिक्षक, भारताचे लेखा नियंत्रक व महा लेखापरिक्षक नवी दिल्ली, महालेखापाल (वाणिज्य) मुंबई, केंद्रीय व राज्य विद्युत नियामक प्राधिकारी, अपील न्यायाधिकरण आणि कंपनीचे भागधारक यांना त्यांच्या सहकार्याबद्दल संचालक प्रशंसापूर्ण कृतज्ञता व्यक्त करीत आहेत. कंपनीचे कर्मचारी यांनी दिलेल्या तळमळीच्या व समर्पित वृत्तीच्या सेवेबद्दल त्यांना धन्यवाद देत आहे.

संचालक मंडळाच्या वतीने

आशिष शर्मा
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

दिनांक : २५.०२.२०१४
स्थळ : मुंबई.

# संचालक अहवालाचे जोडपत्र 'अ'

**कंपनी (संचालक मंडळाच्या अहवालात तपशीलाचे प्रकटन करणे) नियमावली १९८८ नुसार आवश्यक असणारे तपशील :**

## अ) ऊर्जा संवर्धन

वर्ष २०१२-१३ मधे ऊर्जा संवर्धनाची खालील कामे करण्यात आली.

- कंपनीमध्ये ऊर्जेचे अंतर्गत अंकेक्षण संबंधी क्षेत्रात म्हणजे कॉम्प्रेस्ड एअर, फीड वॉटर, कुलींग वॉटर सिस्टम, हिटर्स इ. ठिकाणी करण्यात आले.
- वीज निर्मिती केंद्रातील कर्मचाऱ्यांची जागरूकता वाढावी म्हणून कर्मचारी सतर्कता / प्रशिक्षणाचे कार्यक्रमाचे आयोजन केले.
- ऊर्जा संवर्धनाची जाणीव, भित्तीपत्रके, निबंध स्पर्धा आदि प्रकारे निर्माण करण्यात आली.
- महानिर्मिती कंपनीकडे ऊर्जा अंकेक्षण करणारे व प्रमाणित ऊर्जा व्यवस्थापक आहेत. त्यांच्या ज्ञानाचा उपयोग केंद्राच्या संचालन व सुव्यवस्थेच्या दैनंदिन कामात केला जातो.

**साह्यकारी विजेचा वापर :**

- साह्यकारी वीजेच्या वापराचे अचूक मूल्यमापन करण्यासाठी ०.२ वर्गातील ऊर्जा मापन यंत्रे (मीटर्स) वापरले जातात.
- दिवसा सूर्यप्रकाशाचा जास्तीत जास्त उपयोग केला जातो.
- ऊर्जेचे कार्यक्षम वापर करणारे दिवे वापरून प्रकाश योजनेत सुधारणा
- कॉम्प्रेस्ड एअर, स्टीम पाईप, कुलींग पॉवर व विजेच्या यंत्रणेतील वीज गळतीला प्रतिबंध केला जातो.
- डी. एम. वॉटर फ्लो मिटर्स स्थापित केले.
- उरण येथील जी. टी. युनीटसाठी नैसर्गिकरित्या थंड करण्याची व्यवस्था
- सहाय्यक वीज वापराचे रक्षण करणारे देखभालीचे वेळापत्रक व स्थीतीवर लक्ष ठेवणे.

**प्रकाश योजना**

- एच पी एम व्ही दिवे बदलून एच पी एस व्ही दिवे
- इलेक्ट्रॉनिक बलास्ट व सी एफ एल प्रकाश साधनांचा वापर
- इमारतींचे जीने, टर्बाइन बेसमेन्ट एरिया या जागेत वाापरापुरते चालू / बंद करता येईल असे प्रकाशाचे वेगवेगळे स्वीचेस पुरविण्यात येतात.

**उष्णता ऊर्जा**

- ऑनलाईन कंडेसर ट्यूब क्लिनिंग सिस्टमवर योग्य लक्ष देणे
- उष्णता रोधकांची वेळेवर दुरुस्ती

- एअर प्री हिटर्स व भट्ट्या यांची शक्य तेवढी स्वच्छता
- बॉयलर एक्सेस एअरचा जास्तीत जास्त वापर
- उष्णता दराचे एस ई / जी एम / सी जी एम स्तरावर अनुक्रमे साप्ताहिक / पंधरवड्याला / मासिक अनुबोधन करणे.

**वंगण**

- सर्व वीज केंद्रात शून्य गळतीची संकल्पना सुरु केली
- गळणारे इंधन तेल पुन: मिळविण्यासाठी ऑइल स्कीमर्सची रचना व विकास
- भुसावळ व नाशिक केंद्रात टर्बाइन व बी एफ पी तेलाचे केंद्रवर्ती पद्धतीने गाळून घेणे

**डी एम वॉटर**

- डी एम वॉटर फीड लाईन व स्टीम यांची गळती रोखण्यास प्राधान्य दिले.
- खापरखेडा औष्णिक वीज केंद्रात सोनिक बॉयलर डिटेक्शन सिस्टीमची स्थापना

**संकीर्ण पाणी वापर**

- कोराडी, नाशिक, खापरखेडा, चंद्रपूर या केंद्रातील कोळशाच्या राखेच्या पाण्याचा पुनर्वापर केला जातो
- आग विझविण्यासाठी लावलेले पाण्याचे नळ पूर्वी जमीनीच्या आत असत. त्यातील गळती वेळेवर दुरुस्त करता यावे म्हणून जमीनीच्या वर लावण्यात आले.

### ब. तंत्रज्ञान समाविष्ट करणे

अ) फॉर्म 'बी' नुसार तंत्रज्ञान समाविष्ट करण्याचे प्रयत्न केले जातात.

## फॉर्म 'बी'

समावेशना संबंधीच्या माहितीचे प्रकटन

- अमोनिया इंजक्शन फब्यू गॅस कंडिशनींग सिस्टीम (ए एफ एमजी) स्थापन केली.
- परळी युनीट-३ येथील संचालक प्रणाली दर्जा उंचावला.
- महानिर्मिती मुख्यालय व वीज केंद्रात 'इ' निविदा संकल्पना राबविली.

### संशोधन व विकास

**१. कंपनीने संशोधन व विकासाचे कार्य सुरू केलले विनिर्देशित क्षेत्र**

कुलींग वॉटरचे आझोनायझेशन, ए एफ जी सी सिस्टम, उरण येथे आयलॅडींग व ब्लॅक स्टार्ट सुविधा, निरॅफॉन ॲकॉस्टिक क्लिनींग सिस्टम ट्यूब गळती शोधण्याची यंत्रणा, कोळसा गिरण्यांसाठी एम पी एस पी प्रणाली अंगीकारणे, तेल गाळणे व तेल कमी वापरणारी यंत्रे वापरणे, सांडलेले तेल पूनर्वापरासाठी गोळा करणे इ.

२. **वरील संशोधन व सुव्यवस्थेचे लाभ :**

**ओझोनायझेशन :** कार्य परंपरागत पद्धतीपेक्षा कमी खर्चात होते. धातूंची झीज कमी होते, हाताळणे सुरक्षित असते. कुलींग वॉटर सिस्टम मध्ये लिजीओनेला जंतूचा स्तर नष्ट केला जातो.

**ए एप जी सी :** प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रमाणकांच्या आवश्यकतेनुसार औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रातील एस पी एम चा स्तर १५० एम जी / वन एन एम पेक्षा कमी राखण्यात येतो.

**आयलँडिग सिस्टम :** जर प्रणालीत अथडळे आले / बंद पडली तर ती वेगळी करण्याची योजना लवकरच कार्यरत होईल. त्यामुळे जी टी पी एस ची स्थानिक व वीज जाळ्यापासून वेगळे केले जाते.

**ब्लॅक स्टार्ट सुविधा :** जर वीज जाळ्याला काही धक्का बसला अथवा ते अलग होऊ शकले नाही तर ब्लॅक स्टार सुविधेमुळे युनिट्स पुन्हा पुर्वस्थितीत आणून वीज पुरवठा पूर्ववत करण्याचे काम लवकर होते.

३. **भविष्यातील योजना :**

ऑनलाईन ऊर्जा व्यवस्थापन स्थापन करण्यासाठी. ए एफ जी सी प्रणाली इतर औष्णिक केंद्रातही लावण्यात येईल.

४. **संशोधन व सुव्यवस्था खर्च :**

'निरंक'

## तंत्रज्ञान समाविष्ट करणे, अंगीकारणे व नवीन संशोधन

१. तंत्रज्ञानाचा समावेश, अंगीकार व नवीन संशोधनाचे प्रयत्न

२. वरील प्रयत्नामुळे मिळालेले लाभ

कंपनीने कोणत्याही आयात केलेल्या तंत्रज्ञानाचा उपयोग केलेला नाही.

## क) परकीय चलनातील मिळकत व खर्च :

अ) निर्यात संबंधी कार्य तसेच निर्यात वाढीसाठी प्रयत्न, उत्पादनात व सेवेस नवीन निर्यात बाजारपेठ विकसीत करणे व निर्यात योजना.

ब)

| वापरलेले / कमवलेले एकूण परकीय चलन | | ₹ |
|---|---|---|
| १. | परकीय चलनातील खर्च | |
| | अ) सी. आय. एफ. तत्वांवर मोजणी केलेल्या भांडवली मालाचे | निरंक |
| | मालाचे मूल्य, घटक व सुट्टे भाग | ₹ ४६,५९६,८१६/- |
| | ब) खर्च | |
| | प्रवास खर्च | निरंक |
| २. | कमवलेले परकीय चलन | निरंक |

# जोडपत्र 'ब१'

## आर्थिक वर्ष २०१२-१३ च सांविधिक लेखापरिक्षक यांचा अहवाल व त्यास व्यवस्थापनाने दिलेली उत्तरे

| सांविधिक लेखा परिक्षकांचे अहवाल | व्यवस्थापनाची उत्तरे |
|---|---|
| **वित्तीय विवरण पत्रावर अहवाल** | |
| आम्ही, महाराष्ट्र राज्य वीज निर्मती कंपनी लि. या कंपनीच्या सोबत जोडलेल्या वित्तीय विवरण पत्रांचे लेखा परिक्षण केले आहे. या पत्रांमध्ये कंपनीचे दि. ३१ मार्च २०१३ रोजीचा ताळेबंद , त्या दिवशी संपलेल्या आर्थिक वर्षाचे नफा व तोटा पत्रक आणि रोकडता प्रवाह या विवरण पत्रांचा, तसेच महत्वाची कंपनी धोरणे व तर स्पष्टीकरणे या माहितीचा समावेश आहे. | वस्तूस्थिती |
| **वित्तीय विवरणासंबंधि व्यवस्थापनाची जबाबदारी** | |
| कंपनी अधिनयम १९५६ (सदर कायदा)यातील कलम २०११चे उपकलम स्थिती, विज संबंधीत कामिगीरी आणि रोकडता प्रवाह यांचे सत्य व योग्य दर्शन घडिवणारी वित्तीय विवरण पत्रे तयार करणे ही कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. या जबाबदारीमध्ये लबाडी किंवा चुका यामुळे होऊ शकणाऱ्या माहितीच्या सदोष विवरणापासून मुक्त असलेली वित्तिय विवरण पत्रे तयार करुन ती योग्यप्रकारे सादर करण्यासाठी अंतर्गत नियंत्रणाचि रचना व अंमलबजावणी करणे व तिचे व्यवस्थापन करणे, या कृतींचा समावेश आहे. | वस्तूस्थिती |
| **लेखापरिक्षकांची जबाबदारी** | |
| या वित्तीय विवरण पत्रांचे , लेखा परिक्षण करुन त्याबाबत अभिप्राय व्यक्त करावेत, ही आम्हा लेखा परिक्षकांची जबाबदारी असते. आम्ही आमचे लेखापरिक्षण , भारताची सनदी लेखापाल संस्था (इन्स्टीटयुट ऑफ चार्टड अकांऊन्टस ऑफ इंडीया) या संस्थेने तयार केलेल्या लेखा परिक्षणांच्या मानकानुसार केले आहे. लेखा परिक्षणांचे नियोजन व कामगिरी पूर्ण करताना आम्ही या मानकांत दिलेल्या नैतिक गरजांचे अनुपालन करावे जेणेकरुन सदर वित्तीय विवरणपत्रे कोणत्याहि प्रत्यक्ष सदोष विवरणापासून मुक्त आहेत. अशी तर्कशुद्ध हमी मिळाले पाहिजे; अशी अपेक्षा असते.<br><br>या विवरण पत्रातील रकमा व प्रकटने याबाबत लेखा परिक्षणासाठी योग्य असे पुरावे मिळविणे या उद्देशातुन लेखा परिक्षण केले जाते. यासाठी निवडलेली कार्यपद्धती लेखा परिक्षकाच्या न्याय बुद्धीवर अवलंबून असते. त्यात विवरण | वस्तूस्थिती |

| सांविधिक लेखा परिक्षकांचे अहवाल | व्यवस्थापनाची उत्तरे |
|---|---|
| पत्रातील प्रत्यक्ष माहिती लबाडीने किंवा नजरचुकीने झाली आहे किंवा कसे या बाबतच्या धोक्यांचे मुल्यमापण समाविष्ट असते. या धोक्यांचे मुल्यमापन करताना कंपनीने परिस्थितीनुसार वित्तीय विवरण विवरणपत्रे योग्यप्रकारे तयार करण्यासाठी व त्यांच्या सादरीकरणासाठी अवलंबिलेल्या लेखा परिक्षणाच्या अंतर्गत नियंत्रणाचा विचार, लेखा परिक्षकांकडून केला जातो. ही कार्यपद्धती परिस्थितीनुसार योग्य असण्याबद्दल ही विचार केला जातो. तसेच कंपनीने अवलंबलेल्या लेखा धोरणांची उपयुक्तता, व्यवस्थापनाने केलेल्या लेखाविषयक अंदाजाचे प्रमाण व वित्तीय विवरण पत्रांच्या एकंदर सादरीकरणाचे मुल्यांकन यांचाही विचार लेखापरिक्षणात केला जातो. आम्हास पात्रतेनुसार लेखा परिक्षणाचा अभिप्राय व्यक्त करता यावा, या दृष्टीने आम्ही मिळविलेले लेखापरिक्षणाविषयीचे पुरावे, पुरेसे होते असा आम्हाला विश्वास आहे. | |
| **पात्र अभिप्रायांचा आधार**<br><br>१) *महाराष्ट्र विद्युत सुधारणा हस्तांतरण योजना २००५, अनुसार मत्ता व दायित्वे कंपनीकडे हस्तांतरीत झाली. त्यात काही बाबी शिल्लक आहेत. आम्हास दिलेल्या माहितीनुसार, ह्या शिल्लकबाबी मराविमं सूत्रधारी कंपनीकडे असून त्या अद्याप (महानिर्मिती) कंपनीकडे सोपिवण्याचे बाकी आहे. आम्हास असेही सांगण्यात आले की, महाराष्ट्र शासनाकडून अंतिम हस्तांतरण योजना अद्याप अधिसुचित व्हायची आहे. त्याप्रमाणे आरंभीच्या शिल्लकी बाबी कंपनीकडून स्वीकारवायाच्या आहेत. शिल्लकी बाबींमध्ये जर काही बदल झाला, तर त्याचा प्रभाव महानिर्मती कंपनीच्या वित्तीय विवरणपत्रांवर होऊ शकेल. याशिवाय आम्ही टिपा क्र. २ व त्यावरील व्याज यानुसार महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि. यांचे कडून पूर्वीच्या वर्षातील हस्तांतरीत होणाया व्याजासह कर्जाचे दायित्व याकडे निर्देशन करतो. योजनेच्या अंशतः सुधारणेत ही बाद मराविमं सुत्रधारी कंपनी लि. ने मान्य केली आहे.* | अंतीम हस्तांतरण योजना महाराष्ट्र शासनाच्या कृतिशील विचाराधीन आहे. हा योजनेचे आ. वर्ष २०१२-१३ मधे अंतीमीकरण होईल अशी अपेक्षा आहे. महाराष्ट्र शासनाकडून अंतिम अधिसूचना निघाल्यानंतर आरंभीच्या शिलकीवर होणाऱ्या बदलांचा आवश्यक तेथे मंजूरी घेऊन त्या लेखा पुस्तकात नोंदण्यात येतील. |
| २) *टिपा क्र. ३१ यात नमुद केल्यानुसार किरकोळ ऋणकोंकडील बाकी, कर्जे व अग्रीमे, अनामती, उप कंत्राटादारांकडील सामग्री, किरकोळ धनकोंकडील शिल्लक निधी, मालच्या पुरवठ्याची दायितवे, आंतर गट कंपन्यांच्या शिल्लकी, ग्राहकांकडील आग्रीमे, व कोळसा कंपन्यांना दिलेली अग्रीमे व यासाठी केलेल्या तरतुदी, या सर्व बाकी संबंधीत व्यक्ती/संस्था यांचेकडून निश्चित होणे व / किंवा त्यांचा उपकंपन्यांच्या नोंदीनुसार मेळ घालणे याच्या प्रकरणानुसार अधित आहेत. अशी निश्चिती आणि मेळ घालणे प्रलंबित असल्यामुळे, परिणाम कारक समायोजन करता आलेले नाही. यामुळे नंतर जर* | किरकोल ऋणको, कर्ज व अग्रीमे, अनामती, उपकंत्राटदारांकडील सामुग्री, ठेवून घेतलेल्या पैशांसह, किरकोळ धनको, सामग्री पुरवठ्याचे दायित्व, ग्राहकांकडील अग्रीमे आणि कोळसा कंपन्यांना दिलेली अग्रीमे या सर्व बाबतीत उपप्रकारची लेजर्स (लेखावह्या) तयार करण्याची कामे प्रगतीपथावर आहेत. काही |

| | सांविधिक लेखा परिक्षकांचे अहवाल | व्यवस्थापनाची उत्तरे |
|---|---|---|
| | *काही प्रभाव पडल्यास त्यामुळे या शिल्लकींची स्थिती व कंपनीचा नफा यावर होणाया परिणामांबद्दल मत व्यक्त करण्यास आम्ही असमर्थ आहोत.* | लेखांच्या घटकांना शिल्लक कायम केल्याची फी सुद्धा संबंधितांच्या नावांनिशी दिली आहे. जेथे खूप प्रयत्न करूनही शिलकी खूप जुन्या असल्याने शिलकींची जोडणी होत नाही अशा प्रकरणी ते निर्लेखित करणे किंवा पुनर्लेखन करून त्याबाबत स्वच्छ शिकली तयार करण्यासाठी कार्यवाही केली जाईल. |
| *३)* | *टिपा क्र. ३२ यात नमुद केल्याप्रमाणे, कर्जे व अग्रिमे यामध्ये कोळसा पुरवठाधारकांना दिलेल्या अग्रीमांची रक्कम ₹ १९,०३३,१४२,५७६/- समाविष्ट आहे. या अग्रीमाबद्दल कंपनीने कोळसा पुरवठादारांचे दायित्व या करिता ₹ १९,१४९,५३४,११८/- एवठी तरतूद केली आहे. देयकांची अंतीम मंजुरी प्रलंबित असल्याने कंपनीने भरलेल्या अग्रीमा समवेत या दायित्वाचे निर्लेखन केलेले नाही. यामुळे कंपनीची संबंधित मत्ता व दायित्व यांचे अतिरिक्त विवरण झाले आहे. या उपरिनिर्दिष्ट बाबीचा कंपनीच्या नफ्यावर होऊ शकणा-या परिणामांचे मुल्यमापन केलेले नाही.* | कोळसा उपकंपन्यांना अग्रीमे देणे व त्यांचा निपटारा करणे ही नित्याची बाब आहे. कोळसा भांडाराच्या प्राप्तीच्या टिपांचा निपटारा करणे हे काम पुढे आ. वर्ष २०१३-१४ मधे करण्यात येईल. कोळसा अग्रीमे व कोळशाची दायित्वे यांचा हिशेब चुकता केला व व त्यातून अग्रीमे व दायित्वे यांची पातळी ₹ २,४५० कोटी करून ₹ १,९०० कोटी अशी कमी केली. |
| *४.* | *कंपनीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. (महावितरण) सोबत वीज खरेदी करार केला आहे. त्यानुसार 'वीज विक्रीपासुनचा महसुल' या लेखाशीर्षांतर्गत, 'विलंबित भरण्यावरील व्याजाचा अधिभार' यासाठी ₹ ५,६७०,१२३,०००/- या रक्कमेची देयके महावितरण कंपनी दिली. महावितरणने ही पत्रे सवीकारली नाहीत. महावितरण कंपनी दिली. महावितरने यापूर्वीच्या वर्षात अशा अधिभाराची ₹ २,१४४,०३८,०३७/- या रक्कमेची देयके स्वीकारली नव्हती. महानिर्मिती कंपनी या वर्षातील वरील रकमेसह मागील काही वर्षातील विविध मागणी पत्रांच्या रकमांचा महावितरण समवेत मेळ घालण्याच्या प्रक्रियेत आहे. यातील नक्त फरक ₹ ४८९,७०६,१८८/- आहे.*<br><br>*महावितरण कडून ही देयके स्वीकारणे व लेखांचा मेळ घालणे प्रलंबित असल्याने आम्ही या उत्पन्नाची प्राप्ती तसेच त्याच्या अनुक्रमे*<br><br>*(अ) कंपनीच्या यावर्षीचा नफा, (ब) व्यापाराहून प्राप्त होऊ शकणारे मुल्य, (क) विना देयकांचा महसुल आणि (ड) राखीव व अधिक्य, यांच्यावर होऊ शकणाया परिणाम यावर होऊ शकणाया परिणांमाबाबत अभिप्राय नोंदिवण्यास असमर्थ आहोत. त्याचया परिणामांची मोजणी केलेली नाही.* | महानिर्मितीचे वीज खरेदी करारातील संमत झालेल्या अटी नुसार महावितरणकडे अधिभाराती देयके पाठविली, ती मूळ व वैध प्राप्ती योग्य आहेत. याउलट ह्या देयकांचा लेखा झाला नसल्यामुळे खर्च आणि दायित्वे याची त्याप्रमाणात महावितरणकडून कमी लेखा नोंद झाली. |

| सांविधिक लेखा परिक्षकांचे अहवाल | व्यवस्थापनाची उत्तरे |
|---|---|
| **अभिप्राय**<br><br>*आमच्या मतानुसार आणि आम्ही सर्वोतपरी प्रयत्नाने मिळविलेली माहिती व त्यानुसार आम्हास दिलेली स्पष्टिकरणे, यानुसार तसेच वरील 'पात्र अभिप्रायांचा आधार' यातील परिच्छेद (१ते ४) यात ज्याची मोजणी करता येत नाहीत अशा बाबींच्या अधीन राहून आम्ही नमूद करतो की, संबंधित कायद्यानुसार आवश्यक असणारी व त्यातील पद्धतीनुसार ही वित्तीय विवरणेपत्रे, भारत देशात सर्वसाधारणपणे सर्वमान्य असलेल्या लेखाधोरणांशी सुसंगत राहून, खालीलप्रमाणे कंपनीने सत्य व योग्य दर्शन सादर करतात.*<br><br>*(अ) **ताळेबंद संबंधी** - कंपनीच्या व्यवहारांची स्थिती दि. ३१ मार्च २०१३ रोजी नुसार आहे.*<br><br>*(ब) **नफा व तोटा यांचे विवरणपत्र** - सदर तारखेला संपलेल्या वर्षाचा नफा दर्शविते.*<br><br>*(क) **रोकडता प्रवाह विवरन पत्र** - सदर तारखेला संपलेल्या दिवशीचा रोकडता प्रवाह दर्शविते.* | वस्तूस्थिती |
| **लक्षवेधी प्रकरणे**<br><br>आमच्या अहवालाच्या पात्रतेला बाधा न पोहचविता आम्ही खालील बाबिंकडे लक्ष वेधतो.<br><br>(अ) टिपा क्र. ३७(डी) : लेखा मानक १९ अंतर्गत आवश्यक असणाऱ्या माहितिच्या अप्रकरना संबंधी ही, टिपा आहे.कंपन्याचि (लेखा मानके) नियमावली २००६ अंतर्गत विविध जल विद्युत निर्मितीच्या सुविधां बाबत, महाराष्ट्र शासनाशी केलेल्या करारांची कार्यवाही प्रलंबित असणे.<br><br>(ब) टिपा क्र. ३७(ए)(२): आवश्यक तो तपशील व माहिती यांच्या अभावी सि पी एफ च्या हंगामी लेखांवर आधारलेल्या व्याजांच्या तुटीचा लेखा या संबंधी. | <br><br><br><br>महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या जल विद्युत केंद्राची भाडेपट्टी निश्चित करणे याकरिता मा.म.वि. नि. आयोग यांच्या आदेशानुसार, भाडेपट्टीचा लेखा केला.<br><br>भविष्य निर्वाह निधीच्या गुंतवणूकीचे विमागणिती मूल्यांकन करता आलेले नाही; कारण मूल्यांकनासाठी आवश्यक असणारा तपशील / माहिती भविष्य निर्वाह निधीचे विश्वस्त यांचेकडे नाही. सदर विश्वस्त हा आवश्यक तपशील देण्यास असमर्थ आहेत. |

| सांविधिक लेखा परिक्षकांचे अहवाल | व्यवस्थापनाची उत्तरे |
|---|---|
| टिपा क्र. ३७ (एच) :१५० मे वॅ. सौर ऊर्जा प्रकरणासाठी के उफ डब्लुने भारत सरकार मार्फंत महाराष्ट्र शासनाना देऊ केलेल्या परंतु महाराष्ट्र शासनाकडून प्रत्यक्ष प्राप्ती प्रलंबित असलेल्या व्याजाचे दायित्व कर्ज निधी ₹ ६५,१११,७३८/- आणि त्याच्यावरील व्याजाचे दायित्व ₹ १,३९७,५१२/- यांच्या दायित्वांना मान्यता देणे. | के एफ डब्ल्यू यांच्या कर्जाच्या प्राप्ती भारत सरकार - महाराष्ट्र शासन यांच्या मार्फत पाठविल्या जातात व नंतर महाराष्ट्र शासन त्याबाबत अर्थसंकल्पिय तरतूद करून या कर्जाच्या प्राप्ती महानिर्मितीकडे पाठविते. प्रत्यक्ष प्राप्ती प्रलंबित असल्याने कंपनीने हे कर्ज व त्याच्या व्याजाचे दायित्व यांचा लेखा उपार्जन तत्वावर केला आहे. |
| **इतर कायदेविषयक व नियामके**<br><br>यांच्या आवश्यकतेबाबत अहवाल | |
| १) सदर कायद्याचे कलम २२७ चे उपकलम (४ए) यातील अटींनुसार भारत सरकाने जाहीर केलेल्या कंपन्यांचे (लेखा परिक्षकांचे अहवाल) आदेश, २००३, (हा आदेश) यातिल आवश्यकतेनुसार, या आदेशातील परिच्छेद क्र. ४ व ५ यात विनर्देशीत केलेल्या बाबींबाबत आम्ही दिलेले निवेदन जोडपत्र अ येथे आहे. | वस्तूस्थिती |
| २) कायद्याच्या कलम २२७ (३) यातील आवश्यकतेनुसार आम्ही अहवाल देतो की, हेतुसाठी गरज असलेली सर्व माहिति व स्पष्टीकरणे<br><br>(अ) आमचे सर्वोत्तम ज्ञान आणि विश्वास यानुसार आमच्या लेखापरिक्षणासाठी आवश्यक असलेली सर्व माहिती व स्पष्टीकरणे आम्ही मिळविली आहेत;<br><br>(ब) आमच्या मते महानिर्मिती कंपनीने कायद्यानुसार आवश्यक असणारी लेखा संबंधीची नोंदणीपुस्तके/वह्या कंपनीने बाळगली आहेत. असे आम्ही केलेल्या सदर लेखा पुस्तकांच्या तपासणीतून दिसून आले आहे.<br><br>(क) या अहवालाशी संबंधित ताळेबंद, नफा व तोटा पत्रक व रोकडता प्रवाह पत्र ही विवरणेपत्रे या लेखा पुस्तकांशी मान्यता राखणारी आहेत. | वस्तूस्थिती |

| सांविधिक लेखा परिक्षकांचे अहवाल | व्यवस्थापनाची उत्तरे |
|---|---|
| (ड) आमच्या मते सदर ताळेबंद, नफा व तोटा पत्रक व रोकडता प्रवाह ही विवरण पत्रे ही कायद्याच्या कलम २११ चे उपकलम (३ सी) यात दिलेल्या लेखा मानकांची पूर्तता करतात. | वस्तूस्थिती |
| (इ) अधिसुचना क्र. जी एस आर ८२९ (इ) दि. २१-१०-२००३ नुसार शासकीय कंपन्यांना कंपनी कायदा १९५६, यातिल खंड क्र. २७४ (१) (जी) यातिल तरतुदीपासून माफी देण्यात आली आहे. | |

# जोडपत्र 'ब२'

## आर्थिक वर्ष २०१२-१३ च सांविधिक लेखापरिक्षक यांचा अहवाल व त्यास व्यवस्थापनाने दिलेली उत्तरे

| | सांविधिक लेखा परिक्षकांचे अहवाल | व्यवस्थापनाची उत्तरे |
|---|---|---|
| १. | *अ) या कंपनीत पूर्ण तपशील दर्शविणारी योग्य अभिलेखांचे व्यवस्थितपणे जतन केले आहे. ज्या जागांवरील काही थोड्या मत्तांचे बाब निहाय तपशील घेणे व स्थीर मत्तांचे संहिता करण करणे यांचा अपवाद काढता स्थीर मत्तांची संख्यात्मक माहिती व जागा यांचा समावेश अभिलेखांमध्ये केलेला आहे.* | याबाबतचा लेखा परिणाम यापूर्वीचा पूर्ण करण्यात आला. संबंधीत जागेवरील लेखा नोंदीच्या आधारे स्थीर मत्तांची नोंदवही अद्यावत करण्याचे काम प्रगतीपथावर आहे हे काम वित्तीय वर्ष २०१३-१४ मध्ये पूर्ण होईल. |
| | ब) आम्हास दिलेल्या माहितीनुसार स्थीर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी तीन वर्षात एकदा करण्याचे कंपनीचे धोरण आहे. आमच्या मते हे धोरण कंपनीचा आकार व व्यवहाराचे स्वरूप यानुसार योग्य व व्यवहार्य आहे. यानुसार कंपनीच्या स्थीर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी यावर्षी व्यवस्थापनाने केलेली नाही.<br><br>क) लेखा परिक्षणाच्या वर्षात कंपनीने स्थीर मत्तेची मोठ्या प्रमाणात विल्हेवाट लावली नाही. | वस्तूस्थिती |
| २. | अ) वस्तूसूचीची प्रत्यक्ष पडताळणी व्यवस्थापनाने योग्य अशा ठराविक अंतराने केली आहे. *मात्र कोळसा धुलाई करणाया चालकांकडील वस्तूसूचीची पडताळणी केलेली नाही. अशा वस्तूसूचीची निश्चिती तिसया पक्षांकडून झालेली नाही.* | कोळसा धुलाईचे काम करणाऱ्या संस्थांनी त्यांच्याकडे शिल्लक असलेल्या मालाची निश्चिती दिलेली नाही. कंपनी व कोळसा धुलाई संस्था यांच्यातील काही वादांचा समझोता होणे बाकी आहे. मात्र कंपनीने सदर माल साठ्याबद्दल तरतूद केलेली आहे. |
| | ब) आमच्या मते व आम्हास दिलेली माहिती यानुसार व्यवस्थापनाने अनुसरलेली वस्तूसूचीच्या प्रत्यक्ष पडताळणीची कार्यपद्धती कंपनीचे आकारमान व व्यवसायाचे स्वरूप लक्षात घेता योग्य व पुरेशी आहे. मात्र तिसऱ्या पक्षांकडील असलेल्या वस्तूसूचीचा त्याला अपवाद आहे. | वस्तूस्थिती |
| | क) वस्तूसूचीच्या अभिलेखांचे आम्ही केलेले परिक्षण व प्रत्यक्ष पडताळणीचे अहवाल या आधारे आमचे मत आहे की, कंपनी वस्तूसूचीच्या अभिलेखांचे योग्य प्रकारे जतन करीत आहे. आढळलेल्या विसंगतीचे लेखात योग्य समायोजन केले. | वस्तूस्थिती |

| | सांविधिक लेखा परिक्षकांचे अहवाल | व्यवस्थापनाची उत्तरे |
|---|---|---|
| ३. | अ) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार या (महानिर्मिती) कंपनीने या वर्षात कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ३०१ अंतर्गत जतन केलेल्या नोंदवहीत समावेश केलेल्या अन्य कंपन्या, फर्म्स किंवा इतर संस्था यानां कोणतीही कर्जे मंजूर केलेली नाहीत म्हणून वरील आदेशाच्या परिच्छेद ४ यातील कलम (३) च्या उपकलम 'ए' ते 'डी' नुसार अहवाल देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. | वस्तूस्थिती |
| | ब) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यावरून दिसून येते की, सदर वर्षात कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ३०१ अंतर्गत जतन केलेल्या नोंदवहीत समावेश केलेल्या अन्य कंपन्या, फर्म्स किंवा अन्य संस्था यांच्याकडून कोणतीही कर्जे घेतली नाहीत म्हणून वरील आदेशाच्या परिच्छेद ४ यातील कलम (३) च्या उपकलम 'इ' ते 'जी' नुसार कोणताही अहवाल देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. | वस्तूस्थिती |
| ४. | आमच्या मते व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीचे आकारमान व तिच्या व्यवसायाचे स्वरूप याला सुसंगत अशी पुरेशी अंतर्गत नियंत्रण प्रणाली कार्यरत आहे व तिचा उपयोग वस्तू सूचीची व स्थीर मत्तांची खरेदी, तसेच माल व सेवा यांची विक्री यासाठी केला जातो. | वस्तूस्थिती |
| ५. | लेखा पुस्तकांचे आम्ही केलेले परिक्षण व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यांच्या आधारे, कंपनीने कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ३०१ अंतर्गत जतन केलेल्या नोंदवहीत नोंद करण्याजोगा एकही व्यवहार केलेला नाही. | वस्तूस्थिती |
| ६. | आमच्या मते व आम्हास दिलेली स्पष्टीकरण यानुसार कंपनी अधिनियम १९५६ चे कलम ५८ ए आणि ५८ एए तसेच कंपनी (ठेवी स्वीकारणे) नियम १९७५ यातील अर्थानुसार कंपनीने जनतेकडून ठेवी स्वीकारलेल्या नाहीत. आम्हास दिलेल्या माहितीनुसार कंपनी लॉ बोर्ड, नॅशनल कंपनी लॉ ट्रायब्युनल, आर. बी. आय् आणि अन्य कोणतेही न्यायाधिकरण किंवा न्यायालय यांनी कंपनीच्या विरोधात कोणताही आदेश काढलेला नाही. | वस्तूस्थिती |
| ७. | कंपनीने आपले मुख्यालय आणि अन्य जागी अंतर्गत लेखा परिक्षण करण्यासाठी बाह्य सनदी लेखापालांच्या संस्थांची नियुक्ती केली आहे. *मात्र त्यांचे अहवाल वेळेवर मिळालेले नाहीत.* याच्या अधीन राहून आमच्या मते व | अंतर्गत लेखा परिक्षण हे मासिक तत्वावर करण्यात येते. त्याचे अहवाल वेळेवर मिळावेत याची खात्री करून घेतली जाईल. |

| सांविधिक लेखा परिक्षकांचे अहवाल | व्यवस्थापनाची उत्तरे |
|---|---|
| आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यावरून कंपनीमधील सध्याची अंतर्गत लेखापरिक्षण प्रणाली ही कंपनीचे आकारमान व व्यवसायाचे स्वरूप याच्याशी सुसंगत व पुरेशी आहे. | |
| ८. केंद्र शासनाने कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २०९ (१) (डी) यानुसार खर्चाच्या नोंदी ठेवण्यासाठी विहित केलेल्या नियामनुसार, कंपनीने जतन केलेल्या लेखा पुस्तकांचा आम्ही स्थूलपणे आढवा घेतला. मात्र अभिलेख योग्यपणे आहेत असे आमचे प्रथमदर्शनी मत आहे. मात्र या अभिलेखांची अचूकता व परिपूर्णता निश्चित करण्यासाठी आम्ही त्याचे तपशीलवार परिक्षण केलेले नाही. | वस्तूस्थिती |
| ९.अ) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यावरून कंपनी सामान्यपणे, निर्विवाद अशी सांविधिक देणी योग्य प्राधिकाऱ्यांकडे नियमितपणे भरत आहे. यामध्ये भविष्यनिर्वाह निधी, गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधी, कर्मचाऱ्यांचा राज्य विमा, आयकर, विक्री कर, संपत्ती कर, सीमा शुल्क, उत्पादन शुल्क, उपकर आणि लागू असणारी अन्य सांविधिक देणी यांचा समावेश होतो. | वस्तूस्थिती |
| आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार निर्विवाद असलेल्या सांविधिक देणी म्हणजे आयकर, विक्री कर, संपत्ती कर, सेवा कर, सीमा शुल्क यांची थकबाकी ती देय असल्याच्या तारखेपासून सहा महिन्याच्या कालावधीत, ताळेबंदाच्या तारखेस नव्हती. | वस्तूस्थिती |
| ब) कंपनीच्या अभिलेखानुसार, खाली दिलेल्या बाबी व्यतिरिक्त आयकर / विक्रीकर / सेवाशुल्क / सीमा शुल्क / संपत्ती कर / उत्पादन शुल्क / उपकर याचा भरणा करण्यात आला आहे. खालील प्रकरणी वाद आहेत ते असे देय | वस्तूस्थिती |

| देय रकमेचे स्वरूप | भरणा न केलेली रक्कम | वाद असलेला मंच |
|---|---|---|
| उत्पादन शुल्क | ₹ २,६७०,३७५/- | केंद्रिय उत्पादन शुल्क आयुक्त |
| कर निर्धारण वर्ष २००७-२००८ साठी आयकर अधिनियम १९६१ च्या कलम २७१ (सी) नुसार दंड | ₹ १,०७३,२१५,४४०/- | आयुक्त (अपील्स) मुंबई |
| सेवा करासाठी १९४ सी नुसार स्त्रोतापाशी कापलेला कर | ₹ ८९५,०००/- | आय. टी. ए. टी, पुणे शाखा |

| सांविधिक लेखा परिक्षकांचे अहवाल | व्यवस्थापनाची उत्तरे |
|---|---|
| १०. या वित्तीय वर्षाच्या अखेरीस कंपनीकडे कोणतेही संचित तोटे नाहीत. कंपनीच्या लेखा वह्यांनुसार वित्तीय वर्षात आणि नजीकच्या मागील वर्षात कंपनीला कोणताही रोख रकमेचा तोटा झालेला नाही. | वस्तूस्थिती |
| ११. आमची लेखा परिक्षणाची कार्यपद्धती आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने कोणत्याही वित्तीय संस्थेची किंवा बँक व ऋणपत्रधारक यांच्या थकबाकीची परतफेड थांबविलेली नाही. | वस्तूस्थिती |
| १२. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने कोणासही भाग (शेअर्स) ऋणपत्रे किंवा अन्य प्रतिभूती गहाण ठेवून त्याच्या हमीच्या आधारे कोणतेही कर्ज आणि अग्रीम रकमा दिल्या नाहीत. | वस्तूस्थिती |
| १३. आमच्या मते आणि आमच्या सर्वोत्कृष्ट माहिती व आम्हाला दिलेली स्पष्टीकरणे यानुसार आम्ही नमूद करतो की सदर कंपनी ही एक चीट फंड किंवा निधी / म्युच्युअल फंड / सोसायटी नाही. म्हणून आमच्यामते वरील आदेशाच्या परिच्छेद क्र. ४ च्या कलम (१३) यातील तरतूदी कंपनीला लागू होत नाही. | वस्तूस्थिती |
| १४. कंपनीचे अभिलेख व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार सदर कंपनी शेअर्स, सिक्युरीटीज, डिबेंचर्स किंवा अन्य गुंतवणूकी यातील व्यवहार करीत नाही म्हणून वरील आदेशाच्या परिच्छेद क्र. ४ यातील कलम (१४) यातील तरतूदी कंपनीला लागू होत नाहीत. | वस्तूस्थिती |
| १५. कंपनीचे अभिलेख व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने इतरांनी बँका आणि / किंवा वित्तसंख्या यांच्याकडून घेतलेल्या कोणत्याही कर्जास हमी दिलेली नाही. | वस्तूस्थिती |
| १६. आमच्या मते व आम्हास दिलेली माहिती यानुसार , एकंदरीतपणे यावर्षात मुदत कर्जोच्या हेतूसाठी मिळविली त्याचसाठी वापरली. | वस्तूस्थिती |
| १७. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार आणि आम्ही केलेल्या ताळेबंद व रोकडता प्रवाह विवरणपत्रात यांच्या सर्वप्रकारे परिक्षणाप्रमाणे आम्ही नमूद करतो की, अल्प मुदतीच्या निधीतील ₹ १०,३५१,८९८,४४३/- (मागील वर्ष ₹ ४९,३९८,३७४,३३२/-) दीर्घ मुदतीच्या गुंतवणूकीसाठी वापरण्यात आले. | वस्तूस्थिती |
| १८. या वित्तीय वर्षात अधिनियमाच्या कलम ३०१ अंतर्गत जतन करण्यात येणाऱ्या नोंदणीवहीत समावेश केलेल्या व्यक्ती / संस्था आणि कंपन्या | वस्तूस्थिती |

| | सांविधिक लेखा परिक्षकांचे अहवाल | व्यवस्थापनाची उत्तरे |
|---|---|---|
| | यांना महानिर्मिती कंपनीने कोणत्याही शेअर्सचे विशेष पसंतीने वाटप केलेले नाही. | |
| १९. | कंपनीने कोणतीही ऋणपत्रे दिलेली नाहीत; म्हणून हे कलम लागू नाही. | वस्तूस्थिती |
| २०. | कंपनीने लेखा परिक्षणाच्या कालावधीत जनतेकडून कोणताही सार्वजनिक निधी घेतलेला नाही. त्यानुसार वरील आदेशातील परिच्छेद ४ च्या कलम (२०) यातील तरतूदी लागू होत नाहीत. | वस्तूस्थिती |
| २१. | सर्वमान्य लेखापरिक्षणाच्या पद्धतीनुसार लेखा पुस्तकांचे परिक्षण करताना आम्हास कंपनीबाबत किंवा तिच्यातर्फे कोणतेही लबाडीचे कृत्य दिसलेले नाही. यामध्ये कंपनीच्या दक्षता कक्षाकडील प्रकरणे भारताचे महानियंत्रक व महालेखापरिक्षण यांनी वित्तीय वर्षातील चौकश्या याचांाही समावेश आहे. | वस्तूस्थिती |

# भारताचे लेखानियंत्रक आणि महालेखापाल यांचा अभिप्राय

**भारताचे लेखानियंत्रक आणि महालेखापाल यांनी, कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ६१९ (४) नुसार महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि. मुंबई यांच्या दि. ३१ मार्च २०१३ रोजी संपलेल्या वर्षातील लेखांवर अभिप्राय :**

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी, मर्यादित,** मुंबई, या कंपनीचे दि. ३१ मार्च २०१३ रोजी संपलेल्या वर्षाची वित्तीय विवरणपत्रे, कंपनी अधिनियम १९५६ अंतर्गत वित्तीय अहवालाच्या विहीत आकृती बंधाप्रमाणे तयार करणे ही कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. भारताचे लेखा नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ६१९ (२) नुसार सदर लेखा परिक्षकांची नियुक्ती केली आहे. या वित्तिय विवरणपत्रांवर कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २२७ नुसार, सदर लेखापरिक्षकांची त्यांची व्यावसायिक संस्था, दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटस् ऑफ इंडिया, यांनी विहित केलेल्या लेखापरिक्षणाच्या व आश्र्वासकांच्या मानकांच्या आधारे विवरणपत्रांचे स्वतंत्र लेखापरिक्षण करून त्यावर अभिप्राय देणे ही त्यांची जबाबदारी आहे. त्यांचेकडून तीचे पालन झाल्याचे त्यांच्या लेखा परिक्षण अहवालात दि. १२ सप्टेंबर २०१३ नमूद केलेले आहे.

मी, भारताचे लेखा नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्यावतीने, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित मुंबई या कंपनीच्या दि. ३१ मार्च २०१३ रोजी संपलेल्या वर्षाचे कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ६१९ (३) (बी) नुसार पूरक लेखापरिक्षण पूर्ण केले. हे पूरक लेखापरिक्षण स्वतंत्रपणे आणि सांविधिक लेखापाल यांचेकडे असलेली कामाची कागदपत्रे न मिळविता करण्यात आले आहे व ते मुख्यत्वे सांविधिक लेखापरिक्षण यांचेकडे व कंपनीचे कर्मचारीवृंद यांचेकडे विचारणा करणे आणि काही निवडक लेखांविषयक कागदपत्रांची तपासणी करणे या मर्यादेत करण्यात आले आहे.

या माझ्या लेखापरिक्षणाच्या आधारे, कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ६१९ (४) अंतर्गत काही महत्वपूर्ण बाबी माझ्या लक्षात आल्या आहेत व माझ्या मते वित्तीय विवरणपत्रे व संबंधित लेखापरिक्षण अहवाल अधिक चांगल्या प्रकारे समजण्यासाठी त्यांचे साह्य होईल : त्या बाबी खालीलप्रमाणे :

**अ) ताळेबंदावर अभिप्राय,**
**समभाग व दायित्वे**
**चालू दायित्वे**
**व्यापारी देय ₹ ३,४०१.१२ कोटी**

१) उपरोक्त बाबीमध्ये रेल्वेला ओ एच इ पुरवठा प्रदायी रचनांच्या खराबीसाठी देय असलेली रक्कम ₹ ३७.१५ लाख समाविष्ट नाही. पूनर्स्थापनेच्या एकूण खर्चापैकी ₹ ५७.५२ लाखांपैकी कंपनीने ₹ २०.३७ लाख दि. २० नोव्हेंबर २०१२ रोजी दिले व शिल्लक रक्कम ₹ ३७.१५ लाख मार्च २०१३ पर्यंत भरली नव्हती. मात्र कंपनीने या शिल्लक रकमेकरिता तरदूत केली नव्हती. त्यामुळे ₹ ३७.१५ लाखांचे अधिक विवरण नफ्यात झाले आहे व दायित्वात तेव्हढेच कमी विवरण झाले आहे.

२) उपरोक्त बाबीमद्ये रेल्वेला मार्च २०१३ या महिन्यात देय असलेली विलंब आकार ₹ २२.६५ लाख समाविष्ट नाही.

यामुळे नफ्याचे तेव्हढे अधिक विवरण व चालू दायित्वाचे कमी विवरण झाले आहे. (पारस औ. वि. केंद्र)

**प्रगतीपथावरील भांडवली कामे (निव्वळ) ₹ १५,७४५.५२ कोटी**

३) उपरोक्त बाबीमध्ये दि. ३१ मार्च २०१३ रोजी मे. लॅको सोलर एनर्जी प्रा. लि. यांचेकडून वीजनिर्मिती कारखाना स्थापन

करण्यासाठी मिळालेल्या देयकांची रक्कम ₹ १७.०७ कोटी याचा लेखा समाविष्ट नाही. यामुळे भांडवली दायत्वे यांना देणे अनुक्रमे ₹ १७.०७ कोटीने कमी विवरण झाले आहे. ( भांडवली प्रकल्पांना देय)

**ब) नफ्यासंबंधी अभिप्राय :**

**नफा व तोटा पत्रक**

**इतर उत्पन्न ( टिपा क्र. १६)**

**भाडे, भाडेपट्टी आकार - ₹ ३.३४ कोटी**

४) वरील बाबीत वर्ष २०११-१२ व २०१२-१३ या वर्षात कंत्राटदारांना निवासी गाळ्यांच्या भाड्यापोटी मे व जून २०१३ या महिन्यात वसूल केलेल्या ₹ १३.५४ लक्ष या रकमेचा समावेश नाही. यामुळे नफ्याचे व चालू मत्ता याचे ₹ १३.५४ लाख कमी विवरण झाले आहे (पारस औ. वि. केंद्र)

**५) खर्च**

**इतर खर्च (टिपा क्र. २०)**

कंपनीच्या मालकीच्या नसलेल्या मत्तांकरिता अंशदान (सी एस आर)

कंपनीची सामाजिक जबाबदारी वर्ष २०११-१२ पर्यंत मूर्त स्थिर मत्तांसंबंधी लेखा धोरणात पुढील तरतूदी होती कंपनीने केलेल्या खर्चामुळे जर कंपनीची मालकी हक्क नसलेल्या स्थिर मत्तांची निर्मिती होत असेल तर जो पर्यंत मत्तांचे बांधकाम चालू आहे तोपर्यंत हा खर्च भांडवली खर्चाचा भाग म्हणून दाखवावा. आणि त्यानंतर तो स्थिर मत्तांच्या अनुसूचीमध्ये कंपनीची मालकी नसलेल्या मत्ता निर्मितीचा भांडवली खर्च या लेखाशीर्षांतर्गत दाखवावा.

मात्र वर्ष २०१२-१३ मधे कंपनीने सदर लेखा धोरणात सुधारणा केली त्यात पुढील भर टाकली. कंपनीची मालकी नसलेल्या मत्तांच्या खर्चासाठी आणि कंपनीच्या (सांघिक) सामाजिक जबाबदारीच्या कार्यासाठी केलेला महसूली खर्च नफा व ताषटा पत्रकात आकारण्यात यावा - टिपा क्र. १ (सी) (४) यात प्रकट केल्याप्रमाणे :

याप्रमाणे कंपनीने ₹ २८५.६२ कोटी ही रक्कम नफा व तोटा पत्रकात कंपनीच्या मालकीच्या नसलेल्या मत्तांसाठी कंपनीचे अंशदान म्हणजे धरणाचे बांधकाम (₹ १२६.२७ कोटी) जादा पाणी पुरवठा मिळविणेसाठी रस्त्यावरच्या पुलाच्या बांधकामासाठी (₹ १५९.३५ कोटी) एन एच ए ऑफ इंडिया यानां दिली. अशा प्रकारे याच कारणासाठी कंपनीच्या मालकीच्या नसलेल्या मत्तांची मूल्य रक्कम ₹ ६७.७४ कोटी हीसुद्दा नफा व तोटा पत्रकात आकारावयास हवी होती. यामुळे नफा व स्थीर मत्ता याचे विवरण ₹ ६७.७४ कोटीने जादा झाले आहे. तसेच लेखा मानक १ मधील आवश्यकतेनुसार कंपनीने लेखा धोरणातील बदलाचे परिणाम प्रकट केले नाहीत. सांविधिक लेखापरिक्षक सुद्धा कंपनीच्या लेखा धोरणातील बदलांवर अभिप्राय देण्यास असमर्थ आहेत.

**भारताचे लेखानियंत्रक महालेखापरिक्षक**
**यांच्या वतीने व त्याच्यासमक्ष**

स्थळ : मुंबई
दिनांक : २४.१२.२०१३

**प्रधान महा लेखा संचालक**
**(लेखापरिक्षण - ३)**

# महानिर्मिती कंपनीच्या वर्ष २०१२-१३ च्या लेखापरिक्षकांच्या अंतिम अभिप्राय व त्यास कंपनीने दिलेली उत्तरे

| अनु. क्र. | कॅगचा अभिप्राय | व्यवस्थापनाचे उत्तर | सांविधिक लेखा परिक्षकांचा शेरा |
|---|---|---|---|
| **अ.** | **ताळेबंदावर अभिप्राय,<br>समभाग व दायित्वे<br>चालू दायित्वे<br>व्यापारी देय ₹ ३,४०१.१२ कोटी** | | |
| १. | उपरोक्त बाबीमध्ये रेल्वेला ओ एच इ पुरवठा प्रदायी रचनांच्या खराबीसाठी देय असलेली रक्कम ₹ ३७.१५ समाविष्ट नाही. पूनर्स्थापनेच्या एकूण खर्चापैकी ₹ ५७.५२ लाखांपैकी कंपनीने ₹ २०.३७ लाख दि. २० नोव्हेंबर २०१२ रोजी दिले व शिल्लक रक्कम ₹ ३७.१५ लाक मार्च २०१३ पर्यंत भरली नव्हती. मात्र कंपनीने या शिल्लक रकमेकरिता तरदूत केली नव्हती. त्यामुळे ₹ ३७.१५ लाखांचे अधिक विवरण नफ्यात झाले आहे व दायित्वात तेव्हढेच कमी विवरण झाले आहे. | सदर ₹ ३७.१५ लाख ही रक्कम महानिर्मितीच्या सायडींग वर ओ एच इ पुरवठयाच्या वीज वाहिनीसाठी केलेलखर्च आहे. ही रक्कम कंपनीने दिलेली नाही कारण या कामाच्या निविदांचे अंतीमीकरण झालेले नाही. म्हणून या रकमेसाठी तरतूद करण्याची आवश्यकता नाही. | आम्ही व्यवस्थापनाचा मताशी सहमत आहोत. |
| २. | उपरोक्त बाबीमद्ये रेल्वेला मार्च २०१३ या महिन्यात देय असलेली विलंब आकार ₹ २२.६५ लाख समाविष्ट नाही.<br>यामुळे नफ्याचे तेव्हढे अधिक विवरण व चालू दायित्वाचे कमी विवरण झाले आहे. (पारस औ. वि. केंद्र)<br>**प्रगतीपथावरील भांडवली कामे (निव्वळ) ₹ १५,७४५.५२ कोटी** | या खर्चाचा लेखा राहिला आहे. पण तो काही फार मोठा नाही (नफयाचा ०.०४ टक्के) कंपनीने जुलै २०१३ मध्ये हा खर्च पूर्वकालीन खर्चाच्या लेखाशीर्षात दिल आहे. | आम्ही व्यवस्थापनाचा मताशी सहमत आहोत. |
| ३. | उपरोक्त बाबीमध्ये दि. ३१ मार्च २०१३ रोजी मे. लॅको सोलर एनर्जी प्रा. लि. यांचेकडून वीजनिर्मिती कारखाना स्थापन करण्यासाठी मिळालेल्या देयकांची रक्कम ₹ १७.०७ कोटी याचा लेखा समाविष्ट नाही. यामुळे भांडवली दायत्वे यांना देणे अनुक्रमे ₹ १७.०७ कोटीने कमी विवरण झाले आहे. (भांडवली प्रकल्पांना देय) | कंत्राटदाराकडून जुलै २०१३ एवढया विलंबाने देयक मिळाले. ते त्यानंतर मंजूर झाले अशा देयकांचा लेखा झाला नव्हता. तो जुलै २०१३ मध्ये केला. मात्र त्याचा कोणताही प्रभाव कंपनीच्या नफ्यावर होत नाही. व कंपनीने सुधारणा व दुरुस्ती केली आहे. | आम्ही व्यवस्थापनाचा मताशी सहमत आहोत. |

| अनु. क्र. | कॅगचा अभिप्राय | व्यवस्थापनाचे उत्तर | सांविधिक लेखा परिक्षकांचा शेरा |
|---|---|---|---|
| **ब.** | **नफ्यासंबंधी अभिप्राय :**<br>**ना व तोटा पत्रक**<br>**इतर उत्पन्न ( टिपा क्र. १६ )**<br>**भाडे, भाडेपट्टी आकार - ₹ ३.३४ कोटी** | | |
| ४. | वरील बाबीत वर्ष २०११-१२ व २०१२-१३ या वर्षात कंत्राटदारांना निवासी गाळ्यांच्या भाड्यापोटी मे व जून २०१३ या महिन्यात वसूल केलेल्या ₹ १३.५४ लक्ष या रकमेचा समावेश नाही. यामुळे नफ्याचे व चालू मत्ता याचे ₹ १३.५४ लाख कमी विवरण झाले आहे ( पारस औ. वि. केंद्र ) | कंपनीला कंत्राटदाराकडून वर्ष २०१०-११ साठी अग्रीम भाडे प्रारंभी मिळाले होते. मात्र अग्रीम भाडयाची मुदत संपल्यानंतर कंपनीकडून अनवधानाने त्यानंतरच्या काळाचे भाडे घेण्याचे राहिले होते. ही चूक मे २०१३ मधे लक्षात आली व आवश्यक ती सुधारणा कृती व वसूली करण्यात आली. ही रक्कम खूप मोठी नाही. (कंपनीच्या एकूण नफयाच्या ०.०३ टक्के) व ती दुरुस्त करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. | आम्ही व्यवस्थापनाचा मताशी सहमत आहोत. |
| ५. | **खर्च**<br>**इतर खर्च (टिपा क्र. २०)** | | |
| | कंपनीच्या मालकीच्या सलेल्या मत्तांकरिता अंशदान / कंपनीची सामाजिक जबाबदारी वर्ष २०११-१२ पर्यंत मूर्त स्थिर मत्तांसंबंधी लेखा धोरणात पुढील तरतूदी होती कंपनीने केलेल्या खर्चामुळे जर कंपनीची मालकी हक्क नसलेल्या स्थिर मत्तांची निर्मिती होत असेल तर जो पर्यंत मत्तांचे बांधकाम चालू आहे तोपर्यंत हा खर्च भांडवली खर्चाचा भाग म्हणून दाखवावा. आणि त्यानंतर तो स्थिर मत्तांच्या अनुसूचीमध्ये कंपनीची मालकी नसलेल्या मत्ता निर्मितीचा भांडवली खर्च या लेखाशीर्षांतर्गत दाखवावा. | आम्ही लेखाधोरण क्र. १ (सी) (४) याचा संदर्भ येते देत आहोत. हे धोरण असे आहे; "कंपनीने केलेल्या भांडवली खर्चातून जर ज्याची कंपनीकडे मालकी नाही. अशा मत्तांची निर्मिती होत असेल तर जो पर्यंत अशा मत्तांचे बांधकाम चालू आहे तो पर्यंत हा खर्च" प्रगतीपथावरीलभांडवली कामाचा खर्च असा दाखविला जातो. आणि त्यानंतर तो "कंपनीच्या मालकीच्या नसलेल्या मत्ता निर्मितीचा भांडवली खर्च" या लेखाशिर्षाखाली स्थिर मत्तांच्या सूत्रीमधे दाखविण्यात येतो. | आम्ही व्यवस्थापनाचा मताशी सहमत आहोत. |

| अनु. क्र. | कॅगचा अभिप्राय | व्यवस्थापनाचे उत्तर | सांविधिक लेखा परिक्षकांचा शेरा |
|---|---|---|---|
| | मात्र वर्ष २०१२-१३ मधे कंपनीने सदर लेखा धोरणात सुधारणा केली त्यात पुढील भर टाकली. कंपनीची मालकी नसलेल्या मत्तांच्या खर्चासाठी आणि कंपनीच्या (सांघिक) सामाजिक जबाबदारीच्या कार्यासाठी केलेला महसूली खर्च नफा व ताषटा पत्रकात आकारण्यात यावा – टिपा क्र. १ (सी) (४) यात प्रकट केल्याप्रमाणे :<br><br>याप्रमाणे कंपनीने ₹ २८५.६२ कोटी ही रक्कम नफा व तोटा पत्रकात कंपनीच्या मालकीच्या नसलेल्या मत्तांसाठी कंपनीचे अंशदान म्हणजे धरणाचे बांधकाम (₹ १२६.२७ कोटी) जादा पाणी पुरवठा मिळविणेसाठी रस्त्यावरच्या पुलाच्या बांधकामासाठी (₹ १५९.३५ कोटी) एन एन एच ए ऑफ इंडिया यानां दिली. अशा प्रकारे याच कारणासाठी कंपनीच्या मालकीच्या नसलेल्या मत्तांची मूल्य रक्कम ₹ ६७.७४ कोटी हीसुद्दा नफा व तोटा पत्रकात आकारावयास हवी होती. यामुळे नफा व स्थीर मत्ता याचे विवरण ₹ ६७.७४ कोटीने जादा झाले आहे. तसेच लेखा मानक १ मधील आवश्यकतेनुसार कंपनीने लेखा धोरणातील बदलाचे परिणाम प्रकट केले नाहीत. सांविधिक लेखापरिक्षक सुद्धा कंपनीच्या लेखा धोरणातील बदलांवर अभिप्राय देण्यास असमर्थ आहेत. | **कंपनीच्या मालकीच्या नसलेल्या मत्तांसाठी व कंपनीची सामाजिक जबाबदारी यासाठी केलेला महसूली खर्च यांची आकारणी नफा व तोटा पत्रकात केली जाते.**<br><br>कंपनीच्या मत्ते वरीलखर्च महसूली खर्चाच्या प्रकारचे आहेत. म्हणून त्याबाबतची कार्यवाही वर नमूद केलेल्या धोरणांप्रमाणे असून आय सी ए आय च्या तज्ञ सल्लागार समितीने शिफारस केलेल्या लेखा पद्धतीला अनुसरुन आहे.<br><br>ही कार्यवाही कंपनीच्या मालकीच्या नसलेल्या मत्तांबाबत टिपा क्र. ८ मधे दाखविलेल्या ₹ ६७.७४ कोटी – या रकमेला लागू नाही. कारण त्या मत्ता कंपनीकडे हस्तांतरण योजनेनुसार वारश्याने आरंभीच्या ताळेबंदात आहेत. हस्तांतरण योजना हंगामी स्वरुपाची असून तिचे महाराष्ट्र शासनाकडून अद्याप अंतिमीकरण व्हायचे आहे. | |

# स्वतंत्र लेखापरिक्षकांचा अहवाल

प्रति,

मा.सदस्य,

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड

**वित्तीय विवरण पत्रावर अहवाल**

आम्ही, 'महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि.' या कंपनीच्या सोबत जोडलेल्या वित्तीय विवरण पत्रांचे लेखा परिक्षण केले आहे. या पत्रांमध्ये कंपनीचे दि. ३१ मार्च २०१३ रोजीचा ताळेबंद, त्या दिवशी संपलेल्या आर्थिक वर्षाचे नफा व तोटा पत्रक आणि रोकडता प्रवाह या विवरण पत्रांचा, तसेच महत्वाची कंपनी धोरणे व इतर स्पष्टीकरणे या माहितीचा समावेश आहे.

**वित्तीय विवरणासंबंधि व्यवस्थापनाची जबाबदारी**

कंपनी अधिनयम १९५६ (सदर कायदा)यातील कलम २११ चे उपकलम (उ.सी.) यात दिलेल्या लेखांच्या मानकानुसार कंपनीची वित्त विषयक स्थिती, वित्त संबंधीत कामिगिरी आणि रोकडता प्रवाह यांचे सत्य व योग्य दर्शन घडविणारी वित्तीय विवरण पत्रे तयार करणे ही कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. या जबाबदारीमध्ये लबाडी किंवा चुका यामुळे होऊ शकणाऱ्या माहितीच्या सदोष विवरणापासून मुक्त असलेली वित्तिय विवरण पत्रे तयार करुन ती योग्यप्रकारे सादर करण्यासाठी अंतर्गत नियंत्रणाची रचना व अंमलबजावणी करणे व तिचे व्यवस्थापन करणे, या कृतींचा समावेश आहे.

**लेखापरिक्षकांची जबाबदारी**

या वित्तीय विवरण पत्रांचे , लेखा परिक्षण करुन त्याबाबत अभिप्राय व्यक्त करावेत, ही आम्हा लेखा परिक्षकांची जबाबदारी असते. आम्ही आमचे लेखापरिक्षण, भारताची सनदी लेखापाल संस्था (इन्स्टीटयुट ऑफ चार्टड अकांऊन्टस ऑफ इंडीया) या संस्थेने तयार केलेल्या लेखा परिक्षणांच्या मानकानुसार केले आहे. लेखा परिक्षणांचे नियोजन व कामगिरी पूर्ण करताना आम्ही या मानकांत दिलेल्या नैतिक गरजांचे अनुपालन करावे जेणेकरुन सदर वित्तीय विवरणपत्रे कोणत्याहि प्रत्यक्ष सदोष विवरणापासून मुक्त आहेत अशी तर्कशुद्ध हमी मिळाले पाहिजे; अशी अपेक्षा असते.

या विवरण पत्रातील रकमा व प्रकटने याबाबत लेखा परिक्षणासाठी योग्य असे पुरावे मिळविणे या उद्देशातुन लेखा परिक्षण केले जाते. यासाठी निवडलेली कार्यपद्धती लेखा परिक्षकाच्या न्याय बुद्धीवर अवलंबून असते. त्यात विवरण पत्रातील प्रत्यक्ष माहिती लबाडीने किंवा नजरचुकीने झाली आहे किंवा कसे या बाबतच्या धोक्यांचे मूल्यमापन समाविष्ट असते. या धोक्यांचे मुल्यमापन करताना कंपनीने परिस्थितीनुसार अशी वित्तीय विवरणपत्रे योग्यप्रकारे तयार करण्यासाठी व त्यांच्या सादरीकरणासाठी अवलंबिलेल्या लेखा परिक्षणाच्या अंतर्गत नियंत्रणाचा विचार, लेखा परिक्षकांकडून केला जातो. ही कार्यपद्धती परिस्थितीनुसार योग्य असण्याबद्दल ही विचार केला जातो. तसेच कंपनीने अवलंबलेल्या लेखा धोरणांची उपयुक्तता, व्यवस्थापनाने केलेल्या लेखाविषयक अंदाजाचे प्रमाण व वित्तीय विवरण पत्रांच्या एकंदर सादरीकरणाचे मुल्यांकन यांचाही विचार लेखापरिक्षणात केला जातो. आम्हास पात्रतेनुसार लेखा परिक्षणाचा अभिप्राय व्यक्त करता यावा, या दृष्टीने आम्ही मिळविलेले लेखापरिक्षणाविषयीचे पुरावे, पुरेसे होते असा आम्हाला विश्वास आहे.

**पात्र अभिप्रायांचा आधार**

*१) महाराष्ट्र विद्युत सुधारणा हस्तांतरण योजना २००५, अनुसार मत्ता व दायित्वे कंपनीकडे हस्तांतरील झाली त्यात काही बाबी शिल्लक आहेत. आम्हास दिलेल्या माहितीनुसार, ह्या शिल्लकबाबी मराविमं सूत्रधारी कंपनीकडे असून त्या अद्याप (महानिर्मिती) कंपनीकडे सोपविण्याचे बाकी आहे. आम्हास असेही सांगण्यात आले की, महाराष्ट्र शासनाकडून अंतिम हस्तांतरण योजना अद्याप अधिसुचित व्हायची आहे. त्याप्रमाणे आरंभीच्या शिल्लकी बाबी कंपनीकडून स्वीकारवायाच्या आहत. या शिल्लकी बाबींमध्ये जर काही बदल झाला, तर त्याचा प्रभाव महानिर्मिती कंपनीच्या वित्तीय विवरणपत्रांवर होऊ शकेल. याशिवाय आम्ही टिपा क्र. २ व त्यावरील व्याज यानुसार महाराष्ट्र राज्य*

*विद्युत पारेषण कंपनी लि. यांचे कडून पूर्वीच्या वर्षात हस्तांतरीत होणाया व्याजासह कर्जाचे दायित्व याकडे निर्देशन करतो. योजनेच्या अंशतः सुधारणेत ही बाब मराविमं सुत्रधारी कंपनी लि. ने मान्य केली आहे.*

*२) टिपा क्र. ३१ यात नमुद केल्या नुसार किरकोळ ऋणकोंकडील बाकी, कर्जे व अग्रीमे, अनामती, उप कंत्राटादारांकडील सामग्री, किरकोळ धनकोंकडील शिल्लक निधी, मालाच्या पुरवठ्याची दायित्वे, आंतर गट कंपन्यांच्या शिल्लकी, ग्राहकांकडील अग्रीमे, व कोळसा कंपन्यांना दिलेली अग्रीमे व यासाठी केलेल्या तरतुदी, या सर्व बाबी संबंधित व्यक्ती/संस्था यांचेकडून निश्चित होणे व / किंवा त्यांचा उपकंपन्यांच्या नोंदीनुसार मेळ घालणे याच्या प्रकरणानुसार अधिन आहेत. अशी निश्चिती आणि मेळ घालणे प्रलंबित असल्यामुळे, परिणाम कारक समायोजन करता आलेले नाही. यामुळे नंतर जर काही प्रभाव पडल्यास त्यामुळे या शिल्लकींची स्थिती व कंपनीचा नफा यावर होणाया परिणामांबद्दल मत व्यक्त करण्यास आम्ही असमर्थ आहोत.*

*३) टिपा क्र. ३२ यात नमुद केल्याप्रमाणे, कर्जे व अग्रीमे यामध्ये कोळसा पुरवठाधारकांना दिलेल्या अग्रीमांची रक्कम*

*₹ १९,०३३,१४२,५७६/- समाविष्ट आहे. या अग्रीमाबद्दल कंपनीने कोळसा पुरवठादारांचे दायित्व या करिता ₹ १९,१४९,५३४,११८/- एवढी तरतूद केली आहे. देयकांची अंतीम मंजुरी प्रलंबित असल्याने कंपनीने भरलेल्या अग्रीमा समवेत या दायित्वाचे निर्लेखन केलेले नाही. यामुळे कंपनीची संबंधित मत्ता व दायित्व यांचे अतिरिक्त विवरण झाले आहे. या उपरिनिर्दिष्ट बाबीचा कंपनीच्या नफ्यावर होऊ शकणाया परिणामांचे मुल्यमापन केलेले नाही.*

*४. कंपनीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. (महावितरण) सोबत वीज खरेदी करार केला आहे. त्यानुसार 'वीज विक्रीपासुनचा महसुल' या लेखाशीर्षांतर्गत, 'विलंबित भरण्यावरील व्याजाचा अधिभार' यासाठी ₹ ५,६७०,१२३,०००/- या रक्कमेची देयके महावितरण कंपनीस दिली. महावितरणने ही पत्रे स्वीकारली नाहीत. महावितरण यापूर्वीच्या वर्षात अशा अधिभाराची ₹ २,१४४,०३८,०३७/- या रक्कमेची देयके स्वीकारली नव्हती. महानिर्मिती कंपनी या वर्षातील वरील रकमेसह मागील काही वर्षातील विविध मागणी पत्रांच्या रकमांचा महावितरण समवेत मेळ घालण्याच्या प्रक्रियेत आहे. यातील नत्क फरक ₹ ४८९,७०६,१८८/- आहे.*

*महावितरण कडून ही देयके स्वीकारणे व लेखांचा मेळ घालणे प्रलंबित असल्याने आम्ही या उत्पन्नाची प्राप्ती तसेच त्याच्या अनुक्रमे (अ) कंपनीच्या यावर्षीचा नफा, (ब) व्यापाराहून प्राप्त होऊ शकणारे मुल्य, (क) विना देयकांचा महसुल आणि (ड) राखीव व आधिक्य, यांच्यावर होऊ शकणाया परिणाम यावर होऊ शकणाया परिणामांबाबत अभिप्राय नोंदविण्यास असमर्थ आहोत. त्यांच्या परिणामांची मोजणी केलेली नाही.*

***अभिप्रायः*** *- आमच्या मतानुसार आणि आम्ही सर्वोतपरी प्रयत्नाने मिळविलेली माहिती व त्यानुसार आम्हास दिलेली स्पष्टीकरणे, यानुसार तसेच वरील 'पात्र अभिप्रायांचा आधार' यातील परिच्छेद (१ते ४) यात ज्याची मोजणी करता येत नाहीत अशा बाबींच्या अधीन राहून आम्ही नमूद करतो की, संबंधित कायद्यानुसार आवश्यक असणारी व त्यातील पद्धतीनुसार ही वित्तीय विवरणपत्रे, भारत देशात सर्वसाधारणपणे सर्वमान्य असलेल्या लेखाधोरणांशी सुसंगत राहून, खालीलप्रमाणे कंपनीने सत्य व योग्य दर्शन सादर करतात.*

***(अ) ताळेबंद संबंधी*** *- कंपनीच्या व्यवहारांची स्थिती दि. ३१ मार्च २०१३ रोजी नुसार आहे.*

***(ब) नफा व तोटा यांचे विवरणपत्र*** *- सदर तारखेला संपलेल्या वर्षाचा नफा दर्शविते.*

***(क) रोकडता प्रवाह विवरण पत्र*** *- सदर तारखेला संपलेल्या दिवशीचा रोकडता प्रवाह दर्शविते.*

**लक्षवेधी प्रकरणे**

आमच्या अहवालाच्या पात्रतेला बाधा न पोहचविता आम्ही खालील बाबींकडे लक्ष वेधतो.

(अ) टिपा क्र. ३७(डी) : लेखा मानक १९ अंतर्गत आवश्यक असणाऱ्या माहितीच्या अप्रकटना संबंधी ही टिपा आहे. कंपन्याची (लेखा मानके) नियमावली २००६ अंतर्गत विविध जल विद्युत निर्मितीच्या सुविधां बाबत, महाराष्ट्र शासनाशी केलेल्या करारांची कार्यवाही प्रलंबित असणे.

(ब) टिपा क्र. ३७(ए)(२): आवश्यक तो तपशील व माहिती यांच्या अभावी सि पी एफ च्या हंगामी लेखांवर आधारलेल्या व्याजांच्या तुटीचा लेखा या संबंधी.

(क) टिपा क्र. ३७ (एच) :१५० मे वॅ. सौर ऊर्जा प्रकरणासाठी के एफ डब्लुने भारत सरकार मार्फंत महाराष्ट्र शासनाना देऊ केलेल्या परंतु

महाराष्ट्र शासनाकडून प्रत्यक्ष प्राप्ती प्रलंबित असलेल्या कर्ज निधी ₹ ९५,१११,७३८/- आणि त्याच्यावरील व्याजाचे दायित्व ₹ १,३९७,५१२/- यांच्या दायित्वांना मान्यता देणे.

**इतर कायदेविषयक व नियामके**

**यांच्या आवश्यकतेबाबत अहवाल**

१) सदर कायद्याचे कलम २२७ चे उपकलम (४ए) यातील अटींनुसार भारत सरकारने जाहीर केलेला कंपन्यांचे (लेखा परिक्षकांचे अहवाल) आदेश, २००३, (हा आदेश) यातील आवश्यकतेनुसार, या आदेशातील परिच्छेद क्र. ४ व ५ यात विनिर्देशीत केलेल्या बाबींबाबत आम्ही दिलेले निवेदन जोडपत्र अ येथे आहे.

२) कायद्याच्या कलम २२७ (३) यातील आवश्यकतेनुसार आम्ही अहवाल देतो की,

(अ) आमचे सर्वोत्तम ज्ञान आणि विश्वास यानुसार आमच्या लेखापरिक्षणासाठी आवश्यक असलेली सर्व माहिती व स्पष्टीकरणे आम्ही मिळविली आहेत;

(ब) आमच्या मते महानिर्मिती कंपनीने कायद्यानुसार आवश्यक असणारी लेखा संबंधीची नोंदणीपुस्तके/वह्या कंपनीने बाळगली आहेत. असे आम्ही केलेल्या सदर लेखा पुस्तकांच्या तपासणीतून दिसून आले आहे.

(क) या अहवालाशी संबंधित ताळेबंद, नफा व तोटा पत्रक व रोकडता प्रवाह पत्र ही विवरणपत्रे या लेखा पुस्तकांशी मान्यता राखणारी आहेत.

(ड) आमच्या मते सदर ताळेबंद, नफा व तोटा पत्रक व रोकडता प्रवाह ही विवरण पत्रे ही कायद्याच्या कलम २११ चे उपकलम (३ सी) यात दिलेल्या लेखा मानकांची पूर्तता करतात.

(इ) अधिसुचना क्र. जी एस आर ८२९ (इ) दि. २१-१०-२००३ नुसार शासकीय कंपन्यांना कंपनी कायदा १९५६, यातील खंड क्र. २७४ (१) (जी) यातील तरतुदीपासून माफी देण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| **सी.व्ही.के अँड असोशिएटस** | **के.एस.अय्यर अँड कं.** | **जी. कापडीया अँड कं.** |
| सनदी लेखापाल | सनदी लेखापाल | सनदी लेखापाल |
| एफ आर एन १०१७४५ डब्ल्यु | एफ आर एन १००१८६डब्ल्यु | एफ आर एन १०४७६७ डब्ल्यु |
| **अशोक के. प्रधान** | **राजेश एस. जोशी** | **राजन आर अशर** |
| भागीदार | भागीदार | भागीदार |
| सदस्य क्र. ३२१५६ | सदस्य क्र. ३८५२६ | सदस्य क्र. ४८२४३ |

स्थळ : मुंबई

दिनांक : १२ सप्टेंबर २१०३

## जोडपत्र : आमचा समान तारखेच्या अहवालाच्या परिच्छेद ३ यातील संदर्भानुसार

१. *अ) या कंपनीत पूर्ण तपशील दर्शविणारी योग्य अभिलेखांचे व्यवस्थितपणे जतन केले आहे. ज्या जागांवरील काही थोड्या मत्तांचे बाब निहाय तपशील घेणे व स्थीर मत्तांचे संहिता करण करणे यांचा अपवाद काढता स्थीर मत्तांची संख्यात्मक माहिती व जागा यांचा समावेश अभिलेखांमध्ये केलेला आहे.*

ब) आम्हास दिलेल्या माहितीनुसार स्थीर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी तीन वर्षात एकदा करण्याचे कंपनीचे धोरण आहे. आमच्या मते हे धोरण कंपनीचा आकार व व्यवहाराचे स्वरूप यानुसार योग्य व व्यवहार्य आहे. यानुसार कंपनीच्या स्थीर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी यावर्षी व्यवस्थापनाने केलेली नाही.

क) लेखा परिक्षणाच्या वर्षात कंपनीने स्थीर मत्तेची मोठ्या प्रमाणात विल्हेवाट लावली नाही.

२. अ) वस्तूसूचीची प्रत्यक्ष पडताळणी व्यवस्थापनाने योग्य अशा ठराविक अंतराने केली आहे. मात्र कोळसा धुलाई करणाऱ्या चालकांकडील वस्तूसूचीची पडताळणी केलेली नाही. अशा वस्तूसूचीची निश्चिती तिसऱ्या पक्षांकडून झालेली नाही.

ब) आमच्या मते व आम्हास दिलेली माहिती यानुसार व्यवस्थापनाने अनुसरलेली वस्तूसूचीच्या प्रत्यक्ष पडताळणीची कार्यपद्धती कंपनीचे आकारमान व व्यवसायाचे स्वरूप लक्षात घेता योग्य व पुरेशी आहे. *मात्र तिसया पक्षांकडील असलेल्या वस्तूसूचीचा त्याला अपवाद आहे.*

क) वस्तूसूचीच्या अभिलेखांचे आम्ही केलेले परिक्षण व प्रत्यक्ष पडताळणीचे अहवाल या आधारे आमचे मत आहे की, कंपनी वस्तूसूचीच्या अभिलेखांचे योग्य प्रकारे जतन करीत आहे. आढळलेल्या विसंगतीचे लेखात योग्य समायोजन केले.

३. अ) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार या (महानिर्मिती) कंपनीने या वर्षात कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ३०१ अंतर्गत जतन केलेल्या नोंदवहीत समावेश केलेल्या अन्य कंपन्या, फर्म्स किंवा इतर संस्था यानां कोणतीही कर्जे मंजूर केलेली नाहीत म्हणून वरील आदेशाच्या परिच्छेद ४ यातील कलम (३) च्या उपकलम 'ए' ते 'डी' नुसार अहवाल देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

ब) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यावरून दिसून येते की, सदर वर्षात कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ३०१ अंतर्गत जतन केलेल्या नोंदवहीत समावेश केलेल्या अन्य कंपन्या, फर्म्स किंवा अन्य संस्था यांच्याकडून कोणतीही कर्जे घेतली नाहीत म्हणून वरील आदेशाच्या परिच्छेद ४ यातील कलम (३) च्या उपकलम 'इ' ते 'जी' नुसार कोणताही अहवाल देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

४. आमच्या मते व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीचे आकारमान व तिच्या व्यवसायाचे स्वरूप याला सुसंगत अशी पुरेशी अंतर्गत नियंत्रण प्रणाली कार्यरत आहे व तिचा उपयोग वस्तू सूचीची व स्थीर मत्तांची खरेदी, तसेच माल व सेवा यांची विक्री यासाठी केला जातो.

५. लेखा पुस्तकांचे आम्ही केलेले परिक्षण व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यांच्या आधारे, कंपनीने कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ३०१ अंतर्गत जतन केलेल्या नोंदवहीत नोंद करण्याजोगा एकही व्यवहार केलेला नाही.

६. आमच्या मते व आम्हास दिलेली स्पष्टीकरण यानुसार कंपनी अधिनियम १९५६ चे कलम ५८ ए आणि ५८ एए तसेच कंपनी (ठेवी स्वीकारणे) नियम १९७५ यातील अर्थानुसार कंपनीने जनतेकडून ठेवी स्वीकारलेल्या नाहीत. आम्हास दिलेल्या माहितीनुसार कंपनी लॉ बोर्ड, नॅशनल कंपनी लॉ ट्रायब्युनल, आर. बी. आय् आणि अन्य कोणतेही न्यायाधिकरण किंवा न्यायालय यांनी कंपनीच्या विरोधात कोणताही आदेश काढलेला नाही.

७. कंपनीने आपले मुख्यालय आणि अन्य जागी अंतर्गत लेखा परिक्षण करण्यासाठी बाह्य सनदी लेखापालांच्या संस्थांची नियुक्ती केली आहे. *मात्र त्यांचे अहवाल वेळेवर मिळालेले नाहीत.* याच्या अधीन राहून आमच्या मते व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यावरून कंपनीमधील सध्याची अंतर्गत लेखापरिक्षण प्रणाली ही कंपनीचे आकारमान व व्यवसायाचे स्वरूप याच्याशी सुसंगत व पुरेशी आहे.

८. केंद्र शासनाने कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २०९ (१) (डी) यानुसार खर्चाच्या नोंदी ठेवण्यासाठी विहित केलेल्या नियामनुसार, कंपनीने जतन केलेल्या लेखा पुस्तकांचा आम्ही स्थूलपणे आढवा घेतला. मात्र अभिलेख योग्यपणे आहेत असे आमचे प्रथमदर्शनी मत आहे. मात्र या अभिलेखांची अचूकता व परिपूर्णता निश्चित करण्यासाठी आम्ही त्याचे तपशीलवार परिक्षण केलेले नाही.

९.अ) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यावरून कंपनी सामान्यपणे, निर्विवाद अशी सांविधिक देणी योग्य प्राधिकाऱ्यांकडे नियमितपणे भरत आहे. यामध्ये भविष्यनिर्वाह निधी, गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधी, कर्मचाऱ्यांचा राज्य विमा, आयकर, विक्री कर, संपत्ती कर, सीमा शुल्क, उत्पादन शुल्क, उपकर आणि लागू असणारी अन्य सांविधिक देणी यांचा समावेश होतो.

आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार निर्विवाद असलेल्या सांविधिक देणी म्हणजे आयकर, विक्री कर, संपत्ती कर, सेवा कर, सीमा शुल्क यांची थकबाकी ती देय असल्याच्या तारखेपासून सहा महिन्याच्या कालावधीत, ताळेबंदाच्या तारखेस नव्हती.

ब) कंपनीच्या अभिलेखानुसार, खाली दिलेल्या बाबी व्यतिरिक्त आयकर / विक्रीकर / सेवाशुल्क / सीमा शुल्क / संपत्ती कर / उत्पादन शुल्क / उपकर याचा भरणा करण्यात आला आहे. खालील प्रकरणी वाद आहेत ते असे देय

| देय रकमेचे स्वरूप | भरणा न केलेली रक्कम | वाद असलेला मंच |
|---|---|---|
| उत्पादन शुल्क | ₹ २,६७०,३७५/- | केंद्रिय उत्पादन शुल्क आयुक्त |
| कर निर्धारण वर्ष २००७-२००८ साठी आयकर अधिनियम १९६१ च्या कलम २७१ (सी) नुसार दंड | ₹ १,०७३,२१५,४४०/- | आयुक्त (अपील्स) मुंबई |
| सेवा करासाठी १९४ सी नुसार स्त्रोतापाशी कापलेला कर | ₹ ८९५,०००/- | आय. टी. ए. टी, पुणे शाखा |

१०. या वित्तीय वर्षाच्या अखेरीस कंपनीकडे कोणतेही संचित तोटे नाहीत. कंपनीच्या लेखा वह्यांनुसार वित्तीय वर्षात आणि नजीकच्या मागील वर्षात कंपनीला कोणताही रोख रकमेचा तोटा झालेला नाही.

११. आमची लेखा परिक्षणाची कार्यपद्धती आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने कोणत्याही वित्तीय संस्थेची किंवा बँक व ऋणपत्रधारक यांच्या थकबाकीची परतफेड थांबविलेली नाही.

१२. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने कोणासही भाग (शेअर्स) ऋणपत्रे किंवा अन्य प्रतिभूती गहाण ठेवून त्याच्या हमीच्या आधारे कोणतेही कर्ज आणि अग्रीम रकमा दिल्या नाहीत.

१३. आमच्या मते आणि आमच्या सर्वोत्कृष्ट माहिती व आम्हाला दिलेली स्पष्टीकरणे यानुसार आम्ही नमूद करतो की सदर कंपनी ही एक चीट फंड किंवा निधी / म्युच्युअल फंड / सोसायटी नाही. म्हणून आमच्यामते वरील आदेशाच्या परिच्छेद क्र. ४ च्या कलम (१३) यातील तरतूदी कंपनीला लागू होत नाही.

१४. कंपनीचे अभिलेख व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार सदर कंपनी शेअर्स, सिक्युरीटीज, डिबेंचर्स किंवा अन्य

गुंतवणूकी यातील व्यवहार करीत नाही म्हणून वरील आदेशाच्या परिच्छेद क्र. ४ यातील कलम (१४) यातील तरतूदी कंपनीला लागू होत नाहीत.

१५. कंपनीचे अभिलेख व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने इतरांनी बँका आणि / किंवा वित्तसंख्या यांच्याकडून घेतलेल्या कोणत्याही कर्जास हमी दिलेली नाही.

१६. आमच्या मते व आम्हास दिलेली माहिती यानुसार, एकंदरीतपणे यावर्षात मुदत कर्जोच्या हेतूसाठी मिळविली त्याचसाठी वापरली.

१७. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार आणि आम्ही केलेल्या ताळेबंद व रोकडता प्रवाह विवरणपत्रात यांच्या सर्वप्रकारे परिक्षणाप्रमाणे आम्ही नमूद करतो की, अल्प मुदतीच्या निधीतील ₹ १०,३५१,८९८,४४३/- (मागील वर्ष ₹ ४९,३९८,३७४,३३२/-) दीर्घ मुदतीच्या गुंतवणूकीसाठी वापरण्यात आले.

१८. या वित्तीय वर्षात अधिनियमाच्या कलम ३०१ अंतर्गत जतन करण्यात येणाऱ्या नोंदणीवहीत समावेश केलेल्या व्यक्ती / संस्था आणि कंपन्या यांना महानिर्मिती कंपनीने कोणत्याही शेअर्सचे विशेष पसंतीने वाटप केलेले नाही.

१९. कंपनीने कोणतीही ऋणपत्रे दिलेली नाहीत; म्हणून हे कलम लागू नाही.

२०. कंपनीने लेखा परिक्षणाच्या कालावधीत जनतेकडून कोणताही सार्वजनिक निधी घेतलेला नाही. त्यानुसार वरील आदेशातील परिच्छेद ४ च्या कलम (२०) यातील तरतूदी लागू होत नाहीत.

२१. सर्वमान्य लेखापरिक्षणाच्या पद्धतीनुसार लेखा पुस्तकांचे परिक्षण करताना आम्हास कंपनीबाबत किंवा तिच्यातर्फे कोणतेही लबाडीचे कृत्य दिसलेले नाही. यामध्ये कंपनीच्या दक्षता कक्षाकडील प्रकरणे भारताचे महानियंत्रक व महालेखापरिक्षण यांनी वित्तीय वर्षातील चौकश्या याचांाही समावेश आहे.

**सी.व्ही.के अँड असोशिएटस**
सनदी लेखापाल
एफ आर एन १०१७४५ डब्ल्यु

**के.एस.अय्यर अँड कं.**
सनदी लेखापाल
एफ आर एन १००१८६डब्ल्यु

**जी. कापडीया अँड कं.**
सनदी लेखापाल
एफ आर एन १०४७६७ डब्ल्यु

**अशोक के. प्रधान**
भागीदार
सदस्य क्र. ३२१५६

**राजेश एस. जोशी**
भागीदार
सदस्य क्र. ३८५२६

**राजन आर अशर**
भागीदार
सदस्य क्र. ४८२४३

स्थळ : मुंबई
दिनांक : १२ सप्टेंबर २१०३

# दि. ३१ मार्च २०१३ रोजीचा ताळेबंद

(रक्कम ₹ मध्ये)

| | | | टिपा क्र. | ३१-०३-२०१३ रोजी | ३१-०३-२०१२ रोजी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | **सहभअग आणि दायित्वे** | | | | |
| | **(१)** | **भागधारकांचा निधी** | | | |
| | | अ) भाग भांडवल | १ | ५५,३४६,४४५,६४० | ५१,४०८,४६७,००० |
| | | ब) राखीव आणि अधिकय | २ | १६,६०४,८७५,०५२ | ११,७२५,०८२,६९५ |
| | | क) फ्लाय ॲश वापर निधी | २(ए) | - | - |
| | **(२)** | **शेअर ॲप्लीकेशन मनी -** | | १४,०२३,३२४,८९७ | ५,७७७,९३३,५३७ |
| | | वाटप प्रलंबित असलेला -(संदर्भ टिपा क्र.२४) | | | |
| | **(३)** | **चालू नसलेली दायित्वे** | | | |
| | | अ) दीर्घ मुदतीची कर्जे | ३ | १८९,२६३,७९३,२५३ | १२३,९११,७९८,८१० |
| | | ब) स्थगित कर दायित्व(निव्वळ) | ४ | १०,०४२,९२१,३०१ | ७,७७९,०८३,९४१ |
| | | क) इतर दीर्घ मुदतीची दायित्वे | ५ | २३,४३८,५१८,२२९ | १०,६०७,६३०,१३७ |
| | | ड) दीर्घ मुदतीच्या तरतुदी | ६ | ६,५९२,४०३,०६३ | ६,३१७,१९५,८७१ |
| | **(४)** | **चालू दायित्वे** | | | |
| | | अ) अल्प मुदतीची कर्जे | ३(ए) | ५५,४८९,४९०,३३६ | ६१,५०९,०५०,००० |
| | | ब) व्यापारी देणी | | ३४,०११,१८७,७०८ | ३१,६८७,७५६,१४७ |
| | | क) इतर चालू दायित्वे | ७ | ५२,०१३,७१३,४१५ | ४८,०७३,८००,६९३ |
| | | ड) अल्पमुदतीच्या तरतुदी | ६ | ३,२१०,१८४,५९२ | १,९८६,९१३,९६५ |
| | | **एकूण** | | **४६०,०३६,८५७,४८६** | **३६०,७९२,७१२,७९६** |
| २. | **मत्ता** | | | | |
| | **चालू नसलेल्या मत्ता** | | | | |
| | अ) | स्थिर मत्ता: | | | |
| | | १) मुर्त भत्ता (निकाळ गट) | ८ | १६१,४५७,९५८,३६५ | ८५,४४५,५४०,२७० |
| | | २) अमूर्त मत्ता | ८ | २४९,५५५,१५० | २५,८१९,६११ |
| | | ३) प्रगती पथावरील भांडवली कामे( निव्वळ) | | १५७,४७५,१८८,०१३ | १६०,६८३,१८०,८०७ |
| | | वजा : निकामी साठी तरतूद | | ७८,३०४,९४६ | ११४,०९६,६०६ |
| | | | | १५७,३९६,८८३,०६७ | १६०,५६९,०८४,२०१ |
| | | ४) विकसीत होणाऱ्या अमुर्त मत्ता | | - | २५४,४५९,०१७ |
| | ब) | चालू नसलेल्या गुंतवणुकी | ९ | २६,६००,००० | २६,६००,००० |
| | क) | दीर्घ मुदतीची कर्जे व अग्रीमे | १० | ६,५३३,१८३,२९६ | १५,५३१,६०२,१५२ |
| | **चालू मत्ता** | | | | |
| | अ) | वस्तू सुची | ११ | १७,१५८,७५०,४७६ | १४,२४४,२१८,७६४ |
| | ब) | व्यापारातील प्राप्य | १२ | ७१,३३०,०८३,६७१ | ४२,९५९,०१९,४९४ |
| | क) | रोख व रोख समतूलय | १३ | १,२०८,३११,९८१ | २९८,७१३,६५१ |
| | ड) | अल्प मुदतीची कर्जे व अग्रीमे | १० | २९,३८८,२३१,३१६ | ३१,३७२,८१९,९४१ |
| | इ) | इतर चालू मत्ता | १४ | १५,२८७,३००,१६४ | १०,०६४,८३५,६९५ |
| | | **एकूण** | | **४६०,०३६,८५७,४८६** | **३६०,७९२,७१२,७९६** |
| | | वीत्तीय विवरणपत्रांसोबतच्या टिपा पहाव्यात. | | | |

आमच्या जोडलेल्या अहवालानुसार
**सी व्ही के असोशिएट्स**
सनदी लेखापाल
(एफ आर एन-१०१७४५ डब्ल्य)
**ए के.प्रधान**
भागीदार (सदस्यता क्र.३२१५६)

**के.एस.अय्यर अँड कंपनी**
सनदी लेखापाल
(एफ आर एन १००१८६ डब्ल्यू)
**(राजेश एस जोशी)**
भागीदार (सदस्यता क्र. ३८५२६)

**जी एम कापडीया अँड कं.**
सनदी लेखापाल
(एफ आर एन १०४७६७डब्ल्यू)
**राजन अशर**
भागीदार (सदसयता क्र. ४८२४३)
मुंबई, दि. १२ सप्टेंबर २०१३

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी करिता**

**जे के श्रीनिवासन**
संचालक(वित्त)

**आशिष शर्मा**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

**एस. के. लाबडे**
मुख्य महाव्यवस्थापक (लेखा)

**राहुल दुबे**
कंपनी सचिव

# दि. ३१ मार्च २०१३ रोजी संपलेल्या वर्षाचे नफा व तोटा पत्रक

(रक्कम ₹ मध्ये)

| | | | टिपा क्र. | २०१२-२०१३ | २०११-२०१२ |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्रवर्तना पासूनचा महसूल | | १५ | १६४,२३८,६२०,९६६ | १२७,४४६,३८०,१४६ |
| २. | इतर उत्पन्न | | १६ | २,१९१,८४३,६७७ | १,५०२,८८७,३०७ |
| **३.** | **एकूण महसूल (१  २)** | | | **१६६,४३०,४६४,६४३** | **१२८,९४९,२६७,४५३** |
| ४. | खर्च | | | | |
| | अ) | वापरलेल्या साहित्याची किंमत | १७ | १०८,२२१,२०५,०६९ | ९५,०२०,०५४,७०१ |
| | ब) | कर्मचारी लाभ खर्च | १८ | ९,१००,३६४,२८० | ७,९३२,७३३,३७० |
| | क) | वित्त खर्च | १९ | १३,६११,०७०,१४५ | ८,४९८,२९२,०४० |
| | ड) | घसारा/कर्जफेडीची तरतूद | ८ | ५,५६९,६८८,९८६ | ४,०३१,२५५,३६३ |
| | इ) | इतर खर्च | २० | २०,६५०,५०६,४४५ | ११,४६५,९२६,३२३ |
| | **एफ)** | **एकूण खर्च** | | **१५७,१५२,८३४,९२५** | **१२६,९४८,२६१,७९७** |
| ५. | कर पूर्व नफा(३-४) | | | ९,२७७,६२९,७१८ | २,००१,००५,६५६ |
| ६. | कर खर्च | | | | |
| | अ) | चालू खर्च | | २,१३४,०००,००० | ४०८,०००,००० |
| | ब) | स्थगित खर्च | | २,२६३,८३७,३६१ | (४१०,१५७,८६८) |
| | | | | | |
| **७.** | **नफा (तोटा) कालावधीचा** | | | **४,८७९,७९२,३५७** | **२,००३,१६३,५२४** |
| ८. | प्रति समभाग मिळकत | | | | |
| | | (१) मूळ | | ०.७९ | ०.३८ |
| | | (२) सोम्य | | ०.७९ | ०.३८ |
| | | वित्तीय विवरणा सोबतच्या टिपा पहाव्यात. | | | |

आमच्या जोडलेल्या अहवालानुसार
**सी व्ही के असोशिएट्स**
सनदी लेखापाल
(एफ आर एन-१०१७४५ डब्ल्य)
**ए के.प्रधान**
भागीदार (सदस्यता क्र.३२११५६)
**के.एस.अय्यर अँड कंपनी**
सनदी लेखापाल
(एफ आर एन १००१८६ डब्ल्यू)
**(राजेश एस जोशी)**
भागीदार (सदस्यता क्र. ३८५२६)
**जी एम कापडीया अँड कं.**
सनदी लेखापाल
(एफ आर एन १०४७६७डब्ल्यू)
**राजन अशर**
भागीदार (सदसयता क्र. ४८२४३)
मुंबई दि. १२ सप्टेंबर २०१३

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी करिता**

**जे के श्रीनिवासन**
संचालक(वित्त)

**आशिष शर्मा**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

**एस. के. लाबडे**
मुख्य महाव्यवस्थापक (लेखा)

**राहुल दुबे**
कंपनी सचिव

# वित्तीय विवरण पत्रांवर टिपा

## १) दि. ३१ मार्च २०१३ रोजी संपलेल्या वर्षाच्या वित्तीय विवरणपत्राचा भाग असलेल्या लेखांवरील टिपा आणि महत्वाची लेखाविषयक धोरणे.

### ए) वित्तीय विवरणपत्रे तयार करण्याचे आधारतत्त्व.

महाराष्ट्र राज्य वीज निर्मितीकंपनी ही कंपनी अधिनियम १९५६ च्या तरतुदीनुसार नोंदणी केलेली एक सार्वजनिक मर्यादित कंपनी (पब्लिक लिमिटेड) संस्था आहे.ही कंपनी विद्युत अधिनियम २००३ याने शासित आहे.जेव्हा कंपनी अधिनियम १९५६यातील तरतूदी विद्युत अधिनियम २००३ व त्यांची नियमावली यातील तरतुदीस विसंगत असतील तेव्हा विद्युत अधिनियम २००३मधील तरतुदी अभिभावी होतील.

सदर लेखा 'चालु असणारी संस्था' या संकल्पनेच्या व ऐतिहासिक खर्चसंकेत या आधारे तयार केले आहेत. सर्वसाधारणपणे सर्वमान्य असलेली लेखातत्वे व अधिसूचना क्र. जी.एस.आर. ७३९(इ) दि. ७ डिसेंबर २००६ यानुसार केलेली नियमावली यातील प्रत्यक्ष बाजू याची पूर्तता करण्यासाठी कंपनी लेखा तयार करताना उपार्जन तत्वांचा अवलंब करते.

### बी) अंदाजाचा वापर:

सर्वसाधारण सर्वमान्य लेखा तत्वांचा सुसंगत अशी वित्तीय विवरण पत्रे तयार करण्यासाठी त्यातील तारखांना नोंदलेल्या मत्ता व दायित्वे याच्या रकमांवर तसेच अहवाल काळातील महसूल व खर्च याच्या रकमांवर परिणाम करतील असे अंदाज व गृहीते करावी लागतात. ज्या कालावधीत निकाल माहिती झाले/प्रत्यक्षात दिसून आले त्यात निकाल व अंदाज यातील फरक मान्य केले जातात.

### सी) मुर्त स्थीर मत्ता

१) कंपनीच्या स्थीर मत्ता लेखा पुस्तकांत नोंदल्या जातात व ऐतिहासिक खर्चानुसार वार्षिक लेखात जाहीर केल्या जातात. स्थीर मत्ता या संपादनाचा किंवा बांधकामाचा खर्च वजा संचित घसारा अणि निकामी/नादुरुस्त याची तरतूद, याप्रमाणे नमुद केल्या जातात.

२) संपादनाच्या खर्चात वाहतूक आकार, शुल्के व कर (कर्ज प्राधिकारी यांच्याकडून पून:प्राप्त असणारे वगळून), वसुली, कर्जाचा खर्च व सदर मत्ता तिच्या उद्देशित वापरासाठी तयार करण्याकरिता केलेले सर्व प्रासंगिक खर्च समाविष्ट आहेत.

३) नवे प्रकल्प / विस्तार या स्थीर मत्ता कार्यान्वित करण्याच्या तारखेपर्यंत करावे लागणारे संबंधित खर्च/ व्याज खर्च यांचे भांडवलीकरण केले जाते.

४) कंपनीने स्वत:च्या मालकीचा हक्क नसणाऱ्या स्थीर मत्तांच्या उभारणीसाठी केलेला खर्च, अशा मत्तांचे उभारणीचे काम चालू आहे तो पर्यंत 'प्रगतीपथासाठी भांडवली कामे' याचा भाग असा दाखविला जातो. त्यानंतर तो स्थीर मत्तांच्या अनुसूचीत ''कंपनीचे मालकी नसलेल्या मत्ता निर्मितीचा भांडवली खर्च'' या लेखा शीर्षकाखाली दाखविण्यात येतो.

५) ज्या प्रकरणी अनामत रकमा / कामाचे कंत्राट यानुसार भांडवली कामे प्रगतीपथावर असतात आणि कंत्राटदाराची देयके अंतीमत: चुकता करणे पूर्ण झाले नसेल तर त्याचे अंतीम देणे ज्यावर्षी पूर्ण होईल त्याच्या आवश्यक समायोजनाच्या अधीन राहून त्यांचे भांडवलीकरण हंगामी तत्वावर केले जाते.

७) कंपनीचे प्रकल्प व युनीटचे नियोजन करणे यासाठी कालावधीत केलेला एकूण खर्च हा संबंधित प्रगतीपथावरील भांडवली कामे यांच्या लेखात अर्थवृद्धीच्या आधारे संविभाजित केला जातो.

८) प्रकल्प / वीज निर्मिती यासाठीचा प्रायोगिक तत्वावरील खर्च व त्यातून प्राप्त महसूल / उत्पन्न यांचे भांडवलीकरण केले जाते.

९) एखाद्या प्रकल्पाच्या मंजूरीसाठी तो शोधणे, सर्वेक्षण करणे व सिद्धतेसाठी अभ्यास करणे यावरील खर्च हा सदर प्रकल्प अंतीमत: नाकारणे किंवा तीन वर्षे पर्यंत यापैकी जे आधी असेल ते, तोपर्यंत 'प्रगतीपथावरील भांडवली कामे' यामध्ये लक्षणीय बाब असा दाखविला जातो. जर नाकारला तर सदर खर्च नाकारण्याच्या वर्षात महसूल आकारला जातो.

१०) जर काही स्थीर मत्ता करिता शासकीय अनुदाने मिळाली असतील तर त्या स्थीर मत्ता लेखा पुस्तकात अनुदानाच्या निव्वळ प्राप्तीनुसार दाखविल्या जातात.

११) ज्या स्थीर मत्तांची प्रत्येकी किंमत ₹ ५०००/– पर्यंत असेल त्यांची खरेदी वर्षात घसारा संपूर्णत: केला जातो. मोबाईल फोनची किंमत खरेदी वर्षात महसूलात आकारली जाते.

१२) ज्या मत्ता निवृत्त केल्या जातात व विक्रीसाठी काढल्या जातात त्यांचे मूल्य, किंमतीप्रमाणे किंवा निव्वळ वसूली योग्य मूल्य, यापैकी जे कमी असेल, त्याप्रमाणे केले जाते.

(१३) **अमूर्त मत्ता**

अमूर्त मत्तांच्या बाबतीत जर अशा मत्तांचे भविष्यात आर्थिक फायदे कंपनीकडे प्रवाहीत होणार असतील तर त्यांचे खर्च वजा कर्ज फेडीची संचित तरतूद व कमी करण्यातील तोटे, याप्रमाणे त्याचे भांडवलीकरण केले जाते.

**डी) कर्ज खर्च**

पात्र मत्तांचे संपादन किंवा , बांधकाम याच्या खर्चाचे भांडवलीकरण 'मत्तांच्या खर्चाचा एक भाग' याप्रकारे केले जाते. पात्र मत्ता म्हणजे अशी मत्ता जी उद्देशित उपयोगासाठी तयार होण्यस बराच अवधी लागतो. कोणत्याही भांडवली मत्तांचे संपादन किंवा बांधकाम यासाठी न लागलेल्या कर्जाच्या खर्चास, ज्या काळात करणयत आले त्यातील खर्च म्हणून मान्य केले जातात.

**ई) मत्ता कमी करणे**

कंपनी ताळेबंदच्या तारखेला प्रत्येक स्थीर मत्ताचे तसेच रोकड निर्मितीचे घटक (सी.जी.यू) यात समाविष्ट होणाऱ्या मत्तांच्या गटांचे जर त्या कमी करण्यासाठी आवश्यक असतील तर मुल्यांकन करते. अशा मत्ता किंवा रोकड निर्मितीचे घटक (सी.जी.यू) चालू ठेवण्याचा खर्च वसूल होणाऱ्या खर्चापेक्षा जास्त असेल तर त्या कमी करण्याची तरतूद केली जाते.

**एफ) महत्त्वाची / विमा काढलेली यंत्रे, सुटेभाग**

१) कारखाना व यंत्रे यासोबत यंत्राचे सुटेभागही मिळविले जातात. ज्यांचा उपयोग अनियमीत असल्याचे अपेक्षित असेल तर आणि त्या सुट्या भागांचा खर्च माहिती असेल तर त्यांचे वेगळे भांडवलीकरण संबंधित कारखान्या समवेत केले जाते.

२) त्यानंतर प्रापण केलेल्या सुट्या भागांचे भांडवलीकरण खरेदी वर्षात केले जाते.

३) संबंधित कारखाना व यंत्रे यांच्या शिल्लक उपयोगी आयुष्याकरिता सुट्या भागांचा पूर्ण घसारा केला जातो.

४) सुट्या भागांचे कमी झालेले मूल्य हे ज्या वर्षाला ते बदलण्यात आले व जुने भाग निरुपयोगी ठरविण्यात आले, त्यावर्षीच्या महसूलात आकारले जातात. मात्र जर जुने संबंधित सुटे भाग दुरुस्ती करून पून: वापरणे शक्य असेल तर दोन्ही चालू ठेवून त्यांचा घसारा संबंधित मत्तेच्या उर्वरित उपयुक्त आयुष्यानुसार केला जातो. जुन्या संबंधित सुट्या भागाच्या दुरुस्तीचे आकार नफा व तोटा पत्रकात आकारले जातात.

५) जर बदललेल्या मत्तेचा भाग / भांडवली सुटे भाग यासाठी त्यांच्या मूळ मत्तांच्या भागाच्या /सुट्या भागाच्या निर्लेखन किंमति माहिती नसतील तर नवीन मत्तांचा भाग/ नवीन भांडवली सुटेभाग यांचा खर्च / निव्वळ पुस्तकी मुल्य निर्लेखित केला जातो.

**यांत्राचे सुटे भाग (महत्त्वाची / विम्याची यंत्रे सुटे भाग या व्यतिरिक्त)**

६) इतर सुटे भागांना "भांडार माल व सुटे भाग" असे समजून ते वस्तूसूचीचा एक भाग होतात. त्यांचे खर्चाप्रमाणे किंवा प्रत्यक्ष निव्वळ किंमतिप्रमाणे जो कमी असेल व जेव्हा दिले त्याप्रमाणे मूल्यांकन होते.

**जी) घसारा / कर्जफेडीची तरतूद:**

**१) मूर्त स्थीर मत्ता:**

केंद्रीय वीज निमायक आयोग (सीईआरसी) यात दि. ६ जून २००६ रोजीच्या दर धोरणानुसार अधिसुचित केलेल्या दरपत्रकांप्रमाणे कंपनी घसाऱ्याची तरतूद सरल रेषा पद्धतीने मत्तांच्या घसाऱ्याची ९० टक्क्यांपर्यंत करते.

मत्तांची भर/ वगळणे यासाठीची तरतूद ज्या महिन्यात या मत्ता उपयोगासाठी उपलब्ध झाल्या /विल्हेवाटीस योग्य झाल्या, त्याप्रमाणे यथाप्रमाण पद्धतीने त्यांच्या घसाऱ्याची तरतूद केली जाते.

जेव्हा एखाद्या मत्तेचे आयुष्य आणि / किंवा कार्यक्षमता नूतनीकरणाने व आधुनिकीकरणाने वाढली असेल, तर त्याचा खर्च आणि त्या सोबत कर्जफेडी न झालेली तरतूदीची रक्कम याचा आकार तांत्रिक मूल्यांकनानंतर निश्चित केलेल्या सुधारीत उपयुक्त वर्षासाठी आकारला जातो.

भाडेपट्टीच्या जमीनीच्या कर्जफेडीची तरतूद तिच्या मुदतीसाठी केली जाते.

२) **विविध श्रेणीतील मत्तांचे घसारा दर असे आहेत.**

| | |
|---|---|
| हायड्रॉलीक कामे | १.८०% ते ३.६०% |
| इमारती व इतर स्थापत्य कामे | १.८०% ते ३.६०% |
| कारखाना व यंत्रसामुग्री | २.५७% ते १८.००% |
| पारेषण तारा, केबल जाळे इ. | २.५७% ६.००% |
| फर्नीचर , फिक्चर्स व कार्यालयीन साधने | ६.००% |
| वाहने | १८.००% |

३) **अमूर्त मत्ता :**

नवीन ॲप्लीकेशन सॉफ्टवेअर खरेदी करणे, सदर सॉफ्टवेअरची कार्यवाही बाह्य तिसऱ्या पक्षीय सल्लागाराकडून करून घेणे व त्याचे परवाने खरेदी करणे, या बाबींच्या खर्चाचे भांडवलीकरण केले जाते. त्याच्या कर्ज फेडीची तरतूद करताना त्याचे उपयुक्त आयुष्य दहा वर्षापेक्षा जास्त नाही असा अंदाज केला जातो. इतर अमूर्त मत्तांच्या कर्जफेडीची तरतूद, त्यांच्याकडून पुरेसे आर्थिक लाभ मिळू शकतील एवढ्या मुदतीसाठी केली जाते.

**एच) वस्तुसूची:**

सामग्रीचा साठा, भांडारे , सुटे भाग यांचे मुल्यांकन किमान किंमत किंवा निव्वळ प्रत्यक्ष मूल्य यानुसार केले जाते. किंमतीची निश्चिती वेटेड ॲव्हेरज कॉस्ट पद्धतीने होते. किंमतीमध्ये खरेदी खर्च ( परत मिळू शकणाऱ्या मुल्यद्यिष्टात करा इतका ) आणि या वस्तू त्यांच्या जागेवर व स्थितीत ठेवण्यासाठीचा इतर खर्च याचाही समावेश आहे.

निरुपयोगी ठरलेल्या व बिघडलेल्या जुन्या वस्तू व सुटे भाग या निश्चित करण्यासाठी आढावा घेतला जातो व लेखात तरतूद केली जाते.

**आय)महसूल मान्यता**

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (एम इ आर सी) यांनी मंजूर केलेल्या दर पत्रकाच्या आधारे वीज विक्रीची लेखानोंद केली जाते. त्यामध्ये इंधन समायोजन आकार तसेच लेखांच्या मुदतीच्या अखेरीपर्यंत उपार्जित झालेला विना देयक महसूल यांचा समावेश असतो.

फ्लाय ॲश (राख) विक्रीची लेखा नोंद ग्राहकांनी मान्य केलेल्या दराप्रमाणे होते. या साठी जमा झालेल्या रक्कमेची लेखा नोंद पर्यावरण व वन मंत्रालयाने दिनांक ०३-११-२००९ रोजी दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार, "फलाय ॲश वापर निधी" या वेगळ्या लेखाशीर्षात केली जाते. राख वापरास प्रोत्साहन देण्यासाठी केलेल्या खर्चाच्या मर्यादेइतका वापर या निधीतून केला जातो.

इतर उत्पन्न उपार्जित तत्त्वानुसार मान्य केले जाते. भंगार माल आणि नाकारलेला कोळसा यांच्या विक्रीच्या कंत्राटानुसार त्याची लेखानोंद होते. परिस मापनातील नुकसानीची वसूली, ज्या वर्षी ती प्रत्यक्ष होईल त्यावर्षीच्या उत्पन्नात मान्य केली जाते/ स्थीर मत्तांमध्ये त्यांचे समायोजन केले जाते.

**जे) गुंतवणूकी**

दीर्घ मुदतींच्या गुंतवणूकीचे वर्गीकरण 'चालू नसलेल्या' अशाप्रकारे व खर्चानुसार केले जाते. हंगामि गुंतवणूकी वगळता, या गुंतवणूकीच्या घटीसाठी केलेली तरतूद , त्यांच्या मूल्यातून वजा केली जाते.

**के) परकीय चलनातील व्यवहार:-**

परकीय चलनातील व्यवहाराची नोंद, अहवालाच्या चलनाच्या प्रारंभीच्या मान्यतेनुसार केली जाते. यासाठी अहवालातील चलन व परकीय चलन यांच्यातील व्यवहाराच्या दिवशीचा विनिमयाचा दर सदर परकीय चलनासाठी लावला जातो.

ताळेबंदाच्या तारखेला, बंद होण्याच्या दरानुसार परकीय चलनातील निधी विषयक बाबीनुसार अहवालात नोंदल्या जातात. यात जर लाभ किंवा हानी असेल तर, ती त्या वर्षाच्या नफा-तोटा पत्रकांत मान्य केली जाते.

**एल) कर्मचारी लाभ:**

**१) अल्प मुदतीचे कर्मचारी लाभ:-**

कर्मचाऱ्यांनी दिलेल्या सेवेच्या बदल्यात त्यांना अपेक्षेनुसार द्यावयाच्या अल्प मुदतीच्या कर्मचारी लाभाच्या विना सवलतीची रक्कमेला कंपनी दायित्त्व म्हणून मान्यता देते. (उपर्जित खर्च).

**२) नोकरी नंतरचे लाभ:-**

व्याख्यांकित लाभ योजना

**उपदान व रजेचे रोखीकरण:**

उपदानासाठी व रजा रोखीकरण या निवृत्तीनंतरच्या उपार्जित दायित्त्वासाठीची तरतूद, विमा गणिती शास्त्राने निश्चित केलेल्या दायित्त्वानुसार , वर्षाच्या अखेरीस केली जाते.

**भविष्य निर्वाह निधी लाभ:**

भविष्य निर्वाह निधीसाठी पूर्व निश्चित दराने अंशदान व त्यासोबत कर्मचाऱ्याचे योगदान याचा भरणा, कंपनी एका वेगळ्या विश्वस्तांकडे करते. हे विश्वस्त इतर कंपन्यांच्या गटाच्या निधीचेही व्यवस्थपन करते. हा निधी परवानगी दिलेल्या प्रतिभूती यामध्ये गुंतवला जातो. या निधीसाठी मुदतीमध्ये केलेल्या वाट्यास खर्च म्हणून मान्यता दिली जाते व तिची आकारणी नफा व तोटा पत्रकात केली जाते.

**एम) भाडेपट्या:-**

वित्तीय भाडेपट्टी:-

महाराष्ट्र विद्युत सुधारणा योजना २००५ ( हस्तांतरणयोजना) अंतर्गत हस्तांतरीत झालेल्या वित्तीय भाड्याच्या मत्तांबाबत , भाडी जेव्हा उपार्जित होते, तेव्हा ते नफा व तोटा पत्रकात आकारले जाते. दि. ५ जून २००५ नंतर संपादित केलेल्या मत्तांचे वर्गीकरण वित्तीय भाडेपट्या असे केले जाते . या मत्तांच्या मालकीची संपूर्ण जोखीम व मोबदला यांची मोठी जबाबदारी कंपनीवर असते. अशा मत्ता घेताना सुरुवातीस त्यांचे रास्त मुल्यांपेक्षा कमीस्तरावर किंवा किमान भाड्याच्या भरण्याच्या

विद्यमान मुल्यानुसार भांडवलीकरण केले जाते आणि त्याच्या सममुल्य रक्कमेचे दायित्व निर्माण केले जाते. भरलेल्या भाड्यांचे दायित्त्व व व्याजखर्च यात वाटप होते.त्यातून प्रत्येक कालावधीसाठीच्या थकीत दायित्त्वा वरील व्याजाचा स्थीर मुदतीचा दर वाढला जातो. जल विद्युत निर्मिती केंद्राच्या संबंधीत सुविधा सोबतचा भाडेपट्टीच्या कराराची नोंद महाराष्ट्र शासना सोबत केलेली नाही.

प्रवर्ती भाडे:

भाड्याने घेतलेल्या ज्या मत्तांच्या मालकी बाबात जोखमी व मोबदले प्रभावीरित्या , भाडेकरुंने ठेवल्या असतात, त्यांचे वर्गीकरण प्रवर्ती भाडेपट्या असे केले जाते व भाड्याच्या रकमेस सरळ रेषा पद्धतीच्या आधारे या प्रवर्ती भाड्यास मान्यता दिली जाते.

**एन) कर:**

**१) आयकर :**

वर्षभरातील करप्राप्त उत्पन्नावरील चालु कर हा आयकर अधिनियम १९६१ च्या तरतुदीनुसार निश्चित केला जातो. तसे करताना परवानगी योग्य कर सवलती, कपात/ नामंजूर बाबी या विचारात घेतल्या जातात. आयकर अधिनियम १९६१ च्या कलम ११५ जेबी मधील एम ए टी तरतूदी जर चालू करास दिल्या असल्या, तर असा भरणा जमा करण्याचा लाभ नंतरच्या दहा कर निर्धारण वर्षात उपलब्ध असतो. म्हणून तो प्रत्यक्ष मिळाल्यानंतर मान्य केला जाईल.

**२) स्थगित कर :**

स्थगित कर हा एका मुदतीमध्ये कर प्राप्त उत्पन्न व लेखांकित उत्पन्न यांच्यातील फरक , अशाप्रकारे काळा नुरुप फरकानुसार मान्य केला जातो. एका कालावधीत झालेला फरक नंतरच्या एका किंवा जास्त कालावधीत उलट नोंद करण्यास पात्र असतो. मात्र तो लेखा मानक २२ 'आयकराची लेखानोंद' नुसार कराचा दर व ताळेबंदाच्या तारखेपर्यंत केलेले अधिनियम यांचा सुज्ञ वापर विचारात घेण्याच्या अधीन असते, अशोषित घसारा किंवा पुढील पानावर नेलेल्या हानी यांचे साठी स्थगित कर मत्ता यांना त्यांच्या भविष्यातील प्रत्यक्ष देणी यामर्यादित मान्यता दिली जाते. इतर स्थगीत कर देणे, भविष्यात देण्याचे खात्री असली तर त्यांना त्या प्रमाणात मान्यता दिली जाते.

**ओ) पूर्वकालीन बाबी व असाधारण बाबी**

या पूर्वीच्या वर्षातील विवरणपत्रातील चूका किंवा राहिलेल्या बाबी यामुळे करावे लागलेले समायोजन याची लेखा नोंद 'मागील काळातील बाबी' या अंतर्गत केली जाते.

**पी) तरतूदी, आकस्मिक दायित्त्वे आणि आकस्मिक मत्ता:**

जुन्या घटनांच्या परिणामामुळे ज्याचे सध्या बंधन आहे आणि ज्यासाठी मोठ्या प्रमाणात संसाधनांचे बहिर्गमन होणार आहे, व ज्यासाठी मोठ्या प्रमाणात मोजमाप घेऊन अंदाज करावा लागतो, त्या तरतूदी मान्य केल्या जातात.

आकस्मिक दायित्त्वे ( प्रत्येकी ₹ १० लाखापेक्षा जास्त मूल्याचे) मान्य केली जात नाहीत; परंतु त्या टिपांमध्ये प्रकट केल्या जातात. वित्तीय विवरण पत्रे मंजूर होण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे आकस्मिक दायित्त्वाचे वित्तीय परिणाम उघड केले जातात.

आकस्मिक मत्तांना वित्तीय विवरण पत्रात मान्यता दिली जात नाही.

**क्यू) शासकीय अनुदान धोरण:-**

विशिष्ट स्थीर मत्ता संबंधीची शासकीय अनुदाने अशा स्थीर मत्तांच्या ठोक मूल्यातून वजा केली जातात. शासकीय अनुदाने महसुलांशी संबंधित आहेत, त्यांची लेखा नोंद एका पद्धतीच्या आधारानुसार त्यांस योग्य अशा काळावधीकरिता व त्याच्या ज्या भरपाईचया हेतूच्या खर्चासाठी देण्यात आल्या आहेत. त्याला अनुरुप ठरतील अशाप्रकारे नफा व तोटा पत्रकात करण्यात येते.

## २) पूनर्रचना योजना: -

महाराष्ट्र विद्युत सुधारना योजना २००५ अंतर्गत कंपनीच्याकडे हस्तांतरीत झालेल्या मत्ता व दायित्त्वे यांच्या दि. ०६ जून २००५ रोजीच्या शिल्लकी समाविष्ट आहेत. या शिल्लकींना मराविंम सूत्रधारी कंपनी लि. चि मंजूरी दिली आहे. महाराष्ट्र शासनाकडून अंतिम हस्तांतरण योजना, अद्याप अधिसूचित व्हायची आहे. त्याचा प्रभाव कंपनीच्या वित्तीय विवरण पत्रांवर होऊ शकेल.

पूर्वीच्या म.रा.वि.मंडळाच्या कर्जाचे वाटप, हस्तांतरण योजनेमुळे अस्तित्त्वाात आलेल्या उत्तराधिकारी कंपन्यामध्ये करण्यात आले. यातील काही कर्जावर मधल्या काळात महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि. (महापारेषण) या कंपनीने काही कार्य केले होते. ते आता महानिर्मिती कंपनीकडे देण्यात आले आहे व त्यास सूत्रधारी कंपनीने मंजूरी दिली आहे. त्यानुसार मुद्दलाचि रक्कम ₹ १,६८७,९३६,३५०/- आता एकूण व्याजाच्या परतफेडीची रक्कम ₹ ५२,०१८,५४०/- महापारेषण कंपनीला देण्यात आली. योजनेची अंतीम अधिसुचना प्रलंबित असल्याने राखीव/ शेअर ॲप्लीकेशन मनी वाटपाचा प्रलंबित लेखा यावरील प्रभाव दिलेला नाही. त्याचे समायोजन महापारेषण कंपनी कडील प्राप्य / देय शिल्लकी सोबत करण्यात आलेले आहे.

**टिपा क्र. १)**

**भाग भांडवल :**

**१) अधिकृत भाग भांडवल**

| भागांचा वर्ग | सममूल्य | ३१ मार्च २०१३ रोजी | | ३१ मार्च २०१२ रोजी | |
|---|---|---|---|---|---|
| | ₹ | भागांची संख्या | रक्कम (₹) | भागांची संख्या | रक्कम (₹) |
| समभाग | १० | २५,०००,०००,००० | २५०,०००,०००,००० | २५,०००,०००,००० | २५०,०००,०००,००० |

**२) वितरीत केलेले, घेतलेले वभरणा केलेले भांडवल (पूर्ण भरणा झालेले.)**

| भागांचा वर्ग | सममूल्य | ३१ मार्च २०१३ रोजी | | ३१ मार्च २०१२ रोजी | |
|---|---|---|---|---|---|
| | ₹ | भागांची संख्या | रक्कम (₹) | भागांची संख्या | रक्कम (₹) |
| समभाग | १० | ५,५३४,६४४,५६४ | ५५,३४६,४४५,६४० | ५,१४०,८४६,७०० | ५१,४०८,४६७,००० |

### ३) शिल्लक भागांच्या संख्येचा मेळ करणे

| भागांचा वर्ग | ३१ मार्च २०१३ रोजी समभाग | | ३१ मार्च २०१२ रोजी समभाग | |
|---|---|---|---|---|
| | भागांची संख्या | रक्कम (₹) | भागांची संख्या | रक्कम (₹) |
| वर्षारंभीची शिल्लक | ५,१४०,८४६,७०० | ५१,४०८,४६७,००० | २,५००,०५०,००० | २५,०००,५००,००० |
| कालावधीतील भर | ३९३,७९७,८६४ | ३,९३७,९७८,६४० | २,६४०,७९६,७०० | २६,४०७,९६७,००० |
| वर्षा अखेरची शिल्लक | ५,५३४,६४४,५६४ | ५५,३४६,४४५,६४० | ५,१४०,८४६,७०० | ५१,४०८,४६७,००० |

### ४) हक्क, पसंती, निर्बंध, लाभांश वाटपावरील निर्बंधासह आणि भांडवलाची परतफेड

१) कंपनीकडे फक्त एकाच वर्गाचे भाग आहेत. म्हणजेच ज्यांचे नाममात्र मुल्य प्रती भाग रु. १०/– आहे. असे समभाग.

२) कंपनीच्या प्रत्येक भागाच्या धारकास धारण केलेल्या प्रती भागास एक मताचा अधिकार आहे. संचालक मंडळाने प्रस्तावित केकेला लाभांश (अंतरीम लाभांश वगळता) हा भागधारकांनी वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये दिलेल्या मंजूरीच्या अधीन असेल.

३) जेव्हा असा लाभांश मंजूर होईल तेव्हा कंपनीच्या प्रत्येक लाभधारक त्यांनी धारण केलेल्या भागांच्या प्रमाणात लाभांश प्राप्ती करण्यास पात्र असेल.

४) कंपनीचे परिसमापन झाल्यास, कंपनीच्या सर्व धनकोंना मत्तांचे वाटप/परतफेड झाल्यानंतर समभाग धारकांना कंपनीच्या उर्वरित मत्ता प्राप्त करण्याचा हक्क राहील समभाग धारकांना त्यांनी धारण केलेल्या भागांच्या संख्येच्या प्रमाणात वाटप होईल.

### ५) सुत्रधारी कंपनीने धारण केलेले प्रत्येक वर्गातील भाग

| भाग धारकाचे नाव | ३१ मार्च २०१३ रोजी | ३१ मार्च २०१२ रोजी |
|---|---|---|
| | समभाग | समभाग |
| मराविम सुत्रधारी कं. लि (संख्या) | ५,५३४,५९४,५६४ | ५,१४०,७९६,७०० |
| मराविम सुत्रधारी कं. लि (रक्कम ₹ मध्ये) | ५५,३४५,९४५,६४० | ५१,४०७,९६७,००० |

### ६) कंपनीच्या ज्या भागधारकांनी प्रत्येकी ५ टक्क्यापेक्षा जास्त भाग धारण केले आहेत त्यांचा आणि सुत्रधारी कंपनीने धारण केलेल्या भागांचा तपशील

| भागधारकांचे नावसमभाग | ३१ मार्च २०१३ रोजी | | ३१ मार्च २०१२ रोजी | |
|---|---|---|---|---|
| | समभाग | भागाची टक्केवारी | समभाग | भागाची टक्केवारी |
| मराविमं. सूत्रधारी कं. लि. | ५,५३४,५९४,५६४ | ९९.९९ | ५,१४०,७९६,७०० | ९९.९९ |

## टिपा क्रं. २ :

(रक्कम ₹ मध्ये)

| राखीव आणि आधिक्य | ३१ मार्च २०१३ रोजी | ३१ मार्च २०१२ रोजी |
|---|---|---|
| **नफा व तोटा पत्रकाप्रमाणे आधिक्य**<br>वर्षारंभीची शिल्लक | ११,७२५,०८२,६९५ | ९,७२१,९१९,१७१ |
| अधिक<br>नफा व तोटा पत्रकातून स्थलांतरीत केलेला नफा | ४,८७९,७९२,३५७ | २,००३,१६३,५२४ |
| **अखेरची शिल्लक** | **१६,६०४,८७५,०५२** | **११,७२५,०८२,६९५** |

## टिपा क्र. २ (ए)

(रक्कम ₹ मध्ये)

| फ्लाय ॲश वापर निधी (टिपणी क्र. २२ पहावी) | ३१ मार्च २०१३ रोजी | ३१ मार्च २०१२ रोजी |
|---|---|---|
| वर्षारंभी | - | - |
| वर्षभरातील भर | ९५,३४०,८३४ | २२,५०८,७३७ |
| वर्षभरातील वापर | (९५,३४०,८३४) | (२२,५०८,७३७) |
| **अखेरची शिल्लक** | - | - |

## टिपा क्र. ३

(रक्कम ₹ मध्ये)

| दीर्घ मुदतीची कर्जे | | | दीर्घमुदतीच्या कर्जाची विद्यमान परिपक्वता | |
|---|---|---|---|---|
| **तपशील** | **३१ मार्च २०१३ रोजी** | **३१ मार्च २०१२ रोजी** | **३१ मार्च २०१३ रोजी** | **३१ मार्च २०१२ रोजी** |
| **प्रतिभूत कर्जे** | | | | |
| **मुदतीची कर्जे** | | | | |
| **वित्तीय संस्थाकडून घेतलेल्या** | | | | |
| वीज वित्त महामंडळ | ९३,७८२,२९७,७७० | ४९,८०५,५४६,६१० | ४,५९६,८०६,३१७ | ३,९७६,३०७,०२७ |
| ग्रामीण विद्युतीकरण महामंडळ | ८६,६४०,६३४,७७७ | ६७,६७१,२४५,१९४ | ४,३०९,९१६,६६७ | ३,६६५,५६४,११५ |
| हाऊसींग डेव्हलपमेंट कार्पोरेशन कडील खर्च | १४,७१५,८०७ | - | - | - |
| **बँकाकडील कर्ज** | | | | |
| मुदतीचे कर्जे | ३,६७८,५६२,९८७ | १,४७६,२८६,९२१ | ३१३,३९६,८०० | ५५१,३३०,८०९ |
| | **१८४,११६,२११,३४१** | **११८,९५३,०७८,७२५** | **९,२२०,११९,७८४** | **८,१९३,२०१,९५१** |
| **अप्रतिभूत कर्जे** | | | | |
| **मुदतीचि कर्जे** | | | | |
| **वित्तीय संस्थाची कर्जे** | | | | |
| वीज वित्त महामंडळ | २,८११,०३९,९५६ | ४,०१७,४६९,०७२ | १,२०६,४२९,१२५ | १,२२८,१२३,३३७ |
| **इतरांकडून** | | | | |
| के एफ डब्ल्यू १५० मे. वॅ सोलर (संदर्भ टिपा ३८ (एच)) | १,७०३,३९९,११४ | | ९८१,४८४,८०० | |
| महाराष्ट्र शासन | ६३३,१४२,८४२ | ९४९,२५१,०१३ | ३१६,२५०,००० | ३१६,२५०,१९६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| - | ५,१४७,५८१,९१२ | ४,९६६,७२०,०८५ | २,५०४,१६३,९२५ | १,५४४,३७३,५३३ |
| **एकूण** | १८९,२६३,७९३,२५३ | १२३,९११,७९८,८१० | ११,७२४,२८३,७०९ | ९,७३७,५७५,४८४ |
| वजा – इतर चालू दायित्त्वांकडे | | | (११,७२४,२८३,७०९) | (९,७३७,५७५,४८४) |
| **हस्तांतरीत** | १८९,२६३,७९३,२५३ | १२३,९११,७९८,८१० | – | – |
| अटी, शर्ती आणि प्रतिभूती यांच्या प्रकटनाकरीता टिपा क्र. २५(ए) जोडपत्र 'ए' पहावी | | | | |

## टिपा क्र. ३ (ए) अल्प मुदतीची कर्जे

(रक्कम ₹ मध्ये)

| | ३१ मार्च २०१३ रोजी | ३१ मार्च २०१२ रोजी |
|---|---|---|
| **मागणी नुसार परतफेडी योग्य कर्ज (प्रतिभूत)** | | |
| **बँकाकडून** | | |
| रोख जमा | २४,४८९,४९०,३३६ | ७,८७०,०००,००० |
| | **२४,४८९,४९०,३३६** | **७,८७०,०००,०००** |
| मागणी नुसार परतफेडी योग्य कर्ज (अप्रतिभूत) | | |
| बँकाकडून | | |
| बँकाकडून खेळते भांडवल | ३०,२००,८२४,२५१ | ३६,३९०,२०९,१९२ |
| बँकाकडून हंगामी कर्ज | ७९९,१७५,७४९ | ६४४,३४०,८०८ |
| बँकाकडून प्रकल्पासाठी विनिर्देशित कर्ज | – | १६,६०४,५००,००० |
| | **३१,०००,०००,०००** | **५३,६३९,०५०,०००** |
| एकूण | **५५,४८९,४९०,३३६** | **६१,५०९,०५०,०००** |
| अटी ,शर्ती व प्रतिभूती यांच्या प्रकटना करीता टिपा क्र. २५ (ए) , जोडपत्र "बी" पहावे. | | |

## टिपा क्र. ४

(रक्कम ₹ मध्ये)

| स्थगित कर | अखेरची शिल्लक दि. ३१ मार्च २०१३ रोजी | आरंभीची शिल्लक दि. ३१ मार्च २०१२ रोजी | वर्ष भरातील कपात / जमा |
|---|---|---|---|
| **स्थगित कर दायित्त्व** | | | |
| नोंदलेला घसारा/कर्जफेडीची तरतूद आणि कर घसारा यातील फरक | १९,२७६,९३७,८६५ | १३,०८९,३१९,६७३ | ६,१८७,६१८,१९३ |
| **स्थगित कर मत्ता** | | | |
| आयकर अधिनियम १९६१ च्या कलम ४३/बी अन्वये नामंजूर रक्कम | २,५३६,७७१,९९० | १,५१५,७३५,७२६ | १,०२१,०३६,२६४ |
| आयकर अधिनियम १९६१ कलम ४०(ए) (७) अन्वये नामंजूर रक्कम | १,४८८,५१९,३४१ | १,४५७,५५८,२९३ | ३०,९६१,०४८ |
| पुढे नेलेली अशोषित घसारा हानी | ५,२०८,७२५,२३३ | २,३३६,९४१,७१३ | २,८७१,७८३,५२० |
| **एकूण** | **९,२३४,०१६,५६४** | **५,३१०,२३५,७३२** | **३,९२३,७८०,८३२** |
| **निव्वळ स्थगित कर दायित्त्व** | **१०,०४२,९२१,३०१** | **७,७७९,०८३,९४१** | **२,२६३,८३७,३६१** |

## टिपा क्र. ५

(रक्कम ₹ मध्ये)

| दीर्घ मुदतीची इतर दायित्त्वे | दि. ३१ मार्च २०१३ रोजी | दि. ३१ मार्च २०१२ रोजी |
|---|---|---|
| १) भांडवली खर्चासाठी धनको | १०६,६९९,२६९ | १३८,८९८,२७७ |
| २) जमा व ठेवलेली रक्कम | २३,११३,७३०,४९१ | ९,५६८,२५१,६८९ |
| ३) इतर दायित्त्वे | २,७५३,७३७ | २०९,७९४,३९८ |
| ४) संबंधितांसाठी दायित्वे | २१५,३३४,७३२ | ६९०,६८५,७७३ |
| | **२३,४३८,५१८,२२९** | **१०,६०७,६३०,१३७** |

## टिपा क्र. ६

(रक्कम ₹ मध्ये)

| तरतूदी | दीर्घ मुदत | | अल्प मुदत | |
|---|---|---|---|---|
| | ३१ मार्च २०१३ रोजी | ३१ मार्च २०१२ रोजी | ३१ मार्च २०१३ रोजी | ३१ मार्च २०१२ रोजी |
| **कर्मचारी लाभाची तरतूद** | | | | |
| उपदानासाठी तरतूद पहा ३८(ए) (९) | ३,६४५,६४७,३१७ | ३,५८१,१३१,३८१ | ९४२,१७६,२०२ | ९११,२६५,८८५ |
| रजा रोखी करणासाठी तरतूद पहा ३८(ए) (९) | २,९४६,७५५,७४६ | २,७३६,०६४,४९० | ९०७,३८०,९९९ | ८०५,०४३,२४१ |
| **इतर तरतूदी** | | | | |
| आयकरासाठी तरतूद | ० | ० | ६,३०५,७४१,६५६ | ४,१७१,७४१,६५६ |
| वजा: अग्रीम कराचा भरणा (स्त्रोतापाशी कपात रक्कम समाविष्ट) | ० | ० | ४,९४५,२३७,४७४ | ३,९०१,३११,१०६ |
| | ० | ० | १,३६०,५०४,१८२ | २७०,४३०,५५० |
| संपत्ती करासाठी तरतूद | ० | ० | १२३,२०९ | १७४,२८९ |
| | **६,५९२,४०३,०६३** | **६,३१७,१९५,८७१** | **३,२१०,१८४,५९२** | **१,९८६,९१३,९६५** |

## टिपा क्र. ७

(रक्कम ₹ मध्ये)

| इतर चालू दायित्त्वे | ३१ मार्च २०१३ रोजी | ३१ मार्च २०१२ रोजी |
|---|---|---|
| दीर्घ मुदतीच्या कर्जाची चालू काळातील परिपक्वता (टिपा क्र. ३ आणि तेथील जोडपत्र) | ११,७२४,२८३,७०९ | ९,७३७,५७५,४८४ |
| कर्जावर उपार्जित झालेले परंतु देय नसलेले व्याज | २,७४६,०१२,३७२ | १,६२६,०९६,३०५ |
| इतर देणी | | |
| १) अनामत व संचीते | ९,३२३,४३७,२०० | १६,३८६,१८५,४७३ |
| २) भांडवली मालासाठी देणी | १३,७४९,१०५,६२९ | ९,६७७,२९१,७१२ |
| ३) इतर दायित्त्वे | ८,०१४,७८३,२२३ | ४,८३८,९५१,८२७ |
| ४) संबंधित संस्थाची दायित्त्वे | ६,४५६,०९१,२८२ | ५,८०७,६९९,८९२ |
| | **५२,०१३,७१३,४१५** | **४८,०७३,८००,६९३** |

## टिपा क्र. ८

(रक्कम ₹ मध्ये)

| मालमत्ता | एकूण गट (खर्चानुसार) | | | | घसारा | | | | | निरुपयोगीसाठी तरतूद | निरुपयोगीसाठी तरतूद | निव्वळ गट | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ०१.०४.२०१२ रोजी | भर / समयोजन | कपात / समयोजन | ३१.०३.२०१३ रोजी | ०१.०४.२०१२ रोजी | घसारा / तरतूद वर्षासाठी | पूर्वकालिन घसारा | घसारा / समयोजन | ३१.०३.२०१३ रोजी | ३१.०३.२०१३ | ३१.०३.२०१२ | ३१.०३.२०१३ रोजी | ३१.०३.२०१२ रोजी |
| **मूर्त मत्ता** | | | | | | | | | | | | | |
| जमीन (विकास समाविष्ट) | | | | | | | | | | | | | |
| मुक्त | १,२९८,५६२,९१३ | ८७३,९१९,०४४ | ३१,९३८ | २,१७२,४५०,०१९ | - | - | | - | - | | | २,१७२,४५०,०१९ | १,२९८,५६२,९१३ |
| भाडेपट्टीची | ५५१,५५५,७६९ | | | ५५१,५५५,७६९ | ५०,८०७,७०५ | ९,१९२,७३८ | | | ६०,०००,४४३ | | | ४९१,५५५,३२६ | ५००,७४८,०६४ |
| इमारत | | | | | | | | | | | | | |
| कारखान्याची इमारती | ७,४०२,२८७,८०६ | २,०८७,१०२,४९७ | (७,१९२,४९१) | ९,४९६,५८२,७९४ | ४,२९८,३६२,४५६ | १७४,३९४,८१६ | १२,२५५ | (६,०११,४११) | ४,४७८,८६०,९३८ | ३,९६९,४४६ | ६,०४३,२२० | ५,०१३,७५२,४१० | ३,०९७,८८२,१३० |
| इतर | ४,११७,७२४,८०० | ५०६,२२९,०६५ | ९,५४१,६५२ | ४,६१४,४१२,२१३ | १,२५१,५४३,३२५ | ९६,५०२,८३१ | ४,०३३,५८४ | ५,६७१,६६७ | १,३४६,४०८,०७३ | | | ३,२६८,००४,१४० | २,८६६,१८१,४७५ |
| जल विद्युत सयंत्र | १३,६४४,७२५,१९० | ५,५१६,३५५,९७८ | ९,३३१,७२९ | १९,१५१,७४९,४३९ | ५,६६१,१६६,७७९ | ४४३,१६०,५८८ | ३२४,२७८ | ८,३९८,५५४ | ६,०९६,२५३,०९१ | २,९९३,७१३ | ९७७,८०२ | १३,०५२,५०२,६३५ | ७,९८२,५८०,६०९ |
| **इतर बांधकामे** | | | | | | | | | | | | | |
| रेल्वे सायडींग | ३,४१४,८२४,२१९ | १,५९५,७२५,३०३ | (९,०८५,१५७) | ५,०१९,६३४,६७९ | ७७०,६०२,५५७ | ९५,५६१,९८३ | (१,३९९,४१२) | (५,७७०,८८९) | ८७०,५३६,०१७ | | | ४,१४९,०९८,६६२ | २,६४४,२२१,६६२ |
| रस्ते व इतर | ६,८३०,४९३,५९६ | २,४६०,७६०,७९४ | (२३६,५७१) | ९,२९१,४९०,९६१ | २,९८८,७२३,९७० | १३७,६६५,२५८ | ५१३,००१ | (१५३,१९५) | ३,१२७,०५५,४२४ | २,७७४,७०६ | ४१,८४६ | ६,१६१,६६०,८३१ | ३,८४१,७२७,७८० |
| कारखाना, यंत्रे व साधने | १२४,०२०,१६५,०४५ | ६७,५०१,५६८,१६३ | ७९८,५८४,५३० | १९०,७२३,१४८,६७८ | ६२,७०९,०५४,८८३ | ४,४३९,३१८,५८० | (४०,६१६,९१३) | ५७३,८७४,८४८ | ६६,५३३,८८१,७०२ | ७४,८६९,१४६ | १०२,३५८,७९५ | १२४,११४,३९७,८३० | ६१,२०८,७५१,३६७ |
| लाईन व केबल नेटवर्क | २,०९८,९५७,१३२ | १,१८४,६९८,४७६ | (१०५,४७८) | ३,२८३,७६१,०८६ | १,२१०,२१८,१९५ | ७४,७०२,३३५ | (७,१५२) | (९४,९३०) | १,२८५,०७१,३०८ | ६७,८५३,९५० | ४,५३१ | १,९३०,८३५,८२८ | ८८८,६७१,४०६ |
| फर्निचर व जोडणी | ३३३,८७०,६७७ | १७,९६६,७३७ | (१२८,६४३) | ३५१,९६६,०५७ | १२९,६५४,९९६ | १५,९४३,७७२ | (४१,१८८) | (२७६,३५५) | १४५,८३३,९३५ | ३०,१८१ | ११६,६३४ | २०६,१०१,९४१ | २०४,०९९,०४७ |
| वाहने | १७०,३६२,३९९ | ७,०३६,७८२ | ५,०६३,७१८ | १७२,३३५,४६३ | १२५,४१२,५९२ | १३,४५३,८४२ | (२६८,२९४) | ४,५५७,३५४ | १३४,०४०,७८६ | १,१४७,४७० | १,२३२,१६४ | ३७,१४७,२०७ | ४३,७१७,६४३ |
| कार्यालयीन साहित्य | २८७,२३५,६२० | ३९,३५४,३३४ | १,५६४,०१७ | ३२५,०२५,९३७ | १२५,४७८,२९३ | १६,०९०,६७५ | २९८,०४२ | ४९,०३८ | १४१,८१७,९७२ | १२८,५४३ | ५४३,०५२ | १८३,०७९,४२२ | १६१,२१४,२७५ |
| **कंपनीच्या मालकीची नसलेली मत्ता** | | | | | | | | | | | | | |
| कंपनीच्या मालकीची नललेली मत्ता निश्चितीचा भांडवल खर्च | ८६९,२५२,४०९ | १४,६८६,४१८ | | ८८३,९३८,८२७ | १६१,६१४,८२४ | ४४,४९४,११८ | २,०८५ | | २०६,१११,०२७ | ४५५,६८६ | ४५५,६८६ | ६७७,३७२,११४ | ७०७,१८१,८९९ |
| वजा : भांडवल | | | | | | (२१,६१२,९२३) | | | | | | | |
| एकूण मूर्त मत्ता | १६५,०४०,०१७,५७५ | ८१,८०५,४०३,५९१ | ८०७,३६९,२४४ | २४६,०३८,०५१,९२२ | ७९,४८२,७०३,५७५ | ५,५३८,८६८,६१३ | (३७,१४९,७१४) | ५८०,१६४,६८१ | ८४,४२५,८७०,७१६ | १५४,२२२,८४१ | १११,७७३,७३० | १६१,४५७,९५८,३६५ | ८५,४४५,५४०,२७० |
| मागील वर्षांची संख्या | १६२,६४६,४२७,८४६ | २,३१३,३१६,३१२ | (८०,२७३,४१७) | १६५,०४०,०१७,५७५ | ७५,६०२,३६७,०३५ | ४,०४५,७४२,२७५ | ५,८२९,१५९ | १७१,२३४,८९४ | ७९,४८२,७०३,५७५ | १११,७७३,७३० | १०४,१२१,४५५ | ८५,४४५,५४०,२७० | ८६,९३९,९३९,३५६ |

| मालमत्ता | एकूण गट (खर्चानुसार) | | | | घसारा | | | | | निरुपयोगीसाठी तरतूद | निरुपयोगीसाठी तरतूद | निव्वळ गट | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ०१.०४.२०१२ रोजी | भर / समयोजन | कपात / समयोजन | ३१.०३.२०१३ रोजी | ०१.०४.२०१२ रोजी | घसारा / तरतूद वर्षासाठी | पूर्वकालिन घसारा | घसारा / समयोजन | ३१.०३.२०१३ रोजी | ३१.०३.२०१३ | ३१.०३.२०१२ | ३१.०३.२०१३ रोजी | ३१.०३.२०१२ रोजी |
| **अमूर्त मत्ता** | | | | | | | | | | | | | |
| पाणी /प्राप्तीचा हक्क | ९,९८७,९०७ | | - | ९,९८७,९०७ | ७,८५४,०३५ | १,०६६,९३६ | - | - | ८,९२०,९७१ | | | १,०६६,९३६ | २,१३३,८७२ |
| सॉफ्टवेअर परवाने | ३७,५००,००४ | २७६,९३८,०७२ | | ३१४,४३८,०७६ | १३,८१४,२६५ | २९,७५३,४३७ | - | (२२,३८२,१६०) | ६५,९४९,८६२ | | | २४८,४८८,२१४ | २३,६८५,७३९ |
| एकूण अमूर्त मत्ता | ४७,४८७,९११ | २७६,९३८,०७२ | - | ३२४,४२५,९८३ | २१,६६८,३०० | ३०,८२०,३७३ | - | (२२,३८२,१६०) | ७४,८७०,८३३ | - | - | २४९,५५५,१५० | २५,८१९,६११ |
| मागील वर्षांची संख्या | ४६,८६९,१७७ | ६१८,७३४ | - | ४७,४८७,९११ | १६,७३०,४९८ | ४,९३७,८०२ | - | - | २१,६६८,३०० | | | २५,८१९,६११ | ३०,१३८,६७९ |

## टिपा क्र. ९:

(रक्कम ₹ मध्ये)

| चालू नसलेल्या गुंतवणूकी (हंगामी व्यतिरिक्त घटी वजा करुन किमतीचे मूल्य) | | |
|---|---|---|
| | ३१.०३.२०१३ रोजी | ३१.०३.२०१२ रोजी |
| **व्यापारी गुंतवणूकी (उद्धृत न केलेल्या)** | | |
| **समभागातील गुंतवणूकी** | | |
| **उपकंपन्यामधील** | | |
| १) ५०,००० (मागील वर्षी ५०,०००) समभाग धुळे थर्मल पॉवर कंपनी लि. चे प्रत्येकी ₹ १०/- प्रत्येकी ₹ १०/- पूर्ण भरणा केलेली | ५००,००० | ५००,००० |
| २) ५०,००० (मागील वर्षी ५०,०००) समभाग धोपावे कोस्टल पॉवर कंपनी लि. चे प्रत्येकी ₹ १०/- प्रत्येकी ₹ १०/- चे पूर्ण भरणा केलेले | ५००,००० | ५००,००० |
| | | |
| **संयुक्त साहसी उद्योगात** | | |
| ३) ३०,००० (मागील वर्षी ३०,०००) समभाग यु सी एम कोल कं. लि. प्रत्येकी ₹ १०/- पूर्ण भरणा केलेले | ३००,००० | ३००,००० |
| ४) २,५००,००० (मागील वर्षी २,५००,०००) समभाग लातूर पॉवर कं. लि. चे, प्रत्येकी ₹ १०/- चे पूर्ण भरणा केलेले | २५,०००,००० | २५,०००,००० |
| ५) ३०,००० (मागील वर्षी ३०,०००) समभाग प्रत्येकी ₹ १०/- चे महागूज कॉलेरी लि. चे पूर्ण भरणा केलेले | ३००,००० | ३००,००० |
| **एकूण** | **२६,६००,०००** | **२६,६००,०००** |
| **उद्धृत न केलेल्या गुंतवणूकीची एकूण रक्कम** | **२६,६००,०००** | **२६,६००,०००** |

## टिपा क्र. १०.

(रक्कम ₹ मध्ये)

| कर्जे व अग्रीमे | दीर्घ मुदतीचे | | अल्प मुदतीचे | |
|---|---|---|---|---|
| | ३१ मार्च २०१३ रोजी | ३१ मार्च २०१२ रोजी | ३१ मार्च २०१३ रोजी | ३१ मार्च २०१२ रोजी |
| भांडवल अग्रीमे | | | | |
| प्रतिभूत अग्रीमे | - | - | - | - |
| अप्रतिभूत चांगली मानलेली | ५,४२५,८८२,२०८ | १०,६०७,०३६,७११ | - | - |
| संशयास्पद | - | - | - | - |
| | ५,४२५,८८२,२०८ | १०,६०७,०३६,७११ | - | - |
| सुरक्षा अनामती | | | | |
| प्रतिभूत चांगली मानलेली | - | - | - | - |
| अप्रतिभूत चांगली मानलेली | ३०९,६४७,९०७ | ३,२७९,३०६,४१५ | १,००५,२८१,००९ | ३६०,३८७,३४२ |
| संशयास्पद | ३,१८३,२४३ | ५२,६७९ | - | - |
| | ३१२,८३१,१५० | ३,२७९,३५९,०९४ | १,००५,२८१,००९ | ३६०,३८७,३४२ |
| वजा-संशयास्पद कर्जासाठी तरतूद | ३,१८३,२४३ | ५२,६७९ | | |
| | ३०९,६४७,९०७ | ३,२७९,३०६,४१५ | १,००५,२८१,००९ | ३६०,३८७,३४२ |
| संबंधित संस्था | | | | |
| प्रतिभूत , चांगली मानलेली | - | - | - | - |
| अप्रतिभूत चांगली मानलेली | ३१२,६७४,८८८ | ५४०,८३७,७५६ | ७६४,०६७,८२५ | ५१५,४२१,१९७ |
| संशयास्पद | २,७१२,७९८ | २,७१२,७९८ | - | - |
| | ३१५,३८७,६८६ | ५४३,५५०,५५४ | ७६४,०६७,८२५ | ५१५,४२१,१९७ |
| वजा- संशयास्पद कर्जासाठी तरतूद | २,७१२,७९८ | २,७१२,७९८ | - | |
| | ३१२,६७४,८८८ | ५४०,८३७,७५६ | ७६४,०६७,८२५ | ५१५,४२१,१९७ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| इतर | | | | |
| अग्रीमे जी रोखीत किंवा वस्तूत वसूल होतील किंवा त्यामुल्यात मिळणारी | | | | |
| प्रतिभूत चांगली मानलेली | - | - | - | - |
| अप्रतिभूत चांगली मानलेली | ३०१,५९१,५८५ | ९०९,००८,९३२ | ७२०,०२६,७७८ | ८१८,३२८,४३८ |
| संशयास्पद | ६१२,८६५,१६८ | - | - | - |
| | ९१४,४५६,७५३ | ९०९,००८,९३२ | ७२०,०२६,७७८ | ८१८,३२८,४३८ |
| वजा संशयास्पद कर्जासाठी तरतूद | ६१२,८६५,१६८ | | - | - |
| | ३०१,५९१,५८५ | ९०९,००८,९३२ | ७२०,०२६,७७८ | ८१८,३२८,४३८ |
| संचालन व सुव्यवस्था यासाठी पुरवढा/ कार्य या करिता अग्रीम | | | | |
| प्रतिभूत चांगली मानलेली | - | - | - | - |
| अप्रतिभूत चांगली मानलेली | २९,०६५,५०४ | २८,८४६,६०५ | २,८०७,८८९,२७८ | १,९२६,०४२,९३४ |
| संशयास्पद | ९,९९५,४२८ | ८,०४१,३७९ | - | - |
| | ३९,०६०,९३२ | ३६,८८७,९८४ | २,८०७,८८९,२७८ | १,९२६,०४२,९३४ |
| वजा-बुडीत कर्जासाठी तरतूद | ९,९९५,४२८ | ८,०४१,३७९ | - | - |
| | २९,०६५,५०४ | २८,८४६,६०५ | २,८०७,८८९,२७८ | १,९२६,०४२,९३४ |
| अग्रीमे - कोळसा/इंधन पुरवठ्यासाठी | | | | |
| प्रतिभूत-चांगली मानलेली | - | - | - | - |
| अप्रतिभूत चांगली मानलेली | - | - | १९,२०३,६१४,०३३ | २४,७३६,२६३,०७५ |
| संशयास्पद | - | - | - | - |
| | - | - | १९,२०३,६१४,०३३ | २४,७३६,२६३,०७५ |
| अग्रीमे - कर्मचाऱ्यांना | | | | |
| प्रतिभूत, चांगलीमानलेली | ३६९,१५५ | १,२४९,७९२ | ९३५,९३७ | १,५८०,००१ |
| अप्रतिभूत, चांगली मानलेली | १४१,५७४,५७४ | १३६,३९६,८८६ | ३७८,३११,५७३ | २६६,९०३,७६९ |
| संशयास्पद | - | - | - | - |
| | १४१,९४३,७२९ | १३७,६४६,६७८ | ३७९,२४७,५१० | २६८,४८३,७७० |
| सांविधिक प्राधिकरणांकडून वसूलीयोग्य शिल्लक | | | | |
| प्रतिभूत, चांगली मानलेली | - | - | - | - |
| अप्रतिभूत चांगली मानलेली | - | - | ४२,१५४,४१५ | ५,००४,०८२ |
| संशयास्पद | - | - | - | - |
| | - | - | ४२,१५४,४१५ | ५,००४,०८२ |
| | - | | - | - |
| | - | | - | - |
| पूर्वी भरणा केलेले खर्च | | | | |
| प्रतिभूत चांगलि मानलेली | - | - | - | - |
| अप्रतिभूत चांगली मानलेली | - | - | ४६,६७१,२४५ | ४४,१०१,५६५ |
| संशयास्पद | - | - | - | - |
| | - | - | ४६,६७१,२४५ | ४४,१०१,५६५ |
| मिळण्याजोगे दावे आणि चालू मत्ता | | | | |
| प्रतिभूत चांगलि मानलेली | - | - | - | - |
| अप्रतिभूत चांगल्या मानलेल्या | १२,३७७,४७५ | २८,९१९,०५५ | ४,४१९,२७९,२२३ | २,६९८,७८७,५३८ |
| संशयास्पद | ३,८०७,४०० | २४,३४१,८०९ | - | - |
| | १६,१८४,८७५ | ५३,२६०,८६४ | ४,४१९,२७९,२२३ | २,६९८,७८७,५३८ |
| वजा-संशयास्पद कर्जाची तरतूद | ३,८०७,४०० | २४,३४१,८०९ | - | - |
| | १२,३७७,४७५ | २८,९१९,०५५ | ४,४१९,२७९,२२३ | २,६९८,७८७,५३८ |
| **निव्वळ बेरीज** | ६,५३३,१८३,२९६ | १५,५३१,६०२,१५२ | २९,३८८,२३१,३१६ | ३१,३७२,८१९,९४१ |

## टिपा क्र. ११:

(रक्कम ₹ मध्ये)

| वस्तूसुची ( किमतीनुसार मूल्यांकन केलेले किंवा वसूली योग्य मूल्य यापैकी जे कमी असेल त्याप्रमाणे) | ३१-३-२०१३ रोजी | ३१-३-२०१२ रोजी |
|---|---|---|
| **कच्चा माल** | | |
| कोळसा | ४,५८१,९२५,६१३ | ४,२८६,७७२,७०८ |
| अधिक (प्रवासातील कोळसा) | ६१६,९८८,७०९ | २६८,१६३,२१६ |
| वजा- धुलाई चालकांकडील साठ्यांची तरतूद | १,१५८,४०५,९११ | - |
| | **४,०४०,५०८,४११** | **४,५५४,९३५,९२४** |
| तेल | २,०६५,२३२,४७९ | १,९०१,९३७,०६८ |
| अधिक- प्रवासातील तेल | | |
| | **६,१०५,७४०,८९०** | **६,४५६,८७२,९९२** |
| **भांडार माल व सुटेभाग** | १२,९८८,५९६,९९५ | ८,८८५,५१०,३७७ |
| वजा- निकामी मालासाठी तरतूद | १,९३५,५८७,४०९ | १,०९८,१६४,६०५ |
| | **११,०५३,००९,५८६** | **७,७८७,३४५,७७२** |
| **निव्वळ बेरीज** | **१७,१५८,७५०,४७६** | **१४,२४४,२१८,७६४** |

## टिपा क्र. १२:

(रक्कम ₹ मध्ये)

| व्यापारातून प्राप्त होण्याजोगा रकमा | दीर्घ मुदतीच्या | | अल्प मुदतीच्या | |
|---|---|---|---|---|
| | ३१.०३.१३ रोजी | ३१.०३.१२ रोजी | ३१.०३.१३ रोजी | ३१.०३.१२ रोजी |
| **नियत तारखेपासून सहा महिन्यांपेक्षा जास्त थकबाकी** | | | | |
| प्रतिभूत, चांगली मानलेली | - | - | - | ० |
| अप्रतिभूत चांगली मानलेली | - | - | ८,५२२,८९६,६७८ | ५,७३२,५८०,८८२ |
| संशयास्पद | - | - | - | ० |
| | - | - | **८,५२२,८९६,६७८** | **५,७३२,५८०,८८२** |
| **- इतर** | | | | |
| प्रतिभूत, चांगली मानलेली | - | - | ० | ० |
| अप्रतिभूत, चांगली मानलेली | - | - | ६२,८०७,१८६,९९३ | ३७,२२६,४३८,६१२ |
| संशयास्पद | - | - | ० | ० |
| | - | - | ६२,८०७,१८६,९९३ | ३७,२२६,४३८,६१२ |
| **बेरीज** | - | - | **७१,३३०,०८३,६७१** | **४२,९५९,०१९,४९४** |

## टिपा क्र. १३

(रक्कम ₹ मध्ये)

| रोख व रोख सममूल्य | ३१.०३.२०१३ रोजी | ३१.०३.२०१२ रोजी |
|---|---|---|
| १) बँकामधील शिल्लक | १,०२२,२५०,०२६ | २९४,९१६,२८२ |
| २)हातातील रोख | १०,८३४,९५४ | ३,३९७,३६८ |
| ३) इतर | | |
| ४) - प्रवासातील वित्तप्रेषणे | १७५,२२७,००१ | ४००,००१ |
| | **१,२०८,३११,९८१** | **२९८,७१३,६५१** |

## टिपा क्र. १४:

(रक्कम ₹ मध्ये)

| इतर चालू मत्ता | ३१.०३.२०१३ रोजी | ३१.०३.२०१२ रोजी |
|---|---|---|
| विक्रीच्या मत्ता | ४६७,९७४,४५३ | ९७७,०३९,९१७ |
| विना देयक महसूल | १४,८१९,३२५,७११ | ९,०८७,७९५,७७८ |
| | **१५,२८७,३००,१६४** | **१०,०६४,८३५,६९५** |

## टिपा क्र. १५:

(रक्कम ₹ मध्ये)

| प्रवर्तना पासूनचा महसूल | २०१२-२०१३ | २०११-२०१२ |
|---|---|---|
| **प्रवर्तनाचा महसूल** | | |
| वीजिवक्रीचा महसूल | १६४,२३३,३९४,२९९ | १२७,४४३,८६५,४०७ |
| वजा- विज शुल्क व वीज विक्री कर | ११,३६६,९३३ | १५,७०९,४२१ |
| वीज विक्रीचा निव्वळ महसूल | १६४,२२२,०२७,३६६ | १२७,४२८,१५५,९८६ |
| महसूल- अर्थसहाय्य | १६,५९३,६०० | १८,२२४,१६० |
| **प्रवर्तना पासून एकूण महसूल** | **१६४,२३८,६२०,९६६** | **१२७,४४६,३८०,१४६** |

## टिपा क्र. १६:

(रक्कम ₹ मध्ये)

| इतर उत्पन्न | २०१२-२०१३ | २०११-२०१२ |
|---|---|---|
| व्याज उत्पन्न | ८,७३०,५२६ | १०,२७७,००४ |
| **इतर-अप्रवर्तनाचे उत्पन्न** | | |
| भाडेपट्टी, भाडे आकार इ. | ३३,४२३,४९६ | ५१,६५०,०८२ |
| मत्ता/ भांडार माल/भंगार विक्रीचा नफा | ७१७,९७५,९५१ | १९८,५८८,६४९ |
| निविदा फॉर्म विक्री | १३,८११,७१० | १४,४११,७१७ |
| किरकोळ शिल्लक जमा-पूनर्लीखित | ८७,७०३,९१८ | ३४३,६४०,२४८ |
| इतर प्राप्ती | ६२३,८१७,४१६ | ४५८,०९८,०१० |
| परकीय चलन फरकामुळे प्राप्ती | ७०६,३८०,६६० | ४२६,२२१,५९७ |
| | **२,१९१,८४३,६७७** | **१,५०२,८८७,३०७** |

## टिपा क्र. १७:

(रक्कम ₹ मध्ये)

| वापरलेल्या मालाचे मूल्य | २०१२-२०१३ | २०११-२०१२ |
|---|---|---|
| कोळसा | ९३,८१७,३६१,९६६ | ७८,४०९,५२७,५६७ |
| वायू | ७,९१६,२८९,५०९ | ९,६८६,३९७,५८४ |
| तेल | ६,४८७,५५३,५९४ | ६,९२४,१२९,५५० |
| - | **१०८,२२१,२०५,०६९** | **९५,०२०,०५४,७०१** |

## टिपा क्र.१८ :

(रक्कम ₹ मध्ये)

| कर्मचारी लाभाचे खर्च | २०१२-२०१३ | २०११-२०१२ |
|---|---|---|
| वेतन, भत्ते, बोनस इ. | ७,१५५,४९६,६२१ | ६,३०४,५१०,२७५ |
| भविष्य निर्वाह निधीचे अंशदान | ६९०,५०८,०९७ | ६३२,४३८,९६४ |
| इतर निधींचे अंशदान | ४३१,८३८ | ४,४६३,८५६ |
| कर्मचारी कल्याण खर्च | ९८,०१६,८३० | ७६,९५३,७१० |
| इतर कर्मचारी खर्च | १२४,५८४,१४४ | ११३,२२३,२५८ |
| रजा रोखीकरण योजना | ८७७,४३९,९५० | ६९५,८२१,८४९ |
| उपदान | ८७३,०९१,३९३ | ७२६,६५२,०७२ |
| | **९,८१९,५६८,८७३** | **८,५५४,०६३,९८४** |
| वजा- भांडवली करण केलेला कर्मचारी खर्च | ७१९,२०४,५९३ | ६२१,३३०,६१४ |
| | **९,१००,३६४,२८०** | **७,९३२,७३३,३७०** |

## टिपा क्र. १९

(रक्कम ₹ मध्ये)

| वित्त खर्च | २०१२-२०१३ | २०११-२०१२ |
|---|---|---|
| **खालील बाबींवर व्याज** | | |
| राज्य शासनाची कर्जे | १२८,८६३,६१८ | १६५,२३२,३९२ |
| इतर कर्जे/ इतर वीत्त खर्च | २३,९८९,८१३,१४८ | १७,९१९,१३८,४६२ |
| खेळत्या भांडवलासाठी उसनवारी | १,६१८,९८८,७८४ | ५१०,४४३,३१६ |
| ग्राहकांची अनामत रक्कम | ४,२०८ | ५३,२९३ |
| **इतर उसनवारी खर्च** | | |
| शासकीय हमी शुल्क/ आकार | ९६,३०२,०२८ | १२६,९१९,१४९ |
| वित्त उभारणीचा खर्च | ५१,७१०,४७७ | ११७,५९५ |
| | **२५,८८५,६८२,२६३** | **१८,७२१,९०४,२०७** |
| वजा -भांडवलीकरण झालेले व्याज व वित्त आकार | १२,२७४,६१२,११८ | १०,२२३,६१२,१६७ |
| | **१३,६११,०७०,१४५** | **८,४९८,२९२,०४०** |

## टिपा क्र. २०

(रक्कम ₹ मध्ये)

| इतर खर्च | २०१२-२०१३ | २०११-२०१२ |
|---|---|---|
| भाडी / सारा | १४८,९३१,७१३ | १३३,७९८,३५९ |
| भाडेपट्टीचे आकार | ४,५८८,८००,००० | ३,३४०,२००,००० |
| **दुरुस्ती व देखभाल** | | |
| कारखाना व यंत्रसामुग्री | ५,५८४,१०२,६७६ | ४,५२८,८५२,८५८ |
| इमारती | ९७,६२०,१४६ | १०८,४६८,१२२ |
| राख हाताळणीचे खर्च | ३०१,०५४,१४२ | २६७,६६५,२२० |
| दुरुस्ती व देखभाल इतर | ५४५,०५६,७६८ | ३९९,०००,८८७ |
| विमा आकार | ८५,२६५,८५८ | ६२,५६८,४७० |
| दर व कर | १४३,४०५,१४३ | १२९,९८२,८७८ |
| **इतर** | | |
| वंगण, वापरण्याजोगा माल आणि केंद्रातील पुरवठा | १,४१९,०६०,५९० | ४०६,७४०,५१४ |
| पाण्याचे आकार | ९८४,९३०,९४७ | १,०३९,७०७,२५९ |
| कायदेशिर व व्यावसायिक आकार | ९०,८०४,२७७ | ६५,५७०,८१२ |
| लेखा परिक्षकांचे परिश्रमिक (संदर्भ टिपा-२८ पहावी) | ५,०३७,५४९ | ४,८२९,८३० |
| दलाली (एजंटांना कमीशन) | ८२,३४०,७६२ | ६२,०१८,३२५ |
| इतर बँक आकार | ७१,४५८,९८५ | ३८,५१२,०१६ |
| कंपनीच्या मालकी नसलेल्या मत्ता/सी एस आर खर्च (संदर्भ टिपा २२ (ए)) | २,९०९,२१३,६५५ | २,६३९,१०३ |
| संशयास्पद अग्रीमांसाठी तरतूद | ६०७,३२३,६६४ | १८,९११,६८७ |
| इतर सर्वसाधारण खर्च | १,२१५,४०१,७७७ | ९७४,५१५,७९९ |
| स्थावर मत्ता/भांडार विक्रीचे नुकसान | ४३७,१८३,३८० | १२,३७१,८२८ |
| निकामी स्थावर मत्तांचे नुकसान | ९०,०४६,६३९ | ७,६०९,७५१ |
| निव्वळ पूर्वकालीन प्राप्ती/ हानी (टिपा क्र. २१ पहा) | १,६३०,८९२,२५२ | १२३,९१६,८१८ |
| | **२१,०३७,९३०,९२३** | **११,७२७,८८०,५३६** |
| वजा- भांडवलीकरण केलेला दुरुस्त देखभाल खर्च | १५,९२६,९५४ | ९,५१३,०६८ |
| भांडवलीकरण केलेले प्रशासन खर्च | २७६,१५६,६९० | २२९,९३२,४०८ |
| फ्लाय ॲश वापराकडे स्थानांतरीत केलेले खर्च | ९५,३४०,८३४ | २२,५०८,७३७ |
| | **२०,६५०,५०६,४४५** | **११,४६५,९२६,३२३** |

## टिपा क्र. २१

(रक्कम ₹ मध्ये)

| पूर्वकालीन (जमा) / आकार (निव्वळ) | २०१२-२०१३ | २०११-२०१२ |
|---|---|---|
| **उत्पन्न** | | |
| इतर उत्पन्न | ९६,९९९,२४६ | (४५,३३०,४७३) |
| पूर्व काळातील इतर जादा तरतूदी | ८०९,९२८ | ३०,८९२,९५१ |
| कोळसा/वायू संबंधित प्राप्ती | ८,९१९,०९० | - |
| ग्राहकांकडून प्राप्त रकमा | १४३,१३१ | (१३५,७४१,३७५) |
| | **१०६,८७१,३९५** | **(१५०,१७८,८९७)** |
| **खर्च** | | |
| इंधन संबंधित (प्राप्ती) / हानी | १९०,८५८,७८८ | २,८७३,५५५ |
| घसाऱ्यासाठी जादा / कमी तरतुदी | (३७,१०४,१७३) | (२२,३४०,८४१) |
| निव्वळ व्याज व वित्त आकार | १,५५०,५८२ | (७८१,५७१) |
| प्रवर्तन खर्च | २१,९२१,७६६ | (१३,९१२,९५४) |
| कर्मचारी खर्च | (३७,९६७,१५३) | ४,१९४,०३१ |
| पूर्वीच्या वर्षातील देयकातील जादा | १,६७४,६९२,०८३ | १०,८७४,६७९ |
| साहित्या संबंधीचे खर्च | (७६,१८८,२४६) | (७,१६८,९७८) |
| | **१,७३७,७६३,६४७** | **(२६,२६२,०७९)** |
| | **१,६३०,८९२,२५२** | **१२३,९१६,८१८** |

## टिपा क्र. २१(अ) भांडवल बांधिलकी

भांडवली लेखा नुसार कार्यान्वित न झालेल्या कंत्राटाची अंदाजे व तरतूद न केलेली रक्कम ₹ ६७,०११,७०१,०००/- (मागील वर्षी - ₹ ११३,३२३,१७४,४७८)

## टिपा क्र. २१ (ब) इतर बांधिलकी

(अ) कंपनीने निर्माण केलेल्या विजेच्या विक्रीसाठी महावितरण कंपनी सोबत वीज खरेदी करार केला आहे.

(ब) कंपनीने आर इ सी लि. कडून ₹ १५,७६८,४००,०००/- पी एफ सी कडून ₹ ३२,९०४,१००,०००/- आणि के एफ डब्ल्यू कडून ₹ १४,९५८,४६६,०८६/- (२११,९५६,१४९ युरो) असे निधी कर्जाने घेण्याचे ठरविले आहे.

(क) परळी येथील औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रातील युनिट ७ (२५०मेवॅ) येथील फ्लाय ॲश (राख) विक्री/विल्हेवाट लावणे यासाठी १५ वर्षाच्या दीर्घ मुदतीचा करार मे. अल्ट्रा टेक सिमेंट लि. यांचे सोबत करार केला आहे/ आदेश दिला आहे.

(ड) कंपनीला प्रतिवर्षी ४६.४८ दशलक्ष मेट्रीक टन कोळसा मिळावा यासाठी जोडणी करण्यात आली आहे. त्यामुळे या कंपनीच्या वाट्याला आलेल्या कोळसाकंपन्याकडून संबंधित बाजार मुल्याप्रमाणे कोळसा घेणे कंपनीवर बंधनकारक आहे.

(इ) कंपनीने अनुक्रमे गॅस ऑथॉरीटी ऑफ इंडिया लि. सोबत ३.५ एम एम एस सी एम डी आणि रिलायन्स लि. सोबत १.२ एम एम एस सी एम डी एवढा वायू खरेदि करुन त्या वाहतुकीचा करार केले आहेत.

## २२) फ्लाय ॲश वापर निधी

या वर्षी कंपनीने फ्लाय ॲश (राख) विक्रीच्या लेख्यात बदल केला. या राखेच्या वापरास प्रोत्साहन देण्यासाठी केलेला खर्च या आधी, नफा व तोटा पत्रकात इतर उत्पन्न व संबंधीत खर्च या लेखाशीर्षात त्याची लेखा नोंद केली जात असे. आता या राखेच्या वापरास उत्तेजन देण्यासाठी केलेला खर्च संबंधित जमेच्या मर्यादेपर्यंत वजा केली जाते व तो जादा जर असला तर नफा व तोटा पत्रकात खर्च म्हणून मान्य केला जातो. अशाप्रकारे प्रकटन करुन सादर केल्याने त्याचा संबंधित वर्षातील नफा व तोटा यावर परिणाम होत नाही. हा सादरीकरण व प्रकटन यातिल बदल हा वन व पर्यावरण मंत्रालयाने दि. ०३-११-२००९ रोजीच्या मार्गदर्शक सुचना प्रमाने केलेला आहे. याप्रमाणे फ्लाय ॲश (राख) च्या विक्रीचा खर्च ₹ ९५,३४०,८३४/- (मागील वर्षी ₹ २२,५०८,७३७/-) आणि समतुल्य खर्च टिपा क्र. २(ए) मध्ये प्रकट केल्याप्रमाणे वजा करण्यात आले आहेत.

**२२(ए)** कंपनीने (१) आपल्या भुसावळ युनिट क्र. ४ व ५ यांच्या विस्तारासाठी जादा पाणी पुरवठा व्हावा म्हणून धरण बांधण्यात आपल्या वाट्याची ₹ १,२६२,७२२,४८५/- रक्कमेचे योगदान दिले.

(२) भुसावळ औष्णिक विद्यतु केंद्राच्या जागेतून जाणाऱ्या रेल्वे मार्गावर ओव्हर ब्रीज उभारण्यासाठी भारत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण या संस्थेस ₹ १,५९३,५४८,८६५/- दिले. या मत्ता कंपनीच्या मालकीच्या होणार नाहीत. म्हणून हा खर्च 'महसूल खर्च' म्हणून हिशेबात घेतला आहे व त्याप्रमाणे नफा व तोटा पत्रकात आकारणि केली आहे.

## २३ आकस्मिक दायित्त्वे - (तरतूद न केलेली) (₹ १० लाखा पेक्षा जास्त मुल्याची)

| अनुक्रमांक | तपशील | २०१२-२०१३ | २०११-२०१२ |
|---|---|---|---|
| अ) | तिसऱ्या व्यक्तींसाठी कंपनीच्या बॅंकर्सने दिलेली बॅंक गॅरंटी | १३८,९७५,००० | १३८,९७५,००० |
| ब) | कंपनीच्या बॅंकर्स दिलेली हमी/लेटर ऑफ क्रेडीट | ९४,९९३,५५० | २३,७००,००० |
| क) | कंपनीच्या विरोधातील दाने-जे कर्जे नाहित | ७,२९३,२१३,९१० | ५,५८७,७४८,००७ |
| ड) | वाद असलेले शुल्क/कर मागण्या | १,११४,८९३,६७६ | १,११४,२९१,५९३ |

**सूचना-** 'वाद असलेले शुल्क व कर जमा यात' आयकर विभागाने दि. ३१.०३.२०११ रोजीच्या आदेशानुसार लावलेली दंडाची रक्कम ₹ १,०७३,२१५,४४०/- समाविष्ट आहे; ती वर्ष २००७-०८ या कर निर्धारण वर्षाकरीता आयकर अधिनियमाच्या कलम २७१(सी) यानुसार आहे. या दंडाच्या आदेशाविरोधात मा.आयुक्त (आयकर अपील) यांचेकडे अपिल करण्याचे कंपनीने ठरविले आहे.

## २४. भाग भांडवल

### वाटप प्रलंबित असलेला 'शेअर ॲप्लीकेशन मनी'

आरंभीचे समभाग भांडवल: पूर्वीच्या विद्युत मंडळाच्या पूनर्रचना करण्याच्या हेतूने तयार केलेल्या हस्तांतरण योजने नुसार कंपनीला ₹ २५,६३३,६३३,५३७/- एवढी रक्कम समभाग भअंडवल म्हणून मिळाली. या योजनेनुसार कंपनीला या रक्कमेचे समभाग मराविमं सुत्रधारी कंपनीला देणे आहे. त्यानुसार ₹ २५,०००,०००,०००/- रकमेचे शेअर्स मराविमं सुत्रधारि कंपनी लि. ला वर्ष २००८-०९ मध्ये आणि ₹ ६३३,६३३,५३७/- एवढी रक्कम वाटप प्रलंबित असलेला शेअर ॲप्लीकेशन मनी दर्शविण्यात आली. मात्र हस्तांतरण योजनेला महाराष्ट्र शासनाची अंतीम मंजुरी अद्याप मिळणे बाकी आहे. ती मंजुरि मिळाल्यावर शेअर्सची शिल्लक रक्कमदेण्यात येईल.

**समभागाच्या अंशदानाचा स्वीकार:-**

महाराष्ट्र शासनासोबतच्या सामंजस्यानुसार, कंपनितर्फे महाराष्ट्र राज्यात उभारल्या जाणाऱ्या वीज निर्मिती प्रकल्पाकरिता २०टक्के समभागाचा पाठिंबा मिळणार आहे. तसेच शासनासोबतच्या या सामंजस्यानुसार शेअर्स त्याच्या सममूल्यास द्यायचे आहेत. हे समभागाचे पाठिंब्याचे अंशदान मराविंम सुत्रधारी कंपनीकडून होत आहे. महाराष्ट्र शासन वित्तीय वर्ष २००६-०७ पासून अशा समभागाचा पाठिंबा देण्यासाठी अंशदान देत आहे.शेअर वाटपाच्या अंशदानाच्या वेळी कोणतीही वेळेची चौकट व्यांख्यांकित केलेली नव्हती. कंपनी अशा रक्कमांची लेखानोंद वाटप प्रलंबित असलेला शेअर ॲप्लीकेशन मनी या लेखाशीर्षाखाली करीत आहे. वाटप प्रलंबित असलेला शेअर ॲप्लीकेशन मनी वगळून उरलेली शिल्लक दि. ३१ मार्च २०१२ रोजी ₹ ५,१४४,३००,०००/- होती. वर्षभरात कंपनीला ₹ १२,१८३,३७०,०००/- कंपनीला मिळाले संचालक मंडळाने या वर्षात ३९३,७९७,८६४ समभाग मराविमं सुत्रधारी कंपनीला दिले. त्याचि रक्कम ₹ ३,९३७,९७८,६४०/- होते. आरंभीची समभाग रक्कम ₹ १३,३८९,६९१,३६०/- वगळता, दि. ३१ मार्च २०१३ रोजीची शिल्लक, मंडळाने मंजूरी दिल्या नंतर, मराविमं सुत्रधारी कंपनीला दिला आहे. वाटप प्रलंबित असलेले शेअर्स देण्याकरिता कंपनीकडे पुरेसे अधिकृत भांडवल आहे.

२५(अ) **कर्जाचा तपशील :-** कर्जाच्या तपशीला करीता कृपया परिशिष्ट अ (दीर्घ मुदतीची उसनवारी) आनि परिशिष्ट ब (अल्प मुदतीची उसनवारी) ही परिशिष्टे बघावीत.

**२५(ब):** महाराष्ट्र शासनाने अधिसुचित केलेल्या हस्तांतरण योजनेनुसार पूीर्वीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने घेतलेली कर्जे, तावरिल प्रतिभूतीसाठी कंपनीच्या मत्ता वरील आकार/गहान कंपनिकडे दि. ०६ जून २००५ रोजी स्थानांतरीत करण्यात आले . ते वैध असुण कंपनीला बंधनाकारक आहेत. (कृपया परिशिष्ट अ पहावे)

### २६) लेखा परिक्षकांचे शुल्क देणे

| | २०१२-२०१३ (₹) | २०११-२०१२ (₹) |
|---|---|---|
| लेखा परिक्षकांना (सांविधिक लेखांसाठी) | ४,५५०,५८० | ४,५५०,५८० |
| कर विषयक प्रकरणांसाठी | - | - |
| इतर सेवांसाठी | १६,८५४ | - |
| खर्चाची प्रतिपूर्ती | ४७०,११५ | २७९,२५० |
| **एकूण** | **५,०३७,५४९** | **४,८२९,८३०** |

### २७) सी आय एफ तत्त्वानुसार मोजणी केलेले आयातीचे मुल्य

| | २०१२-२०१३ (₹) | २०११-२०१२ (₹) |
|---|---|---|
| कच्चा माल | निरंक | निरंक |
| सुट्टेभाग व अन्य घटक | ४६,५९६,८१६ | ४,४११,८९७ |
| भांडवली माल | निरंक | निरंक |

**२८) वापरलेला आयात व देशांतर्गत कच्चामाल , भांडार साहित्य, सुटेभाग व घट याचे मूल्य (त्यात देखभाल व दुरुस्ति खर्चाचाही समावेश आहे.) खालील प्रमाणे आहे:-**

| | | २०१२-१३ | | २०११-१२ | |
|---|---|---|---|---|---|
| अ) | **कच्चा माल- कोळसा वायू, आणि तेल** | % | ₹ | % | ₹ |
| | देशातील | १०० | १०५,०४८,७८४,६७१ | १०० | ९५,२८२,१२५,१०९ |
| ब) | **भांडारमाल, सुटेभाग व घटक** | | | | |
| | आयात | ०.४२ | ३,९५२,१३२ | १ | ४८,२७०,४९५ |
| | देशातिल | ९९.५८ | ९३३,५३५,१२६ | ९९ | ३,९७४,२७०,७७५ |
| | **एकूण** | **१००** | **९३७,४८७,२५८** | **१००** | **४,०२२,५४१,२७०** |

**२९) विकलेल्या ऊर्जेची विभागणी:-**

(रक्कम ₹ मध्ये)

| वीज प्रकल्प | २०१२-१३ | २०११-१२ |
|---|---|---|
| जल | ६,४५६,६७६,३०६ | ४,६४९,४२०,३६९ |
| औष्णिक | १३६,९४५,०६८,०२६ | १०७,८७८,७२२,५९१ |
| वायू | ९,५१४,५८४,६४६ | ११,१८३,१८८,३८७ |
| सौर | ११५,१४९,७९२ | १३,१४५,८०२ |
| **एकूण** | **१५३,०३१,४७८,७७०** | **१२३,७२४,४७७,१४९** |
| यात निवासी वसाहतींना विक्रीचा व इतर संकीर्ण विक्रीची रक्कम रु. ११,१९०,५४८,५९६(मागील वर्षी रु. ३,७०३,६७८,८३७) वगळली आहे. | | |

३०) महसूल अर्थ साह्य/ अनुदाने:- वर्षभरात कंपनीने सौर प्रकल्पातून मिळालेल्या ऊर्जेच्या विक्रीचा महसूल ₹ ११५,१४९,७९२/- (मागील वर्षी ₹ १३,१४५,८०२/-) असा धरला आहे व त्यासाठी भारत सरकारकडे निर्मिती आधारीत प्रोत्साहनाकरिता ₹ १२/- प्रती युनीट या दराने ₹ १६,५९३,६००/- (मागील वर्षी ₹ १८,२२४,१६०/-) मागितले आहेत.

३१) व्यापारातून मिळणाऱ्यारकमा , कर्जे व अग्रीमे यांच्या शिल्लकी जर काही त्यासंबंधीच्या दुजोरा मिळणे असेल तर तसेच त्यांचा मेळ घाळणे याच्या अधीन आहेत.

मंडळाच्या मते चालू/चालू नसलेल्या मत्ता , दीर्घ / अल्प मुदतीची कर्जे व अग्रीमे ही सर्वसाधारण वयवहारात करण्यासाठी व लेखांमध्ये अन्य काही नमूद केले नसेल तर, त्या मर्यादेत त्यांच्या मुल्याइतकी चांगली व वसूल होण्यासारखी आहेत.

३२) अल्प मुदतींची कर्जे व अग्रीमे यात कोळसा पुरवठादारांना दिलेली अग्रीमाची रक्कम ₹ १९,०३३,१४२,५७६/- (मागील वर्षी ₹ २४,५९०,७६२,९६९/-) समाविष्ट आहे. या अग्रीमाप्रमाणे कंपनीची कोळशाचे दायित्त्व ₹ १९,१४९,५३४,११८/- (माघील वर्षी ₹ २५,४०६,४०७,०१७/-) असून त्यात चालू दायित्त्वे या लेखाशीर्षातील व्यापारी देय रक्कम समाविष्ट आहे. या कोळसा पुरवठादारांनी पुरविलेल्या कोळसाची देयकांचे अंतिम मंजुरी होईपर्यंत सदर अग्रीमे व दायित्त्वे यांचे समायोजन केलेले नाही.

३३) विक्रीसाठी धरलेल्या मत्ता या शीर्षातील ₹ ४६७,९७४,४५३/- (मागील वर्षी ₹ ९७७,०३९,९१७/-) यात ज्या मत्ता प्रत्यक्ष वापरात नाहीत व ज्यांची विल्हेवाट करण्याचे व्यवस्थापनाने ठरविले आहे अशा मत्ता आहेत. व्यवस्थापनाच्या मते त्यांच्या विल्हेवाटीतून मिळू शकणारे निव्वळ मूल्य पुस्तकातील चालू मुल्यांपेक्षा जास्त असेल. त्यामुळे त्यासाठी अन्य तरतूद करण्याची गरज नाही.

३४) सुक्ष्म , लघु व मध्यम उद्योग विकास अधिनियम २००६ यानुसार सुक्ष्म व लघू उदयोग कोणते आहेत ते कंपनीने उपलब्ध झालेल्या माहितिवरून ठरविले आहे. व त्याची आवश्यकती प्रकटने खाली दिली आहेत:-

(रक्कम ₹ मध्ये)

| | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| अ) | कोणत्याही पुरवठादारांसास न दिलेली रक्कम | |
| | मुख्य रक्कम | २,२८९,०८४ |
| | त्यावरील देय व्याज | २४,४३२ |
| ब) | वर्षभरात निश्चित दिवसांनंतर दिलेला रक्कम व त्यावरील व्याज | - |
| क) | उपार्जित व्याजाचि न दिलेली रक्कम | २,०४२,१७५ |
| ड) | लघु उद्योगांना देय असलेले उर्वरित व्याज व नंतरच्या वर्षात देय असलेले, प्रत्यक्ष देण्याच्या तारखेपर्यंतचे व्याज | - |

३५) **कंपनीने केलेले दावे: हरवलेल्या वॅगन्सबाबत रेल्वेकडे केलेले दावे**

(रक्कम ₹ मध्ये)

| तपशील | २०१२-१३ | २०११-१२ |
|---|---|---|
| हरवलेल्या वॅगल्स (संख्या) | ५९० | ३५३ |
| दाव्याचि रक्कम (₹) | ९१,५०४,६३९ | ४६,५००,००० |

३६) **घसारा, व्याज, कर्मचारी खर्च, दुरुस्ती-देखभअल व प्रशासन खर्चाचे भांडवलीकरण**

१) वर्षभरातील एकूण घसाऱ्यापैकी ₹ २१,६१२,९२३/- एकूण रक्कमेचा (मागील वर्षी ₹ १९,४२४,५१४/-) निव्वळ घसारा हा बांधकाम सुविधांचा व इतर मत्ता निर्मितीसाठी वापरलेल्या स्थावर मत्तांचा असून इतर संबंधित मत्तांच्या खर्चापोटी त्याचे भांडवलीकरण करण्यात आले.

२) वर्षातील एकून व्याज व वित्त आकारापैकी , बांधकाम सुविधा व इतर मत्ता निर्मितीसाठी वापरलेल्या स्थावर मत्ता यांचे निव्वळ व्याज व वित्त आकार यांच्या ₹ १२,२७४,६१२,११८/- (मागील वर्षी ₹ १०,२२३,६१२,१६७/-) रकमेचे बांधकाम इतर संबंधित मत्तांसाठीच्या खर्चासाठी भांडवलीकरण करण्यात आले.

३) वर्षातील कर्मचारी खर्चापैकी बांधकाम व इतर मत्ता निर्मितीसाठी वापलेलीनिव्वळ कर्मचारी रक्कम ₹ ७१९,२०४,५९३/- (मागील वर्षी ६२१,३३०,६१४/-) एवढ्या रक्कमेचे इतर संबंधित मत्तांच्या खर्चापोटी भांडवलीकरण करण्यात आहे.

४) वर्षातील दुरुस्ती, देखभाल व प्रशासन यांच्या एकूण खर्चापैकी दुरुस्ती व देखभाल खर्चाची ₹ १५,९२६,९५४/- (मागील वर्षी ₹ ९,५१३,०६८) आणि प्रशासन खर्चाचे ₹ २७६,१५६,६९०/- (मागील वर्षी

₹ २२९,९३२,४०८/-) एवढी रक्कमा व इतर मत्तांचि निर्मिती व बांधकाम सुविधा यासाठी वापरण्यात आल्या. त्यांचे इतर संबंधित मत्तांच्या खर्चापोटी भांडवलीकरण करण्यात आले.

**३७) लेखा मानकांनुसार आवश्यक असणारी प्रकटने:-**

**अ) कर्मचारी लाभ**

१) अल्पमुदतीचे कर्मचारी लाभ

अल्प मुदतीचे कर्मचारी लाभ म्हणजे वेतन, भत्ते उपांत लाभ, बोनस, प्रोत्साहने, वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती, गट विमा योजनांचे अंशदान, रजा प्रवास साह्य, आणि इतर लाभ जे मुदतिच्या अखेरीचे बारा महिन्यात कर्मचाऱ्यांनी दिलेल्या संबंधित सेवानंतर दिले जातात, या सर्वाची लेखानोंद, सेवा देण्याच्या मुदतितील खर्च म्हणून केली जाते.

२) नोकरी नंतरचे लाभ

व्यांख्यांकित लाभ योजना

भविष्य निर्वाह निधी

कंपनी भविष्य निर्वाह निधिचे अंशदान एका व्याख्यांकित लाभ निवृत्ती योजनेमध्ये करते. या भविष्य निर्वाह प्रशासन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे अंशदान भविष्य निर्वाह विश्वस्त (सी पी एफ ट्रस्ट) करतात. या योजनेनुसार या निधिच्या लाभासाठी कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या निर्देशित केलेल्या टक्केवारी अंशदान करण्याची कंपनीला आवशयक असते.

